डिसेंबर २०१६ / पाने ६८ / किंमत ₹१०

# लोकराज्य



# महाराष्ट्र शासन

# विक्रीकर विभाग

सत्यमेव जयते

## ऑनलाईन CDA अनुपालन

### प्रिय व्हॅट करदात्यांनो,



**आम्ही २०१३-२०१४ या वर्षासाठी कॉम्प्युटराईज्ड डेस्क ऑडीट (CDA) सुविधा दि. २१.११.२०१६ पासून उपलब्ध करून देत आहोत.**

- CDA अनुपालनासाठी www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर **लॉगइन** करा.
- CDA अनुपालन वेब फॉर्ममध्ये आपण वर्ष २०१३-२०१४ चा पर्याय निवडा आणि मान्य असलेला मुद्दा निवडा.
- कलम ३०(२) खालील व्याजाच्या गणनेची सुविधा आता सदर फॉर्ममध्ये अंतर्भूत केलेली आहे.
- आपणास मान्य असलेला कर जर आपण २०१३-२०१४ या वर्षासाठी भरलेल्या कराच्या १०% एवढा किंवा अधिक असेल तर कलम ३०(४) प्रमाणे २५% व्याज भरावे लागेल.
- व्याजासह कराचा भरणा केल्यानंतर कलम २०(४) (क) प्रमाणे वार्षिक सुधारित विवरणपत्र भरावे.
- वरील माहिती सदर फॉर्ममध्ये भरून फॉर्म दि. २०/१२/२०१६ रोजी किंवा त्यापूर्वी ऑनलाईन सादर करावा.
- पुढील माहितीसाठी सदर संकेतस्थळावरील सूचनापत्रक वाचावे.
- वरीलप्रमाणे अनुपालन केल्यास आपले ऑडीट मुद्दे बंद करण्यात येतील.

**विक्रीकर कार्यालयास भेट न देता ऑडीट मुद्दे बंद करा**

CDA अनुपालनासाठी पात्र प्रकरणांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे

**www.mahavat.gov.in**

# अंतरंग

## नवी अर्थक्रांती



६ केंद्र शासनाने चलनातील ५०० आणि १००० रुपयांच्या नोटांवर कायदेशीररीत्या बंदी घातली. हा निर्णय प्रामाणिकतेला प्रोत्साहन देणारा आणि देशात अर्थक्रांती घडवणारा आहे.

## बाबासाहेब आणि मंत्रिपद



घटना समितीमध्ये १७ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे उत्स्फूर्त भाषण केले, त्यामध्ये त्यांच्या चित्तवृत्तीत आयुष्यभर साठवून ठेवलेली वेदना आणि राष्ट्रभक्ती या दोन्ही गोष्टी एकाच वेळी उचंबळून आल्या. घटना समितीचे अध्यक्षपद त्याच दिवशी हात जोडून त्यांच्यासमोर उभे राहिले होते. १०

## आपुलकीचा गोडवा

विधिमंडळ अधिवेशनात सभागृहात समन्वय आणि संतुलन ठेवण्याची जबाबदारी विधानपरिषदेचे सभापती आणि विधानसभेचे अध्यक्ष यांना पार पाडावी लागते. सत्ताधारी बाजू आणि विरोधी बाजू यांच्यात संतुलन, सामंजस्य आणि सौहार्दता राखत जनतेच्या प्रश्नांना न्याय कसा मिळेल याची काळजी पीठासीन अधिकारी घेत असतात. १४

## इतिहास आणि परंपरा

महाराष्ट्र विधानमंडळाला देशात आगळीवेगळी प्रतिष्ठा लाभली आहे. अनेकविध क्षेत्रात देशपातळीवर नेतृत्व देणाऱ्या व्यक्ती या विधानमंडळाने दिल्या. त्यांनी लोकशाही आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाद्वारा सबळ प्रशासनाचा वस्तुपाठ इतरांना घालून दिला. त्यायोगे अनेक उत्तम परंपरा, संकेत व आदर्श निर्माण केले आहेत. २४


| | |
|---|---|
| **नवी अर्थक्रांती** | **६** |
| **बाबासाहेब आणि मंत्रिपद** | **१०** |
| **आठवणीतले बाबासाहेब...** | **११** |
| **आपुलकीचा गोडवा** | **१४** |
| **समन्वय आणि संतुलन** | **१६** |
| **उत्तम संसदीय परंपरा** | **१८** |
| **विदर्भ समजला...** | **२०** |
| **अस्मिता आणि संस्कृतीचे प्रतीक** | **२२** |
| **इतिहास आणि परंपरा** | **२४** |
| **अभ्यासवर्ग** | **२७** |
| **खजिना मिळाला...** | **२८** |
| **ज्वलंत आठवणी, मधुर क्षण** | **३०** |
| **थंडी, चर्चा आणि मंथन** | **३२** |
| **लोकभावनेचे प्रतिबिंब** | **३४** |
| **आमच्या अपेक्षा** | **३५** |
| **लोकप्रतिनिधींच्या नजरेतून...** | **३६** |
| **इतिहासाचा साक्षीदार** | **३८** |
| **अशी असते विधानसभा** | **४१** |
| **संसदीय कामकाज कसे चालते?** | **४२** |
| **आपले आमदार (विधानसभा)** | **४६-६०** |
| **अशी असते विधानपरिषद** | **६१-६५** |
| **पत्रे** | **६६** |


## इतिहासाचा साक्षीदार

नागपूरच्या सेमिनरी हिलवर राजभवनचा वास्तुपुरुष गेली १२५ वर्षे साक्षीदार राहिला आहे, असंख्य स्थित्यंतरांचा, विविध आंदोलनांचा आणि स्वातंत्र्य चळवळीचा. ३८



## उत्तम संसदीय परंपरा



महाराष्ट्राच्या सार्वत्रिक प्रागतिकतेचे प्रतीक शोभणारे विधानमंडळ उत्तम संसदीय परंपरा आणि लोकशाही व्यवस्थेपुढे आदर्श संकेत निर्माण करणारे ठरले आहे. १८

## संसदीय कामकाज कसे चालते?



विधिमंडळाच्या कामकाजामध्ये प्रश्न प्रस्ताव, ठराव, स्थगनप्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव इ.संसदीय आयुधांच्या माध्यमातून विधिमंडळ कार्यकारी प्रशासनावर नियंत्रण ठेवतात. ४२

## विधिमंडळ सदस्य परिचय



४६

वर्ष ६८ वे | अंक ६ | डिसेंबर २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर, गजानन पाटील

**प्रशासन**

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण — अश्विनी पुजारी

**मांडणी**

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

**विशेष सहकार्य:** निलेश मदाने, जनसंपर्क अधिकारी;
बा.बा. वाघमारे, ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी, विधानमंडळ

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

## मुंबई होणार क्रूझ पर्यटनाची राजधानी

**मुंबई** हे नेहमीच पर्यटकांचे आकर्षणाचे स्थान राहिले असून, त्यामध्ये आता क्रूझ पर्यटनाची भर पडली आहे. यापुढील काळात मुंबईला क्रूझ पर्यटनाची राजधानी म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.




मुंबई पोर्ट ट्रस्टच्या बंदरामध्ये आलेल्या 'गेटिंग हॉंगकॉंग' कंपनीच्या 'ड्रिम क्रूझ' या आंतरराष्ट्रीय पंचतारांकित पर्यटन जहाजाचे स्वागत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय जहाज बांधणी व भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतेच केले. त्यावेळी ही बाब स्पष्ट करण्यात आली.

ड्रिम क्रूझ ही गेटिंग हॉंगकॉंग या कंपनीचे प्रवासी वाहतूक जहाज आहे. एकूण १८ मजली जहाजामध्ये मिनी थिएटर, कॅसिनो, चार हजार लोक राहू शकतील अशी व्यवस्था, सुमारे ३५ रेस्टॉरंट, नृत्यशाळा, शॉपिंग सेंटर आदी पंचतारांकित सोयीसुविधा आहेत. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमही या ठिकाणी होणार आहेत.

## दिव्यांगजन सशक्तीकरण राष्ट्रीय पुरस्कार

**दिव्यांगांच्या** कल्याणासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळास, केंद्र शासनाच्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळास उत्कृष्ट राज्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. राज्यातील दिव्यांगाना कर्जवाटप, राज्यस्तरीय साहित्य, कला व उद्योजकता संमेलनाचे नागपूरमध्ये यशस्वी आयोजन करून; त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यात आले. तसेच राज्यातील उद्योग क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या १३ दिव्यांग व्यक्तींना उद्योजकता पुरस्कार देण्यात आले.

## डॉ. उषा माधव देशमुख यांना ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार



**राज्य** शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने संत साहित्यासाठी तसेच मानवतावादी कार्यासाठी 'ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार' संतसाहित्याच्या संशोधक, ज्येष्ठ समीक्षक डॉ. उषा माधव देशमुख यांना रवींद्र नाट्य मंदिरात झालेल्या सोहळ्यात देण्यात आला. पाच लाख रुपये, मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रम

**'एक** भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत महाराष्ट्र आणि ओडीशा राज्यात सांस्कृतिक आदानप्रदान करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विज्ञान केंद्रात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या समक्ष या कराराचे हस्तांतरण करण्यात आले. या करारांतर्गत दोन राज्यांमध्ये कलापथकांच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांची देवाणघेवाण होणार आहे.

# नागपूर अधिवेशन

नागपूर येथील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे वेगळे महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर नागपूर करारानुसार एक अधिवेशन नागपूर येथे घेण्याचे ठरवण्यात आले. त्यानुसार होणारे अधिवेशन दरवर्षी वैशिष्ट्यपूर्ण ठरत आले आहे. वैदर्भीय जनतेच्या आशा, अपेक्षांचे प्रतिबिंब या अधिवेशनात उमटत असते. तसेच या अधिवेशनात महत्त्वाचे निर्णय घेण्यात येऊन, विदर्भ विकासाला आणखी गतिमान केले जाते. या अधिवेशनाच्या निमित्त आम्ही लोकराज्यचा नागपूर विधिमंडळ अधिवेशन, हा विशेषांक प्रकाशित करत आहोत.

या अंकात विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील, विधानपरिषद विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, यांनी हिवाळी अधिवेशनानिमित्त त्यांचे अनुभव, परंपरा, या अधिवेशनात विदर्भ विकासासाठी घेण्यात येणारे निर्णय, धोरणे, पक्षोपक्षांची भूमिका यासोबतच काही व्यक्तिगत आठवणी शब्दबद्ध केल्या आहेत.




ज्येष्ठ आमदार हेमंत टकले, डॉ. नीलम गोऱ्हे आणि माजी आमदार उल्हासदादा पवार यांनी या अधिवेशनाच्या निमित्त त्यांना आलेले विविध अनुभव आणि आठवणींचा खजिना खुला केला आहे. याशिवाय नागपूर अधिवेशनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, नागपूर करार यांचीही माहिती या अंकात समाविष्ट केली आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या बहुतांश सर्व आमदारांची थोडक्यात उपयुक्त माहिती, त्यांच्या छायाचित्रासह दिली आहे. सर्व आमदारांची ही एकत्रित माहिती संग्रहणीय अशी आहे.

नागपूर येथील राजभवन याचे महत्त्व आगळेवेगळे असून अधिवेशनाच्या कालावधीत काही काळ मा.राज्यपालांचे वास्तव्य या ठिकाणी असते. अशा या वास्तूचा परिचय या अंकात करून दिला आहे. ही माहिती वाचकांसाठी खचितच नावीन्यपूर्ण अशी आहे.

प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी घेतलेला ५०० व १००० रु. निश्चलनीकरणाचा निर्णय नवी आर्थिक क्रांती घडवणारा ठरेल, असा विश्वास वित्त व नियोजनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे. हा निर्णय अंतिमत: कसा देशाच्या प्रगती आणि विकासासाठी उपयुक्त ठरेल, याविषयी त्यांनी व्यक्त केलेले मनोगत या अंकात समाविष्ट केले आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ज्येष्ठ विचारवंत प्रा. दत्ता भगत यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील एका महत्त्वाच्या पैलूवर प्रकाश टाकला आहे.

लोकराज्यचा हा अंक आपणास आवडेल, अशी आशा आहे.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**

# नवी अर्थक्रांती



**सुधीर मुनगंटीवार**
(वित्त, नियोजन व वने मंत्री)

केंद्र शासनाने ८ नोव्हेंबर २०१६ (निश्चलनीकरण)च्या मध्यरात्रीपासून जुन्या ५०० आणि १ हजाराच्या नोटा कायदेशीररीत्या वापरातून बाद केल्या हा या शतकातील सर्वात मोठा धाडसी, अतिशय नियोजनपूर्वक आणि राष्ट्रहितासाठी घेतलेला निर्णय आहे, असे मला वाटते. या निर्णयासाठी मी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करीन. याची सुरुवात फार पूर्वीच झाली असावी असे मला आज वाटत आहे. पंतप्रधान जनधन बँक योजनेची घोषणा आणि त्याची अंमलबजावणी हे या निर्णयाचे पहिले बीज होते. समाजातील गरीब आणि दुर्लक्षित घटकाला बँकिंग जाळ्यात आणण्याचे काम या योजनेने केले. त्यांच्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विकास आणि कल्याणकारी योजनांचे लाभ थेट त्यांच्या बँक खात्यातून देण्यास सुरुवात झाली.

रोजगार हमी योजनेची मंजुरी, गॅस सबसिडी, निराधार योजनांचे अनुदान अशा अनेक योजना आधार कार्डशी जोडत केंद्र शासनाने बँकिंग नेटवर्किंगमध्ये आणल्या. देशभरात जनधन योजनेची २६ कोटी खाती उघडली गेली. यातील जवळपास २० कोटी बँक खातेदारांना रुपे कार्डचे वाटप करण्यात आले. शून्य बचतीच्या या खात्यात खातेदारांनी काही हजार कोटी रुपये जमा केले. ही

> भारतात बनावट चलनाच्या माध्यमातून फोफावलेला दहशतवाद, हेरगिरी, ड्रगमाफिया यांच्याकडून होणारी देशविघातकृत्ये आणि काळ्या पैशाला प्रतिरोध करण्यासाठी, ८ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या मध्यरात्रीपासून केंद्र शासनाने चलनातील ५०० आणि १००० रुपयांच्या नोटांवर कायदेशीररीत्या बंदी घातली. हा देशाची आर्थिक तब्येत सुधारणारा, प्रामाणिकतेला प्रोत्साहन देणारा आणि अर्थक्रांती घडवत देशाला डिजिटल मनी ट्रॅन्झॅक्शन्सकडे घेऊन जाणारा निर्णय आहे.

## माझी लढाई प्रामाणिक लोकांच्या बळावर



**५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बदलवण्याचा निर्णय मी प्रामाणिक लोकांच्या भरवशावर घेतला आहे. कारण याच लोकांच्या शक्तीवर माझा पूर्ण विश्वास असून त्याच बळावर मी हे शिवधनुष्य पेलले आहे. भ्रष्टाचार, काळे धन आणि खोट्या नोटांच्या व्यवहाराला आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. यामुळे सामान्य नागरिकांना कुठलाही धोका पोहोचणार नाही. भ्रष्ट प्रवृत्तीला वठणीवर आणण्यासाठी जनतेने मला फक्त ५० दिवसांचा अवधी द्यावा. भ्रष्टाचार बंद करण्यासाठी माझ्याकडे भरपूर योजना आहेत. ही केवळ सुरुवात आहे. मुबलक नोटा उपलब्ध होईपर्यंत काही काळ थोडा त्रास होईल. या काळात प्रामाणिक नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही. कष्टाच्या पैशाला कोणताही धोका नाही. जवळचा पैसा बदलून घेण्यासाठी ५० दिवसांचा पुरेसा अवधी उपलब्ध आहे. ओळखपत्र दाखवून बँका, पोस्ट या ठिकाणाहून नोटा बदलवता येईल. नोट बदलवून देण्याच्या कोणत्याही धनिकांच्या आमिषाला बळी पडू नका, असे आवाहनही त्यांनी केले आहे.**

सर्वसामान्य माणसाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून, त्याला त्याचे लाभ थेट पोहोचवण्यासाठी केलेली सक्षम व्यवस्था आहे. ही खाती आधारसंलग्न केल्याने यात पारदर्शकता, गतिमानता आली. यातून अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरणही झाले.

काळ्या पैशांचा वापर किंवा नकली नोटाचा वापर हा शस्त्राशस्त्र खरेदी, नशिली पदार्थांची खरेदी, दहशतवाद यासारख्या गोष्टींसाठी मोठ्या प्रमाणात होत होता. जागतिक बँकेने जुलै २०१० च्या अंदाजानुसार भारतीय बनावट चलनाच्या माध्यमातून १९९९ मध्ये भारतीय सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २०.७ टक्के इतकी समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाल्याचे व २००७ मध्ये हे प्रमाण वाढून ते २३.२ टक्के इतके झाल्याचा अहवाल दिला होता. आता हे प्रमाण २५ ते २६ टक्क्यांवर गेले आहे. या समांतर अर्थव्यवस्थेने देशाच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम करण्यास सुरुवात केली होती. देशात महागाई वाढत होती. देशातील गरीब गरीबच राहत होता तर श्रीमंत माणूस अधिकच श्रीमंत होत होता. सामाजिक विषमतेची ही रुंदावणारी दरी थांबविणे आणि भारतीय अर्थव्यवस्थेला शिस्त लावून त्यातील धोके कमी करणे गरजेचे होते. नकली नोटांनी देशाची अर्थव्यवस्था पोखरली जाऊ लागली होती. काळ्या पैशाच्या साठवणुकीकरिता ५०० आणि १ हजार रुपयांच्या चलनाचा मोठ्या प्रमाणात वापर होत होता हे लक्षात घेऊन आर्थिक अराजकता थांबवायची असेल तर हा धाडसी निर्णय घेणे आवश्यक होते. तो निर्णय पंतप्रधानांनी घेतला याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन.

## काळ्या पैशांवर नियंत्रण

मागील दोन वर्षात सरकारने काळा पैसा नियंत्रणात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यासाठी विशेष तपास पथकांची स्थापना (एसआयटी), अघोषित परदेशी उत्पन्न आणि मालमत्ता यासंबंधीचा कायदा तयार करणे, दुहेरी कर टाळण्यासाठी भारत आणि मॉरिशस यांच्यामधील तसेच भारत आणि सायप्रस या देशाशी केलेले करार, स्वित्झर्लँड सरकारशी बँक खात्यासंदर्भात केलेला करार, नॉन कॅश व डिजिटल व्यवहारांना चालना, बेनामी व्यवहार कायद्यात दुरुस्ती व उत्पन्न घोषणा योजना २०१६ यासारख्या विविध उपाययोजना करून केंद्र शासनाने अर्थव्यवस्थेला शिस्त लावली. लोकांना आपल्या संपत्ती आणि अघोषित मालमत्ता घोषित करण्याची संधी देण्याचा प्रयत्न केला. त्याचे महत्त्वाकांक्षी पाऊल म्हणून निश्चलनीकरणच्या निर्णयाकडे पाहावे लागेल.

निर्णयामुळे लगेच सर्व व्यवहार सुरळित होतील. अशातला भाग नाही. सर्वसामान्य माणसाला याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे याचीही आम्हाला जाणीव आहे. पण प्रामाणिक आणि कष्ट करून कमवलेल्या सामान्य माणसाचे यात किंचितही नुकसान होणार नाही. त्याचे पैसे त्याला ३० डिसेंबर पर्यंत नक्की बदलून मिळतील.

## परिस्थितीची सुयोग्य हाताळणी

निश्चलनीकरणाच्या निर्णयामुळे उद्भवलेली परिस्थिती हाताळण्यासाठी आम्ही सतत बँकर्सच्या संपर्कात आहोत, मी स्वतः सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून तेथील परिस्थितीचा आढावा घेत आहे. केंद्रीय अर्थमंत्र्यांशी मी बोललो. त्यांचाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि अजूनही मिळत आहे. आमच्या चांगल्या मागण्या काही तासांच्या कालावधीत त्यांनी मान्य केल्या.

जुन्या ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बदलून नवीन २ हजार आणि ५०० च्या नोटा देण्याचे काम सुरू आहे. सुरुवातीला चलन उपलब्धतेचा जाणवणारा ताण हळूहळू कमी होईल आणि या महिनाअखेरपर्यंत ही परिस्थिती बऱ्यापैकी निवळेल, असा मला विश्वास वाटतो.

## गरजेनुसार अनेक बदल

निर्णय घोषित केल्यानंतर ११ नोव्हेंबर २०१६ रोजी मध्यरात्रीपर्यंत ५०० आणि १ हजार च्या जुन्या नोटा सरकारी रुग्णालये, औषधालये, रेल्वे आणि बस तिकिटाच्या खिडक्या. विमान तिकिट खिडकी, ग्राहक सहकारी सोसायट्या, शासनमान्य दुग्धालये,

## देशातील जनतेने निर्णयाच्या पाठीशी राहावे : मुख्यमंत्री



**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाच्या विरोधात निर्णायक लढाई सुरु केली आहे. आपण सर्व त्यांचे अभिनंदन करू या. हा एक ऐतिहासिक निर्णय आहे. या निर्णयामुळे देशाच्या विकासामधील सर्वात मोठा अडथळा भ्रष्टाचार आणि काळा पैसा हा दूर होणार आहे. म्हणून सामान्य माणसाने या निर्णयाच्या पाठीशी राहिले पाहिजे. नागरिकांना माझी विनंती आहे की, या परिस्थितीत घाबरण्याचे काहीही कारण नाही. आपण कमावलेला पैसा सुरक्षित राहणार असून तो कुठेही वाया जाणार नाही. आपण बँकेत जाऊन ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बदलून घेऊ शकता. या निर्णयामुळे काळा पैसा, बेहिशेबी पैसा बाळगणारे अडचणीत येतील. आपल्याला नोटा बदलवण्यासाठी पुरेसा कालावधी दिलेला आहे. त्यामुळे घाबरण्याचे किंवा गोंधळून जाण्याचे कारण नाही. आपले नियमित व्यवहार जसेच्या तसे आपण चालू ठेवावे.आपला पैसा आपल्यालाच निश्चित मिळणार आहे. या ऐतिहासिक निर्णयाला पाठबळ देऊ या. न घाबरता, न गोंधळता आपले व्यवहार नियमित सुरू ठेवू या.**

पेट्रोलपंप, अशा ठिकाणी स्वीकारत होतो. पुढे ही मुदत १४ आणि आता २४ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली. त्याशिवाय केंद्र आणि राज्य शासन, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, म्हाडा यांचे देय असलेले शुल्क, कर किंवा दंडाची रक्कम ही आपण २४ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत स्वीकारत आहोत. त्याशिवाय वीज आणि पाणी वापरासाठीच्या शुल्काचे देयकही जुन्या ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा देऊन भरता येणार आहे.

शनिवार आणि रविवारी म्हणजे १२ आणि १३ नोव्हेंबरला सर्वसामान्याची गैरसोय होऊ नये म्हणून सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी बँका सुरू ठेवल्या. बँकांची कामकाजाची वेळ एक तासाने वाढवली. राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांवरील टोल २४ नोव्हेंबर २०१६ पर्यंत माफ केले. सामान्यांकडे सुट्ट्या रकमेचा असलेला तुटवडा लक्षात घेऊन वेळोवेळी आवश्यक निर्णय घेतले.

जे रुग्णालये किंवा औषधालये जुन्या नोटा न स्वीकारता रुग्णांची हेळसांड करतील त्यांच्यावर कडक कारवाईचे आदेश दिले. असे त्रास देण्याचे प्रकार घडल्यास १०८ क्रमांकावर नागरिकांनी संपर्क साधून यासंबंधीची माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. रुग्णालयांनी धनादेशाद्वारे रक्कम स्वीकारावी आणि तो चेक बाऊंस झाला तर १० हजार रुपयांपर्यंत ची रक्कम मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून त्या रुग्णालयाला उपलब्ध करून दिली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या टि्वटरवरून सांगितले आहे. एसटीतून ५० किलो वजनाचा शेतमाल मोफत नेण्याची व्यवस्था केली आहे. दुर्गम भागात हेलिकॉप्टरने चलन पुरवठा करण्यासाठी शासन रिझर्व्ह बँकेला मदत करत आहे. हॉस्पिटलच्या ठिकाणी मायक्रो एटीएमच्या मशिन्सची व्यवस्था बँक मित्रांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हे शासन सर्वसामान्य माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

कोणत्याही अनोळखी माणसाकडून नागरिकांनी नोटा स्वीकारू नये. त्या नकली असण्याची शक्यता आहे. नकली नोटा पुन्हा अर्थव्यवस्थेत येऊ द्यायच्या नसतील तर नागरिकांनी एवढे सहकार्य नक्की करावे. गृहखातेही यादृष्टीने अधिक सर्तकतेने काम करत आहे.

समाजात तीन प्रकाच्या प्रवृत्ती असतात एक प्रकृती दुसरी संस्कृती आणि तिसरी विकृती. पहिल्या प्रकारात लोक कष्टकरून प्रामाणिकपणे जीवन व्यतीत करतात दुसऱ्या प्रकारात आपल्या ताटात दोन पोळया असतील तर त्यातील एक समोरच्या भुकेल्या व्यक्तीला देऊन मदत केली जाते तर तिसऱ्या प्रकारात ज्याला विकृती म्हणतात ते दुसऱ्याच्या ताटातील ओढून घेऊन खाल्ले जाते. तिसऱ्या प्रकारच्या प्रवृत्तीला आळा घालायचा असेल तर हा निर्णय महत्त्वाचा होता. आता ही अर्थक्रांती कोणी थांबवू शकणार नाही, देशाची आर्थिक तब्येत सुधारायची असेल तर या औषधाची खूपच गरज होती.

सर्वसामान्यांसाठी लवचीकतेने निर्णय घेत आहोत. सुरुवातीला ४ हजार रुपयांच्या जुन्या नोटा बदलत्या येत होत्या. आता ती




**अनेक अडचणी निर्माण होत असतानाही देशातील १२५ कोटी जनतेने निश्चलनीकरणाच्या निर्णयाचे मनापासून स्वागत केले आहे, ही जनता भक्कमपणे प्रधानमंत्र्यांच्या निर्णयाच्या पाठीशी उभी आहे. लोकांना दैनंदिन व्यवहार करताना अडचणी येत आहेत पण तरीही ते म्हणताहेत, थोडे दिन की तकलिफ है लेकिन मोदीजीने शुरू की हुई यह स्वच्छता मोहिम बढिया है, आगे चलकर इसका आम लोगो को जरूर लाभ होगा, विकास के फल लोगोतक पहुचेंगे, महंगाई कम होगी, आम आदमी का विकास होगा. तो क्या हुआ थोडे दिनोके लिए कष्ट हुए. लोकांच्या या राष्ट्रप्रेमाच्या भावनेला एक कडकडीत सॅल्यूट ठोकावासा वाटतो.**

रक्कम ४५०० इतकी केली आहे. आठवड्यात २० हजार रुपये बँकेतून काढता येत होत्या. ती मर्यादा वाढवून आता आपण २४ हजार इतकी केली आहे. एटीएमवर २ हजार रुपये एका दिवशी काढता येत होती. ती मर्यादा ही २५०० इतकी करण्यात आली आहे. जशा नोटा छापून अधिकच चलन व्यवहारासाठी उपलब्ध होईल तसा व्यवस्थेवर पडलेला ताण कमी होत जाईल व या धोरणामध्ये वेळोवेळी बदल होत जाईल.

### मोठ्या प्रमाणात करवसुली

निश्चलनीकरणामुळे राज्यशासनाकडे मोठ्या प्रमाणात कर वसूल होत आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ हा दिवस सर्वाधिक विक्रीचा दिवस ठरला आहे. यातून वाढीव विक्रीकर राज्याला नक्की मिळेल. जुन्या ५०० आणि १ हजार रुपयांच्या नोटा राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, म्हाडा, पाणी वीज देयके भरण्यासाठी करता येईल असे जाहीर करताच राज्याच्या/पालिकांच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात कर महसूल गोळा झाला आहे.

भविष्यात यात आणखी वाढ होईल. यातून विविध पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आणि जनकल्याणकारी योजना राबवण्यासाठी निधी मिळणार आहे. बँकांची थकीत कर्जे भरल्याने बँकांची आर्थिक सशक्तता वाढली आहे. पुन्हा नव्याने कर्ज देण्यासाठी बँकांकडे निधी उपलब्ध आहे. शासन शेती, शेतीपूरक व्यवसायासाठी अधिक निधी आता देऊ शकेल.

चलन बदलाची प्रक्रिया सुरळितपणे पार पडावी म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने राज्यात प्रत्येक झोनमध्ये तीन गाड्या आणि तीन अतिरिक्त अधिकारी चलन पुरवठ्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. खरे तर हे डिजिटल युग आहे. डिजिटल ट्रान्झॅक्शन्स हा सर्वात सुरक्षित आणि पारदर्शक पर्याय आहे. आजघडीला असे व्यवहार पूर्णत्वाने शक्य नसले तरी डिजिटल मनी, नॉन कॅश व्यवहार हा भारताचा उज्ज्वल भविष्यकाळ आहे. आजही धनादेश, धनाकर्ष क्रेडिट-डेबिट कार्ड मोबाईल व्हॅलेटस आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीने व्यवहार पूर्ण क्षमतेने करता येत आहेत, त्यावर कोणतेही बंधन नाही.

डिजिटल व्यवहारात पैसा कुणाकडून आला आणि कुणाकडे गेला या व्यवहाराच्या स्पष्टता पूर्ण होतात. तसे नोटांच्या व्यवहारात नसते म्हणून गुन्हेगारी विश्व आणि काळ्यापैशाच्या जगतात त्याचा सर्वाधिक वापर होतो. सरकारच्या या निर्णयामुळे श्रमाचा पैसा कमवणाऱ्या आणि प्रामाणिकपणे व्यवहार करणाऱ्याला नक्की प्रोत्साहन मिळेल, यातून अर्थव्यवस्था गतिमान होईल.

आपल्याच देशात तीन देश राहतात. एक गरीब, दुसरा मध्यमवर्गीय तिसरा अतिश्रीमंत. हिंन्दुस्थान, भारत आणि इंडिया या तीन देशातील आर्थिक विषमतेची दरी भयानक आहे. त्यामुळे प्रत्येक देशातील व्यक्तीचे जीवनमान वेगवेगळे आहे. एक माणूस १० हजार रुपये एकवेळच्या जेवणावर खर्च करू शकतो, तर दुसरा माणूस महिनाभर या दहा हजार रुपयात आपले कुटुंब चालवतो. ही दरी इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशात अधिक आहे. हे चित्र बदलून अर्थव्यवस्था योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न केंद्रीय अर्थमंत्री आणि पंतप्रधानांनी केला आहे. आज कधी नव्हे तो आपल्या देशाचा जगभर दबदबा निर्माण झाला आहे. पंतप्रधानांकडे मॅन ऑफ मॅनेजमेंट, मॅन ऑफ डेव्हलपिंग इंडिया म्हणून पाहिले जात आहे, ही अभिमानाची बाब आहे.

**शब्दांकन– डॉ. सुरेखा म. मुळे**
**वरिष्ठ साहाय्यक संचालक (माहिती)**

## भ्रष्टाचाराविरूद्धची लढाई



**निश्चलनीकरणामुळे भ्रष्टाचाराविरूद्धची लढाई सोपी झाली असे वाटते. सुरुवातीच्या काही कालावधीसाठी तरी असे नक्कीच म्हणता येईल. कुणी नदीत हजाराच्या नोटा टाकतेय, कुणी कचरा कुंडीत टाकतेय, कुणी नोटांचे बारीकबारीक तुकडे करून जाळतेय, कुणी असे तुकडे गोण्याभरून फेकून देत आहेत. भ्रष्टाचारी आणि काळा पैशावाल्यांचे धाबे या निर्णयामुळे दणाणले आहे. एका रात्रीत त्यांची करोडोची काळी कमाई कचरा झाली आहे. निवडणुकांमधील घोडेबाजार काही काळासाठी का होईना थांबला आहे. कोणत्याही भ्रष्ट मार्गाने आता निवडणूक जिंकता येणार नाही. प्रामाणिक आणि सशक्त विकासाला आणि विचाराला प्रोत्साहन देणारा उमेदवार या निवडणुकीत निवडून येईल. खरेतर काळा पैसा जाहीर करण्याची संधी पंतप्रधानांनी सर्वांना दिली होती. या संधीचा लाभ ज्यांनी घेतला नाही त्यांची आता खरी अडचण झाली आहे. अडीच लाखापेक्षा अधिक रक्कम बँकेत जमा करणाऱ्यांवर आयकर खात्याची आता करडी नजर आहे. भविष्यात हे टाळायचे असेल तर उत्पन्न जाहीर करून त्याचा वैध कर भरा आणि ३६५ दिवस सुखात झोपा अशी शिकवण देणारा हा निर्णय आहे.**

# बाबासाहेब आणि मंत्रिपद

**घटना समितीमध्ये १७ डिसेंबर १९४६ रोजी बाबासाहेबांनी जे उत्स्फूर्त भाषण केले, त्यामध्ये त्यांच्या चित्तवृत्तीत आयुष्यभर साठवून ठेवलेली वेदना आणि राष्ट्रभक्ती ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळी उचंबळून आल्या. जिव्हाळा आणि जोश यांनी ओतप्रोत भरलेला शब्दांचा तो प्रपात होता. त्या प्रपातात त्यांच्या विषयीचे सर्वच पूर्वग्रह आणि संशय वाहून गेले. घटना समितीचे अध्यक्षपद खरे तर त्याच दिवशी हात जोडून त्यांच्या समोर उभे राहिले होते. २९ ऑगस्ट १९४७ या दिवशी झालेली घोषणा हा केवळ उपचार होता.**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदा मंत्री म्हणून समावेश झाला. या घटनेबद्दल डॉ. सोहनलाल शास्त्री यांनी आपल्या आठवणींच्या पुस्तकात लिहून ठेवले आहे :

'सारा भारत जगत् हैरान था की काँग्रेस का आलोचक और गांधीजी को महात्मा न माननेवाला आंबेडकर भारत मंत्रीमंडळ मे कैसा ले लिया गया!' (१)

हे सोहनलाल शास्त्री बाबासाहेबांच्या अत्यंत विश्वासातले पंजाबी जन्मदलित होते. त्यांचे चार भाषांवर प्रभुत्व होते : (पंजाबी, उर्दू, हिंदी आणि इंग्रजी) मसुदा समितीला अशाच विद्वान आणि विश्वासू अधिकाऱ्याची आवश्यकता होती. म्हणून बाबासाहेबांनीच त्यांची पुढे केंद्रीय कायदा विभागात प्रमुख अनुवादकाच्या पदावर नियुक्ती केली होती.

पहिल्या मंत्रिमंडळाची यादी तयार करण्याचे काम जून-जुलै १९४७ पासूनच सुरू झाले होते. म्हणून धनंजय कीर उपलब्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे लिहितात.

'आंबेडकरांच्या नावाचा सुगावा जून महिन्यापासून वर्तमानपत्रांना लागला होता, असे दिसते. तेव्हा आंबेडकर दिल्लीतच होते. त्यांच्या नियतीचे धागे विणण्याचे काम भर रंगात आले होते. काँग्रेसश्रेष्ठींच्यांमध्ये आंबेडकरांच्या नियुक्तीविषयी दूरध्वनीवरून बोलणी झाली. त्या बोलण्यात प्राथमिक निर्णय घेण्यात आल्यावर पंडित नेहरूंनी आपल्या सचिवालयात आंबेडकरांना बोलावून घेतले. 'स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात विधिमंत्रिपद आपण स्वीकारण्यास तयार व्हाल काय? अशी पृच्छा केली. नेहरूंनी त्यांना असेही आश्वासन दिले की, शेवटी त्यांच्याकडे नियोजन वा विकासखाते देण्यात येईल. आंबेडकरांनी होकार दिला (काँग्रेस पक्षाचा स्वीकार करणार नाही या अटीसह पण या पूर्वअटीची नोंद कीर यांच्या चरित्रात नाही.) पं. नेहरूंनी नियोजित मंत्र्यांची यादी घेऊन, दिल्लीत भंगी कॉलनीत वास्तव्यास असलेल्या गांधीजींची भेट घेतली. गांधीजींनी सुद्धा त्यास संमती दिली.'(२)

**प्रा. दत्ता भगत**

बाबासाहेबांच्या मंत्रिपदाची बातमी वृत्तपत्रात आली त्या दिवशी बाबासाहेब मुंबईत होते. ६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबईतील वकिलांच्या संस्थेने, स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळातील मंत्री म्हणून बाबासाहेबांचा सत्कार केला.

डॉ. धनंजय कीर आणि सोहनलाल शास्त्री यांचे दोन्ही परिच्छेद वाचले, की बाबासाहेबांचे मंत्री म्हणून नाव निश्चित झाले ते जुलैमध्ये यात शंका राहत नाही.

पण ही मंत्रिमंडळाची यादी घेऊन पं. नेहरू गांधीजींची संमती मिळावी म्हणू का गेले? गांधीजी हे काही पटेल नेहरू यांच्यापेक्षा वरील पदावरचे कुणी अधिकारी नव्हते. 'काँग्रेसश्रेष्ठींनी' परस्परांशी चर्चा केली ते कोण? आणि बाबासाहेब हे मंत्रिपद स्वीकारतील की नाही याचा प्रथम अंदाज घेण्यासाठी कुणी प्रयत्न केले? त्यांचे नाव मंत्रिमंडळासाठी कुणी सुचवले? राजकुमारी

अमृता कौर यांनी मंत्रिपदाचे नाव निश्चित होण्यापूर्वी बाबासाहेबांची भेट घेतली, अशीही एक नोंद धनंजय कीरांनी केली आहे. ही भेट कशासाठी होती ?

### पडद्यामागच्या हालचाली

पडद्यामागच्या या हालचाली एवढ्या गतीने का झाल्या ? ह्या घटनेचा उलगडा व्हायचा असेल तर मंत्रिमंडळात बाबासाहेबांचा समावेश होण्यापूर्वी कोणकोणत्या राजकीय घडामोडी झाल्या, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

सन १९४५ मध्ये 'What Congress and Gandhi have done to the Untouchable' हा बाबासाहेबांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात काँग्रेस आणि गांधीजी ह्या दोहोंवर त्यांनी कठोर टिका केली होती. १९४६ मध्ये या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. सप्टेंबर १९४५ मध्ये भारतातील प्रांतिक विधिमंडळासाठी, सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतील; ही घोषणा लॉर्ड वेव्हेल यांनी केली. त्यापुढच्या चार महिन्यात, प्रचारसभांमधून भारतातल्या सर्वच राजकीय पक्षानी परस्परांवर प्रचंड हल्ले केले. काँग्रेसने शेकापच्या पराभवासाठी आकाशपाताळ एक केले. 'बाबासाहेब आंबेडकरांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची धूळधाण झाली' अशा शब्दात धनंजय कीर यांनी या पराभवाचे वर्णन केले आहे. पण त्याहून एक अधिक भयंकर गोष्ट झाली. बाबासाहेबांचा पराभव झाल्यामुळे, घटनासमितीचा सदस्य म्हणून त्यांचे नाव सुचवण्यासाठी; त्यांच्या पक्षाचा एकही सभासद, मुंबई प्रांतात निवडून आला नाही. एवढेच नाही तर बाबासाहेबांचाही या निवडणुकीत पराभव झाला. पुढे 'बंगाल विधिमंडळातील दलित वर्गाच्या प्रतिनिधींनी घटना समितीसाठी आंबेडकरांचे नाव सुचवले. तेथे ते मुस्लीम लीगच्या पाठिंब्याने निवडून आले.' (३)

हा त्यांचा विजय सरदार पटेल, गांधीजी आणि नेहरू यांच्या वर्मी घाव होता. म्हणूनच त्यांची पहिल्या मंत्रिमंडळात वर्णी कशी लागली याविषयी सगळा देश बुचकळ्यात पडला होता. काही झाले तरी त्यांनी लीगचे साहाय्य घेणे, ही काँग्रेस पक्षातील सर्वच पुढाऱ्यांसाठी संतापजनक गोष्ट होती.

### बाबासाहेब मंत्री कसे झाले ?

मग बाबासाहेब मंत्री झाले कसे ? सोहनलाल शास्त्री पुढे लिहितात, 'पाकिस्तान का जख्म अभी तो भरा नाही था , यह संभव है कि डॉ. अंबेडकर अछुतों को हिंदुओ से तोडने के नीती मे दुसरा जीना साबित हो जाए'. (४)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचे आकलन करण्यात शास्त्री इथे कमी पडले. गांधी आणि पटेल ह्यांच्यात असा काही भयगंड निर्माण झाला असेल. हेही खरे वाटत नाही. पण ह्याच संदर्भात मथाई यांची जी आठवण नानकचंद रत्तू ह्यांनी लिहून ठेवली आहे. ती मात्र अत्यंत महत्त्वाची आहे. एम.ओ. मथाई हे या काळात पं. नेहरूंचे पी.ए. होते. बाबासाहेबांच्या निमंत्रणावरून ते बाबासाहेबांकडे आले. गप्पा रंगल्या. गप्पांच्या ओघात बाबासाहेब म्हणाले, 'अलीकडच्या शतकात भारताने निर्माण केलेला सर्वात मोठा माणूस स्वामी विवेकानंद आहेत, गांधी नव्हे. मथाई कांहीसे चकित झाले, म्हणाले, 'तुम्हास सरकारात घ्या असे गांधींनींच नेहरूंना सुचवले होते.' (ही चर्चा झाली तेव्हा गांधी हयात नव्हते) बाबासाहेबांना ही माहिती कदाचित प्रथमच कळत असावी. म्हणून मी माझे विधान बदलले आणि प्रकटपणे म्हटले, 'गांधी आणि नेहरू या दोघांच्याही मनात तो विचार एकाच वेळी आला असावा.' यापुढचे विधान अधिक महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांबद्दल एवढी प्रतिकूल भावना मनात असूनही, गांधी पटेल आणि नेहरू यांना बाबासाहेब मंत्रिमंडळात असावेत असे का वाटले असावे; यावर प्रकाश टाकणारे ते विधान आहे. 'संविधान विधेयकाचे तारू संविधान सभेत मंजुरीचा प्रवास करीत होते. तेव्हा आंबेडकरांनीच त्याच्या बंदर वाटाड्याचे काम केले. (५)

१३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरूंच्या अपूर्व भाषणाच्या पार्श्वभूमीवर, बाबासाहेबांची घटना समितीत जे भाषण केले; ते राष्ट्राच्या दृष्टीने किती महत्त्वाचे होते, हे समजून घेण्यासाठी 'घटना समिती मंत्रमुग्ध झाली.' हे कीर यांचे प्रकरण वाचावे म्हणजे बाबासाहेबांबद्दल गांधी, पटेल, नेहरूंना काय वाटले असावे याची कल्पना आपण करू शकतो. प्रत्यक्ष मसुदा समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी बाबासाहेबांच्या



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शपथ देताना डॉ. राजेंद्रप्रसाद. या वेळी पंडित जवाहरलाल नेहरू उपस्थित होते.**

शिरावर पडली ती २९ ऑगस्ट १९४७ रोजी. म्हणजे प्रत्यक्षात मंत्रिपद स्वीकारल्यानंतर दोन आठवड्यांनी. पण दरम्यान, म्हणजे मंत्रिपद स्वीकारण्याआधी १७ डिसेंबर १९४६ रोजी बाबासाहेबांनी ते भाषण केले. उद्याचा भारत नावाचे राष्ट्र घडवण्यासाठी उत्सुक असलेले, भारताचे ते सर्वपक्षीय दिग्गज त्या सभेत उपस्थित होते. ते भाषण केवळ वक्तृत्वपूर्ण नव्हते. पं. नेहरू हे स्वत:च उत्तम वक्ते पण त्यांच्यानंतर घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी अनपेक्षितपणे बाबासाहेबांचे नाव पुकारले आणि हातात तर

## अदृश्य रूढींच्या कराल भिंती

पण सगळा देशच ज्यांनी अदृश्य रुढींच्या कराल भिंतींनी तुरुंग करून ठेवला होता, त्या तुरुंगातली बाबासाहेबांची यातना अनेकांना कधी जाणवलीच नव्हती. त्यांच्या चित्तवृत्तीत आयुष्यभर साठवून ठेवलेली वेदना आणि राष्ट्रभक्ती ह्या दोन्ही गोष्टी एकाचवेळी उचंबळून आल्या. जिव्हाळा आणि जोश याने ओतप्रोत भरलेला शब्दांचा तो प्रपात होता. त्या प्रपातात त्यांच्या विषयीचे सर्वच पूर्वग्रह आणि संशय वाहून



**चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रामदास आठवले, रावसाहेब दानवे, सुलेखा कुंभारे आदी मान्यवर उपस्थित होते.**

भाषणासाठी टिपणेही नाहीत. डॉ. बाबासाहेब भाषण देण्यासाठी उभे राहिले तेव्हा ते केवळ आता दलितांचे नेते नव्हते. नेहरू, गांधीइतकीच प्रखर राष्ट्रनिष्ठा असलेले आणि उद्याचा भारत कसा असावा याचे आयुष्यभर स्वप्न पहाणारे, चिंतन करणारे पण केवळ जन्मजातीमुळे, सतत ज्यांच्या राष्ट्रनिष्ठेविषयी अनेकांनी संशय व्यक्त करून त्यांना रक्तबंबाळ केले होते; असे बाबासाहेब भाषणासाठी उठून उभे राहिले होते. घटना समितीत निवडलेले आणि तिथे उपस्थित असलेले सर्वच सभासद घटनाशास्त्राचे ज्ञान होते, म्हणून निवडलेले नव्हते तर त्यांनी काँग्रेसच्या लढ्यात तुरुंगवास भोगला होता म्हणून.' (६)

गेले. उद्याच्या घटना समितीचे अध्यक्षपद खरे तर त्याच दिवशी हात जोडून त्यांच्या समोर उभे राहिले होते. २९ ऑगस्ट १९४७ या दिवशी झालेली घोषणा हा केवळ उपचार होता.

## किमान कार्यक्रमावरचे मतैक्य

सत्तास्पर्धेसाठी केलेले पक्षीय 'राजकारण' आणि उद्या सत्ता मिळालीच तर त्यासाठी राबवावयाच्या कार्यक्रमातला पायाभूत 'ध्येयवाद' यातील फरक चटकन ओळखता येत नसतो. सोहनलाल शास्त्रींचा तर्क या दृष्टीने चूक होता. पण पटेल नेहरूंना हा फरक कळावा एवढा त्यांचा बौद्धिक आवाका नक्कीच मोठा होता. समग्र महात्मा गांधी यांचे वाङ्‌मय संपादित करणाऱ्या समितीचे उपमुख्य संपादक डॉ. यू. आर. राव हे काही काळ बाबासाहेबांचे सिडनेहॅममधले विद्यार्थी होते. थॅचर अन्ड कंपनीमध्ये ते प्रकाशन विभागाचे प्रभारी होते. त्या वेळी आपल्या देशाचे कायदामंत्री खास विमानाने मुंबईत आले होते. भारतीय राज्यघटनेच्या प्रतींचे दर्जेदार बायडिंग व्हायला हवे होते म्हणून राव यांच्यावर त्यांनी ती जबादारी सोपवली होती. अशा राव यांचाही लेख नानकचंद रत्तू यांच्या आठवणीवजा ग्रंथात आलेला आहे. प्रख्यात अमेरिकन लेखक आणि पत्रकार व्हिन्सेंट शियान यांचाही आठवणीवजा एक लेख रत्तू यांच्या पुस्तकात आलेला आहे. हे दोन्ही लेख, बाबासाहेबांचे घटना समितीतले ऐतिहासिक भाषण आणि त्यांच्या कृतिशील कार्यक्रमाच्या धक्कातंत्राच्या तळाशी असलेली त्यांची राष्ट्रनिष्ठा; या गोष्टींचा एकसमयावच्छेदेकरून अभ्यास केल्याशिवाय, आपल्या थोर नेत्यांच्या भांडणाचे वरवरचे स्वरूप आपल्या लक्षात येणार नाही. देश घडवणाऱ्या नेत्यांचे मतभेद अत्यंत महत्त्वाचे असतात; पण तेवढेच किंबहुना त्याहून अधिक 'किमान कार्यक्रमावर' आधारलेले त्यांचे मतैक्यसुद्धा, त्यांना समजून घेण्यासाठी खूपच महत्त्वाचे असते. हे ज्या दिवशी आपल्या जनतेला कळेल, त्यानंतरच आपल्या देशातील श्रद्धेय नेत्यांची वाटणी करण्याचे उद्योग थांबू शकतील, असे मला वाटते.

**संदर्भ :**


**१ आणि ४ : 'बाबासाहब डॉ. आंबेडकर के संपर्क मे पच्चीस वर्ष' ले. सोहनलाल शास्त्री भा. बौ. म. स. प्रका. दिल्ली १९७५, पृष्ठ ३१ .**

**२, ३ आणि ६ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर - धनंजय कीर पॉप्युलर प्रकाशन पृष्ठ ४१० आणि ३९४.**

**५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अनुभव आणि आठवणी - मूळ लेखक नानकचंद रत्तु**
**अनु. भा. ल. भोळे साकेत प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ २१० आणि २११.**


(लेखक ज्येष्ठ विचारवंत आहेत.)

# आठवणीतले बाबासाहेब...

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि नागपूर शहराचे वेगळे ऋणानुबंध होते. नागपूर शहराशी संबंधित अनेक आठवणी या संस्मरणीय ठरलेल्या आहेत. यापैकी काही आठवणींचे संकलन..**

### कस्तुरचंद पार्क

रेल्वे स्टेशनपासून थोड्याच अंतरावर पश्चिम दिशेला कस्तूरचंद पार्क आहे. हा पार्क पूर्वी 'मीना बाजार' नावाने ओळखला जायचा. याच कस्तूरचंद पार्कात १९२० च्या सुमारास राजर्षी शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनात बाबासाहेबांच्या विद्वत्तेवर चांगलाच प्रकाश टाकण्यात आला होता. त्यावेळी बाबासाहेब पाश्चात्त्य देशात शिकत होते. तरीपण त्यांच्या विद्वत्तेचा ऊहापोह करण्यात त्याकाळचे लहानमोठे पुढारी उत्सुक होते हे विसरता येणार नाही. जेव्हा जेव्हा बाबासाहेब नागपुरात येत तेव्हा तेव्हा याच कस्तूरचंद पार्कवर ते भाषणे देत. 'मी लढाई हरलो पण युद्ध जिंकणार' हे बाबांचे अनमोल शब्द 'जनता' पत्रकात प्रसिद्ध झाले.

### कॉटन मार्केट

नागपुरमध्ये कॉटन मार्केट रुईगंज येथे शहीद स्मारक चौकाच्या कोपऱ्यावर आहे. ८ ऑगस्ट १९३० ला व्यंकटेश थिएटरमध्ये जी परिषद भरली होती तेव्हा आलेल्या पाहुणे मंडळीची सर्व प्रकारची सोय याच बंगल्यात करण्यात आली होती. या बंगल्याच्या मागच्या व्हांड्यापासून फार मोठा पेंडाल उभारण्यात आला होता. खेड्यापाड्यातील लोक बैलबंड्या व खाचरांनी आले होते. त्यांची सर्व सोय जवळच्या मैदानात केली होती. त्याच मैदानावर आज 'महात्मा फुले मार्केट' वसले आहे. याच बंगल्यात बाबासाहेबांच्या भेटीगाठी व दर्शन लहानमोठ्यांना होत असे.

### व्यंकटेश थिएटर

व्यंकटेश थिएटर नागपुरात चिटणीस पार्कला लागूनच आहे. तेच व्यंकटेश थिएटर 'शाम टॉकीज' म्हणून प्रसिद्ध होते. ८ ऑगस्ट १९३० रोजी नागपूरवासीयांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे या ठिकाणी भव्य स्वागत केले होते.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माईसाहेब आंबेडकर त्यांच्या आवडत्या पिटर या कुत्र्यासोबत.**

बाबासाहेबांना राउंड टेबल परिषदेकरिता लंडनला जायचे होते. त्याप्रीत्यर्थ दलितांनी येथे अधिवेशन भरवले होते. स्वागत समारंभाचा पहिला मान नागपूरवासीयांनी पटकावला. बाबासाहेबांना नागपुरात आणणारे प्रमुख कार्यकर्ते सावजी मून, किसन फागोजी बनसोड, पतितपावन तुलारामजी साखरे, हेमचंद्र खांडेकर, संभाजी गोडघाटे, रामधन माटे, अंतुजी भगत, कवाडे गुरुजी, जयभीमचे जनक लोकप्रिय नेते बाबू एल.एन. हरदास आणि रावसाहेब ठवरे हे प्रमुख होत.

## मिलिंद मानकर

### सिव्हील महापालिकेचे पटांगण

नागपूर जिल्हा कचेरीच्या पूर्वेस सिव्हील महापालिकेच्या सभोवताली असलेल्या पटांगणात १९४२ साली अधिवेशन भरले होते. या ठिकाणी बाबासाहेबांचे १८ जुलै १९४२ रोजी पहिले भाषण इंग्रजीत झाले. सभेच्या अध्यक्षस्थानी रावबहादुर एन. शिवराज होते. त्याच दिवशी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना करण्यात आली. फेडरेशनचा झेंडा निळ्या रंगाचा ठेवण्यात आला. १९ जुलैला बाबासाहेबांनी दुसरे भाषण मराठीत केले. या अधिवेशनात, अस्पृश्यांना पडित जमिनीचे वाटप आणि त्याला लागणारी अवजारे ब्रिटिश सरकारने विनामूल्य द्यावे, असा एक ठराव करण्यात आला.

### नागपूर रेल्वे स्टेशन

१९२२ च्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव हळूहळू लोकांच्या परिचयाचे होत चालले होते. कारण १९२२ साली लंडन नृपति (सार्वभौम सत्ता चालवणारा) बादशाह पंचम जॉर्ज यांचा मोठा मुलगा हे नागपूर रेल्वेस्टेशनचे उद्घाटन करण्यासाठी आले होते. त्यांच्यासमवेत डॉ. आंबेडकर सरकारी पाहुणे म्हणून होते. तेव्हा ते विद्यार्थीदशेत होते. नागपुरात त्यांचा कोणाशीही परिचय नव्हता. तरीपण आंबेडकर नावाचा एक मुलगा युवराजसोबत आला आहे. तो शिक्षणात फार हुशार आहे. त्यांच्यासारखा विद्वान भारतात नाही अशा प्रकारची वार्ता सर्वत्र पसरली होती. एम. एस्सी., बार-ॲट-लॉ, डी.एस्सी. या पदव्यात ते उत्तीर्ण झाले होते. एवढे असूनही बाबासाहेब पुढे शिकतच होते. त्यांना बघण्यासाठी त्यावेळी समाजातील लोकांनी रेल्वेस्टेशनवर प्रचंड गर्दी केली होती.

**(लेखक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणींचे संग्राहक आहेत.)**

# आपुलकीचा गोडवा



**रामराजे नाईक-निंबाळकर**
(सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद)

> **विधिमंडळाचे अधिवेशन मग ते मुंबईतील असो वा नागपुरातील, सभागृहात समन्वय आणि संतुलन ठेवण्याची अत्यंत महत्त्वाची अशी घटनादत्त जबाबदारी विधानपरिषदेचे सभापती आणि विधानसभेचे अध्यक्ष यांना पार पाडावी लागते. सत्ताधारी बाजू आणि विरोधी बाजू यांच्यात संतुलन, सामंजस्य आणि सौहार्दता राखत जनतेच्या प्रश्नांना न्याय कसा मिळेल याची काळजी पीठासीन अधिकारी येत असतात.**

नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या संपूर्ण कालावधीत उर्वरित महाराष्ट्रातील प्रश्न सभागृहात चर्चेला येत असले तरी सर्वसाधारण फोकस विदर्भावरच असतो. अधिवेशनाच्या निमित्ताने विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळतो. सभागृहात सदस्यांना त्यानिमित्ताने समस्या मांडण्याची, सरकारला उपाय-योजना सुचविण्याची संधी मिळते. विदर्भात अधिवेशन होत असल्यामुळे शासनाकडून देखील अशा चर्चांना, प्रस्तावांना सकारात्मक प्रतिसाद दिला जातो आणि काही वेळा मोठ्या योजना, पॅकेजेस, निधीची तरतूद होत असते. मध्य प्रातांच्या राजधानीवरचा हक्क नागपूरकरांनी सोडला आणि विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला. त्यावेळी झालेल्या नागपूर करारानुसार हे अधिवेशन दरवर्षी नागपूर मध्ये भरते.

### भावनात्मक ऐक्यावर भर

तत्कालीन मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी यासंदर्भात १२ ऑगस्ट १९६० साली विधानपरिषदेत केलेले भाषण अत्यंत पथदर्शक आहे. नागपूर कराराच्या परिपूर्ततेसाठी नागपूर येथे दरवर्षी एक अधिवेशन भरावे, या प्रस्तावावर भाषण करताना त्यांनी भावनात्मक ऐक्यावर जास्त जोर दिला आहे. नागपूरला एक अधिवेशन व्हावे मात्र महाराष्ट्राचे स्वरूप एकजिनसी राज्यासारखेच असावे असे त्यांनी सांगितले.

अधिवेशन झाले म्हणजे समस्या सुटल्या असे होत नाही आपल्याला माहीत आहे की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदतीसाठी पैसे येतात. परंतु ते पैसे खर्च न होताच परत जातात. अधिवेशनातील अशा संवेदनशील प्रश्नांवरील चर्चा अणि या प्रश्नांच्या निराकरणासाठी आखावयाच्या उपाययोजना यांच्यामध्ये अंतर राहता कामा नये, असे माझे स्पष्ट मत आहे. अधिवेशनात एकदा धोरण निश्चिती, उपाय योजना, लाईन ऑफ ॲक्शन निश्चित झाल्यावर त्याची अंमलबजावणी ही तितक्याच तीव्रतेने व काळजीपूर्वक व्हायला हवी.

### समित्यांचे योगदान

विधिमंडळ कामकाजात विविध समित्यांचे योगदान महत्त्वाचे असते. तीन अधिवेशनाच्या कालावधीव्यतिरिक्त मधल्या काळात



समित्यांच्या माध्यमातून अंकुश ठेवण्याची कार्यवाही त्याद्वारे होत असते. सरकारच्या चांगल्या योजना, मागासभागांसाठीच्या विशेष उपाययोजना, वित्तीय तरतूद याबाबतीत गैरव्यवस्था उद्भवू नये, या दृष्टीने समित्यांचे




कामकाज आणि नियंत्रण महत्त्वाचे आहे असे मला वाटते. Parliament demonstrates in the House and it functions and works in Committees असे म्हटले जाते. मागास भागाला न्याय मिळण्याच्या दृष्टीने माझी एकसूचना अशी आहे की, काही महत्त्वपूर्ण विधिमंडळ समित्यांच्या बैठका नागपूर अधिवेशनकाळातदेखील व्हाव्यात.

साधारणपणे अधिवेशन कालावधीत विधिमंडळ समित्यांच्या बैठका होत नाहीत. मात्र सभागृहासमोरील अधिकचे कामकाज जसे रात्री उशिरापर्यंत थांबून आपण पूर्ण करतो, अगदी त्याप्रमाणे लोकहिताशी संबंधित महत्त्वाचे विषय तातडीने मार्गी लागावेत, मागास भागातील प्रश्न तातडीने सुटावेत यासाठी संबंधित समित्यांच्या नियमित बैठका नागपूर अधिवेशन काळात सुद्धा घेण्यात याव्यात.

## विकासकामांसाठी पाठपुरावा

**अनुशेष दूर करण्यासाठी विदर्भात अनेक मोठे प्रकल्प आणि योजना सुरू आहेत. बहुतांश योजनांसाठी या अधिवेशनांच्या माध्यमातूनच पाठपुरावा झाला आहे, अधिकचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यामुळे विदर्भातील प्रश्नांना नागपूर हिवाळी अधिवेशनात न्याय देण्याचा प्रयत्न निश्चित स्वरूपात होतो. पीठासीन अधिकारी म्हणून यासंदर्भातील प्रश्नांना सभागृहात न्याय कसा मिळेल या दृष्टीनेच माझा प्रयत्न असतो.**



विधानभवन, नागपूर

### आठवणींचा खजिना

माझ्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक जीवनाच्या वाटचालीत नागपूर अधिवेशनाशी निगडित खूप आठवणी आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कितीही प्रगती झाली तरी शेवटी फेसबुकवरील भेटीपेक्षा फेस टू फेस भेटीचा आपुलकीचा गोडवा वेगळा असतोच असतो. नागपूर अधिवेशनाच्या निमित्ताने सर्वांचा जवळपास तीन आठवडे तेथे मुक्काम असतो शिबीर कार्यालय, शिबीर निवासस्थान ही नावे याकाळातील वास्तव्याला एक वेगळे परिमाण देऊन जातात.

मला याकाळातील वास्तव्यात विविध पक्षातील लोकप्रतिनिंधीशी, विदर्भातील नामवंतांशी संवाद साधण्याची संधी मिळते. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी सांगितलेला भावनिक ऐक्याचा मुद्दा या ठिकाणी मला पुन्हा अधोरेखित करावासा वटतो.

नागपूर अधिवेशनासंदर्भात एक दुःखद आठवणदेखील मन विषण्ण करते. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी देशाची आर्थिक राजधानी मुंबईवर अतिरेक्यांनी हल्ला केला, त्यावेळी नागपूर अधिवेशनाची तारीख अगोदर जाहीर झाली होती. मात्र त्यानंतरच्या विलक्षण वेगवान घडामोडींमुळे नागपूर अधिवेशनाची तारीख तीन वेळा बदलावी लागली. राज्यपाल महोदयांनी तीन वेळा अधिवेशनाचे समन्स काढले.

या अधिवेशनाच्या निमित्ताने विकासाचा असमतोल दूर व्हावा आणि त्याचप्रमाणे प्रादेशिक असमतोल, भेदाभेदाची भावनाही लोप पावत जावी ही अपेक्षा.


**शब्दांकन: निलेश मदाने**

**(लेखक महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)**

# समन्वय आणि संतुलन



**हरिभाऊ बागडे**
(अध्यक्ष, विधानसभा)

**नागपूरमध्ये विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन का घेतले जाते, यामागे एक इतिहास आहे. दर अधिवेशनाच्या वेळी सर्व सदस्यांनी यामागील भूमिका लक्षात घेऊन कामकाजामध्ये सहभाग नोंदवणे अपेक्षित आहे. नागपूर करारानुसार तीनपैकी एक अधिवेशन नागपुरमध्ये घेण्यात येते. त्या करारानुसारच विदर्भाचा सर्वांगीण विकास करण्याचे दायित्व केवळ विदर्भाचेच नव्हे, तर संपूर्ण सभागृहातील सदस्यांचे आहे.**

नागपूर नगरी अगोदर मध्यप्रांताची राजधानी होती. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन यशस्वी झाल्यावर विशाल आणि एकसंघ महाराष्ट्राचे स्वप्न साकार व्हावे या दृष्टीने हा प्रदेश महाराष्ट्रात विलीन झाला. त्या वेळी झालेल्या नागपूर करारानुसार ३ पैकी १ अधिवेशन नागपूरात घेण्याचे ठरले. सन १९६० पासून काही अपवाद वगळता नागपूर हिवाळी अधिवेशनाची व्यवस्था कायम राहिली आहे. यानिमित्ताने विदर्भाशी संबंधित असलेले प्रलंबित प्रश्न चर्चेस घेतले जातात, त्यांना न्याय मिळतो आणि हिवाळी अधिवेशनामागील हेतू साध्य होण्यास मदत होते. अधिवेशनाचा कालावधी २ ते ३ आठवड्यांपेक्षा पुढे सरकत नाही ही वस्तुस्थिती आहे. उर्वरित महाराष्ट्रातील आमदारांची उपस्थिती नंतरनंतर कमी होत जाते, त्यामुळे अधिवेशनाच्या तारखा ठरवताना त्याचाही विचार करावा लागतो. यंदा नगरपालिका निवडणुकांमुळे हा कालावधी दोन आठवड्यांचा ठेवण्यात आला आहे.

## एकत्रित बदलांचा परिणाम

१९८५ साली विधानसभेत निवडून आल्यानंतर आमदार म्हणून प्रथम नागपूरला गेलो ते अधिवेशन अजूनही आठवते. तेव्हा सभागृहातील संख्या आणि थंडी चांगली असायची. आता दोन्हीही कमी होत चालले आहे. सभोवतालच्या एकत्रित बदलांचा हा परिणाम आहे. आपण ज्या विषयावर बोललो त्या विषयासंदर्भात मंत्री महोदय काय उत्तर देतात, ते ऐकून घेण्यासाठी आपण सभागृहात उपस्थित असले पाहिजे, आपण मांडलेल्या मुद्द्यांचा उत्तरात परामर्श घेतला गेला आहे किंवा नाही हे बघितले पाहिजे, अशी मानसिकता तेव्हा होती. आता सदस्यांना असे काही वाटेलच असे नाही. याला काही आमदारांचा निश्चितच अपवाद आहे. संसदीय कामकाजाची आवड असणारे आमदार उशिरापर्यंत सभागृहात थांबतात हे निश्चितच स्वागतार्ह आहे.



## अभ्यास आणि तयारी

विधेयकांवर अभ्यासूपणे बोलण्यासाठी पूर्वी ठरवून तयारी केली जायची, आता ती संख्या कमी होत आहे. विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यावर त्याचा दीर्घकालीन परिणाम राज्यातील जनतेवर होत असतो. जनअपेक्षांच्या पूर्ततेसाठी त्यानुसार कायदे करणे हे विधानमंडळाचे महत्त्वाचे कार्य आहे. त्यामुळे विधेयकांवर सभागृहात अभ्यासपूर्ण विवेचन अधिक प्रमाणात व्हायला हवे असे माझे

प्रांजळ मत आहे.

## संवेदनशीलता आणि सहभाग

मला प्रकर्षाने जाणवणारी एक गंभीर बाब म्हणजे मतदारसंघाशी संबंधित प्रश्न असेल तर सदस्य त्या वेळच्या चर्चेमध्ये अधिक रुची घेतात, हे योग्यच आहे, परंतु अन्य भागातल्या ज्वलंत प्रश्नांसंदर्भातही अशीच संवेदनशीलता आणि सहभागाची भूमिका ठेवली जावी. संपूर्ण राज्याचे हित डोळ्यासमोर ठेवून विषय आणि प्रश्नांची मांडणी होणे महत्त्वाचे आहे.

## विदर्भाला न्याय

गेल्या ३० वर्षांपासून मी हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने नागपूरला जात आहे. विदर्भाला खरोखरच न्याय मिळतो आहे का? अधिवेशनात मागास विभागाचे प्रश्न चर्चिले जातात. मागास विभागासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूदही केली जाते मात्र ती खर्चही होत नाही, कारण मनुष्यबळ कमी आहे. विकासकामांवर पुरेसा खर्च न झाल्याने अनुशेष कायम राहत गेला. शेवटी प्रगती ही शेती उत्पादनाशी निगडित असते, उत्पादन वाढते ते सिंचन सुविधेमुळे. ती योग्य असेल तर पीकपाणी चांगले येऊन राहणीमान सुधारते, शैक्षणिक सुविधा देता येतात. नव्या पिढीला चांगली नोकरी, व्यवसाय मिळू शकतो. या दृष्टीने विदर्भात शेतीचा विकास झालेला दिसून येत नाही, परिणामी क्रयशक्ती कमी होऊन मागासलेपणाचे दुष्टचक्र सुरूच राहते. या परिस्थितीत निश्चितच बदल होत आहे, परंतु त्याची गती आणखी वाढायला हवी.



**विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांचे स्वागत करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. यावेळी संसदीय कामकाज मंत्री गिरीश बापट उपस्थित होते.**

नागपूर अधिवेशनाशी निगडीत स्मृतिपटलावर कोरल्या गेलेल्या अनेक आठवणी आहेत. त्यात डिसेंबर १९९४ मध्ये गोवारी बांधवांच्या मोर्च्यावर झालेला लाठीमार आणि चेंगराचेंगरीत झालेला अनेकांचा मृत्यू ही अत्यंत वेदनादायी आठवण विसरली जाणे शक्य नाही. शुक्रवारी ही घटना घडली आणि त्यानंतर सोमवारी या घटनेवर चर्चा उपस्थित झाली. अनेकांनी त्यात भाग घेतला. ही घटना टाळता यायला हवी होती अशाच भावना सर्वांनी व्यक्त केल्या. त्याचप्रमाणे १९८७ साली कर्ज मुक्तीसाठी भारतीय जनता पार्टीने नागपूर अधिवेशनावर प्रचंड मोर्चा नेला होता. त्यानंतर याविषयावर सभागृहातही चर्चा घडवून आणण्यात आम्ही यशस्वी झालो.

अधिवेशनात सभागृहातील चर्चा आणि घडामोडींचे आपण थेट प्रक्षेपण करीत आहोत. त्यामुळे जनसामान्यांना घरी टीव्हीसमोर बसून सभागृहातील कामकाज बघता येते. आपले लोकप्रतिनिधी सभागृहात काय काम करतात याकडे जनतेचे बारीक लक्ष असते. त्यामुळे या अधिवेशनात सभागृहातील उपस्थिती तसेच कामकाजातील सदस्यांचा सहभाग वाढावा अशी माझी यानिमित्ताने अपेक्षा आहे.

# उत्तम संसदीय परंपरा



**देवेंद्र फडणवीस**
(मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)

**गेली दोन्ही हिवाळी अधिवेशने तीन आठवड्यांसाठी घेऊन या संपूर्ण कालावधीत विदर्भाच्या विकासासह विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी जाणीवपूर्वक व गांभीर्याने प्रयत्न केले गेले आहेत. विदर्भाच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या बाबींवर रचनात्मक काम व्हावे, हाच आमचा हेतू राहिला आहे. त्यासाठी आवश्यक असणारी इच्छाशक्ती आम्ही निश्चितच दाखवली आहे.**

महाराष्ट्र विधानमंडळ देशात वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्राच्या सार्वत्रिक प्रागतिकतेचे प्रतीक शोभणारे हे विधानमंडळ उत्तम संसदीय परंपरा आणि लोकशाही व्यवस्थेपुढे आदर्श संकेत निर्माण करणारे ठरले आहे. मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या स्थापनेपासून सुरू झालेली महाराष्ट्र विधानमंडळाची गौरवास्पद परंपरा १५४ वर्षांच्या दीर्घ वाटचालीत अधिकाधिक प्रगल्भ होत गेली.

### तीन ठळक टप्पे

या वाटचालीचे तीन ठळक टप्पे मला जाणवतात. त्यात १८६२ ते १९३७ या पाऊणशतकी वाटचालीचा पहिला टप्पा, १९३५ च्या भारत सरकार कायद्यानुसार १९३७ मध्ये अस्तित्वात आलेले मुंबई प्रांताचे सभागृह आणि महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर १९६० पासून आजतागायत अशा तीन टप्प्यात विधानमंडळाच्या वाटचालीचे अवलोकन करता येते.

### अधिवेशनाची मुहूर्तमेढ

नागपूर येथे होणारे विधिमंडळ अधिवेशन हे तिसऱ्या टप्प्यात अंतर्भूत झाले आहे. २८ सप्टेंबर १९५३ रोजी झालेल्या ऐतिहासिक नागपूर कराराने या अधिवेशनाची मुहूर्तमेढ रोवली. या कराराप्रमाणे विधानमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. याबाबत १२ ऑगस्ट १९६० रोजी विधानमंडळात चर्चा झाली. त्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी केलेल्या आपल्या धोरणविषयक निवेदनात राज्याची भूमिका विस्ताराने मांडली. त्यानंतर १० नोव्हेंबर १९६० रोजी नागपूर येथे विधिमंडळाचे पहिले अधिवेशन झाले.

### अव्याहत परंपरा

गेली ५६ वर्षे ही परंपरा अपवाद वगळता अव्याहत पाळण्यात येत आहे. प्रत्येक अधिवेशनाच्या निमित्ताने त्याच्या उपयुक्ततेबाबत चर्चा केली जात असते. तसेच अनेक प्रश्नही त्यानुषंगाने उपस्थित होतात.

विदर्भातील संत्रा उत्पादकांचे प्रश्न, शेतकरी-कास्तकारांचे प्रश्न, तेंदुपत्ता उत्पादकांच्या मागण्या, कुपोषण-आदिवासींचे प्रश्न, दुष्काळ, सिंचनविषयक प्रस्ताव अशा काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाल्या आहेत. मात्र,या अधिवेशनाने अधिक प्रभावी योगदान देणे अपेक्षित होते. वस्तुतः महाराष्ट्रात सहभागी झाल्यानंतर विदर्भाचे उर्वरित भागाशी स्थापित झालेले नाते अधिक दृढ करण्याचे माध्यम म्हणून, महत्त्वपूर्ण ठरू शकणारे हे अधिवेशन; त्यासोबतच अधिक जबाबदारीने अभिव्यक्त होणे, अपेक्षित होते.

### लोकशाहीचे मंदिर

विधानभवन हे लोकशाहीचे मंदिर असते. जनतेचे प्रश्न या मंदिरातच सुटले पाहिजेत. संसदीय लोकशाहीची विश्वासार्हता कायम राहण्यासाठी विधिमंडळांनी संवेदनशील सकारात्मकता दाखवलीच पाहिजे, अन्यथा लोकांचा त्यावरील विश्वास उडेल आणि विधिमंडळाऐवजी रस्त्यावर येऊन प्रश्न सोडवण्याची भावना बळावेल. या निकषावर नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनाचे मूल्यात्मक योगदान तपासले असता ते अधिक समाधानकारक ठरू शकले असते.

विशेषतः विदर्भाच्या जनतेच्या आशा-आकांक्षांचे पुरेपूर प्रतिबिंब या अधिवेशनाच्या कामकाजात उमटायला हवे होते. अर्थात ही जबाबदारी दोन्ही बाजूंची आहे. ती ज्याप्रमाणे सरकारची आहे त्याचप्रमाणे ती विदर्भासह इतर भागातील लोकप्रतिनिधींचीही आहे.

विरोधी पक्षाचा जबाबदार सदस्य म्हणून मी स्वतः तीन विधानसभा कालावधीत नागपूर हिवाळी अधिवेशनात सक्रिय राहिलो. त्या वेळी या अधिवेशनाच्या आयोजनामागच्या हेतूला न्याय देण्यासाठी निष्ठेने प्रयत्न केले. आता भूमिका आणि जबाबदारीत बदल झाला असून सरकारचे नेतृत्व करताना अधिक मोठ्या जबाबदारीने विदर्भाच्या जनतेच्या

आकांक्षांना न्याय देण्याचे काम आपले सरकार करत आहे.




### जाणीवपूर्वक व गांभीर्याने प्रयत्न

गेली दोन्ही हिवाळी अधिवेशने तीन आठवडे कालावधीसाठी घेऊन या संपूर्ण कालावधीत विदर्भाच्या विकासासह विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी जाणीवपूर्वक व गांभीर्याने प्रयत्न केले आहेत. विदर्भाच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या बाबींवर रचनात्मक काम व्हावे, हाच आमचा हेतू राहिला आहे. त्यासाठी आवश्यक असणारी इच्छाशक्ती आम्ही निश्चितच दाखवली आहे.

### विशेष बैठका

यासोबतच या अधिवेशनाच्या कालावधीत विदर्भातील प्रत्येक जिल्ह्याबाबत स्वतंत्रपणे विचारमंथन करण्यासाठी विशेष बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि सरकार अशा तिन्ही पातळ्यांवर उपयुक्त विचारविमर्श झाला. त्यात त्या-त्या जिल्ह्यातील विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ठोस अशी कार्यवाही सुरू करण्यात आली.

विदर्भातील सर्व अकरा जिल्ह्यांतील रस्ते, शेती, उद्योग, वीज, पाणी-सिंचन आदींशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यासह लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन त्याबाबत पुढील कृतीची दिशा निश्चित करण्यात आली.

### चित्र बदलणार

गेल्या दोन वर्षात विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या विकासासाठी करण्यात येत असलेल्या सूत्रबद्ध प्रयत्नांमुळे या भागांचे, यापूर्वीचे चित्र भविष्यात निश्चितच बदलणार आहे. शेतीचा शाश्वत विकास करण्यासह तिच्यात दीर्घकालीन गुंतवणूक करून, विदर्भातील शेतकरी आत्मनिर्भर करण्याचा आमचा प्रयत्न अधिकाधिक कृतिशील होऊ लागला आहे. गेल्या काही वर्षात निर्माण झालेल्या कृषी अरिष्टाची सर्वात मोठी किंमत त्याला चुकवावी लागली आहे; या वास्तवाची जाणीव आम्हाला असल्याने त्याच्या जीवनमानात बदल घडवून आणण्यास आम्ही सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्या दृष्टीने कृषी, सिंचन, उद्योग, परिवहन आदी क्षेत्रात महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन, त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे. विदर्भाचाच नव्हे तर महाराष्ट्राचाच चेहरा मोहरा बदलवू शकणाऱ्या प्रकल्पांची पायाभरणी करण्यात येत आहे.

नागपूर एक परिपूर्ण स्मार्ट शहर म्हणून जगाच्या नकाशावर लवकरच झळकणार आहे. गडचिरोली-मेळघाटातल्या अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधवांचा विकास, हे आमचे विकासाच्या प्रक्रियेचे परिमाण आहे. या निकषावर विदर्भाचा विकास होऊ शकला तरच या अधिवेशनासाठी झालेला यातायात सार्थकी लागू शकतो.




गेल्या महिन्यात औरंगाबाद येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन मराठवाड्याचा सर्वांगीण विकास घडवू शकणारे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. महाराष्ट्राच्या सर्व भागातील जनतेच्या आकांक्षांना न्याय देण्यात आम्ही यशस्वी ठरणार आहोतच, याची आम्हाला खात्री आहे. नागपूर येथे होणारे अधिवेशन अशा साऱ्या आशाआकांक्षांचे निश्चितच प्रतीक ठरेल, असा विश्वास वाटतो.




**शब्दांकन: हेमराज बागुल**
**(लेखक मा. मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)**

# विदर्भ समजला...



राधाकृष्ण विखे-पाटील
(विधानसभा विरोधी पक्षनेते)

> मी आजवर २१ हिवाळी अधिवेशनांमध्ये सहभागी झालो आहे. यंदाचे माझे २२ वे वर्ष असेल. या अधिवेशनांबाबत माझा अनुभव चांगला आहे. मी उत्तर महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातून येतो. मुंबई-पुण्याशी बालपणापासून संपर्क आहे. त्यामुळे आमदार झालो तेव्हा या भागातील प्रश्नांची बऱ्यापैकी जाणीव होती. नागपूर अधिवेशनाच्या माध्यमातून मला विदर्भही तितक्याच सखोलतेने समजून घेता आला.

कायदेमंडळ अधिवेशनाच्या माध्यमातून राज्याच्या कान्याकोपऱ्यांतील जनतेला आपले प्रश्न मांडायचे असतात. त्यासंदर्भात पाठपुरावा करायचा असतो. नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विदर्भातील शेतकरी आणि नागरिकांना यासाठी हक्काची संधी मिळते.

## सयुक्तिक व्यवस्था

महाराष्ट्र राज्याची उपराजधानी नागपूर येथे दरवर्षी होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाला महाराष्ट्र राज्याच्या आणि विधिमंडळ कामकाजाच्या दृष्टीने मोठे महत्त्व आहे. १ मे १९६0 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर नागपूर करारानुसार, दरवर्षी हे अधिवेशन होत आले आहे. सुमारे ३ लाख वर्ग किलोमीटरहून अधिक क्षेत्रफळ आणि १२ कोटीहून अधिक लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्यात मुंबई आणि नागपूर या दोन शहरांमध्ये राज्य विधिमंडळाची अधिवेशने होतात, हे सयुक्तिकच आहे. कायदेमंडळ अधिवेशनाच्या माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यातील जनतेला आपले प्रश्न मांडायचे असतात. त्या संदर्भात पाठपुरावा करायचा असतो. नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विदर्भातील शेतकरी आणि नागरिकांना यासाठी हक्काची संधी मिळते. साहजिकच सरकार आणि सर्वच लोकप्रतिनिधींसह राज्यातील जनतेसाठी हे अधिवेशन महत्त्वाचे असून, त्यामुळे या अधिवेशनात विदर्भासह संपूर्ण राज्यातील प्रश्नांवर चर्चा होऊन नागरिकांच्या समस्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जातो.

११ जिल्ह्यांचा आणि नागपूर व अमरावती अशा दोन महसुली विभागांचा विदर्भ वैविध्याने नटलेला आहे. विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यात विभिन्न पद्धतीचे, विविध भाषा व बोलींचे लोकजीवन व संस्कृती आहे. साहजिकच आमगावपासून खामगावपर्यंत आणि आर्णीपासून धारणीपर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न आहेत. गडचिरोली व मेळघाटात आदिवासी आहेत. पूर्व आणि पश्चिम विदर्भातील पिके वेगवेगळी आहेत. विदर्भात विविध बोली भाषेतील मराठी आणि जोडीलाच नागपूर परिसरात हिंदी भाषा मोठ्या प्रमाणात बोलली जाते. अशा बहुरंगी विदर्भातील





प्रश्नदेखील वेगवेगळ्या प्रकारचे असतात आणि साहजिकच नागपूर येथे हिवाळी अधिवेशन होत असल्याने विदर्भातील सर्वच प्रश्नांना वाचा फोडण्याची संधी उपलब्ध होते.

## प्रश्नांची जाण

संपूर्ण आयुष्य मुंबईत गेले आहे किंवा जे कोकणासारख्या दूरवरच्या भागाचे प्रतिनिधित्व

करतात, त्या सर्वांनाच विदर्भ आणि विदर्भातील समस्या समजून घेण्याची संधी नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या माध्यमातून उपलब्ध होते. एक आमदार विधिमंडळात भलेही त्याच्या विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत असतो. परंतु, सभागृहातील त्याचे योगदान केवळ त्याच्या मतदारसंघापुरते किंवा जिल्ह्यापुरते मर्यादित राहू नये; तर ते संपूर्ण महाराष्ट्र डोळ्यासमोर ठेवून असले पाहिजे, अशी माझी भावना आहे. नागपूर अधिवेशनाच्या माध्यमातून संपूर्ण राज्याचा व्यापक विचार करणारी हीच भावना अधिक मजबूत होते, असा माझा ठाम विश्वास आहे.





## महत्त्वाची भूमिका

नागपूर हिवाळी अधिवेशनात राज्याचे प्रश्न असतातच. सोबतच विदर्भातील प्रश्नही तितक्याच गंभीरतेने मांडले जातात. त्यामुळे हे अधिवेशन नक्कीच राज्याच्या समतोल विकासाच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावणारे ठरले आहे. नागपूरला असताना विदर्भाच्या अनेक जिल्ह्यातील लहानमोठे प्रश्न समोर येतात. संबंधितांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळते. त्यांच्या समस्या त्याच अधिवेशनात मार्गी लावण्याचे प्रयत्न केले जातात. त्यामुळे हे अधिवेशन नक्कीच विदर्भासाठी उपयोगी सिद्ध झाले आहे.

मी मंत्री म्हणून कार्यरत असताना विदर्भातील अनेक प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. मी अमरावती जिल्ह्याचा पालकमंत्रीसुद्धा राहिलो आहे. त्यामुळे मागील काही वर्षांमध्ये विदर्भाशी माझे नाते चांगलेच घट्ट झाले आहे.

## मोठी स्थित्यंतरे

नागपूरमधील हिवाळी अधिवेशन अनेकदा राज्यासाठी मोठी राजकीय स्थित्यंतरे घडवणारी ठरली आहेत. अनेकदा या स्थित्यंतरांनी राज्याची राजकारणाची दिशा बदलली आहे.

२०१४ मध्ये हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. विरोधी पक्षनेता म्हणून २०१५ चे अधिवेशन माझे पहिलेच अधिवेशन होते. त्या अधिवेशनात प्रामुख्याने शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जमाफीची मागणी, संत्रा व इतर शेतीमालांचे कोसळलेले भाव, आदिवासी विभागातील भ्रष्टाचार, नागपूर शहरातील वाढती गुन्हेगारी आदी विषय प्रामुख्याने चर्चेत राहिले.

## डिजिटल डाटा

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने दरवर्षी सरकारचे सचिवालय, संपूर्ण विधिमंडळ मुंबईहून हलवले जाते. हे काम अत्यंत वेळखाऊ आणि तितकेच खर्चीक आहे. त्यामुळे सरकारने सचिवालय, विधिमंडळ सचिवालय आणि ग्रंथालय तातडीने डिजिटल करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू केले पाहिजे. युद्धपातळीवर काम झाले तर कदाचित वर्ष-दोन वर्षात हिवाळी अधिवेशनासाठी मुंबईहून नागपूरला पाठवले जाणारे ट्रक मोठ्या प्रमाणात कमी झालेले असतील. हाच डेटा शेअर करून पुढील काळात शासनाचे अनेक निर्णय




विभागीय आणि जिल्हा पातळीवरच घेणे शक्य होऊ शकेल. अंतिम निर्णयासाठी फाईली मुंबईला नेण्याची गरज कमी होईल. त्यामुळे नागपूर अधिवेशनाच्या निमित्ताने सरकारने याबाबत निर्णय घ्यावा आणि प्रशासकीय कामकाजाला गती द्यावी.

महाराष्ट्र शासनाची अनेक आयुक्तालये आणि संचलनालये मुंबई व पुण्यातच स्थापन झालेली आहेत. यातील विदर्भाशी आणि मराठवाड्याशी निगडित महत्त्वाची कार्यालये त्या-त्या विभागात हलवण्याबाबत सर्वसहमती निर्माण करण्याची गरज आहे. मी कृषी मंत्री असताना कृषी आयुक्तालय पुण्याहून हलविण्यासंदर्भात पुढाकार घेतला होता. ते अपुरे राहिलेले काम या सरकारने पूर्ण केल्यास मला आनंद मिळेल.

## विदर्भातील प्रश्नांना प्राधान्य

नागपूर अधिवेशनामध्ये विदर्भातील प्रश्नांना प्राधान्य मिळाले पाहिजे, अशी या भागातील जनतेची अपेक्षा असते. विदर्भावरील चर्चांना जास्तीत जास्त वेळ दिला गेला पाहिजे. मंत्रिमंडळाच्या बैठकी नागपुरात झाल्या पाहिजेत. नागपूर करारानुसार हिवाळी अधिवेशन सहा आठवडे चालायला हवे. महाराष्ट्राची सध्याची परिस्थिती बघता पुढील हिवाळी अधिवेशन अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्यासमोर अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. शेती, अर्थव्यवस्था आणि सरकारच्या कारभारासह अनेक सामाजिक प्रश्नांवर चर्चा झाली पाहिजे. राजकारण बाजूला ठेवून आवश्यक त्या ठिकाणी सरकारशी संघर्षाची भूमिका घेतली. परंतु, सरकार चांगले काम करीत असेल तर त्या ठिकाणी त्यांना सहकार्य करण्याचे आमचे धोरण आहे.

**शब्दांकन: अभिजित देशमुख**
**(लेखक माध्यम समन्वयक आहेत.)**
**संपर्क: ०९९३०८५५५६५**

# अस्मिता आणि संस्कृतीचे प्रतीक



**धनंजय मुंडे**
(विरोधी पक्षनेते, विधानपरिषद)

नागपूरच्या अधिवेशनाला १९५३ च्या ऐतिहासिक नागपूर कराराची, राजकीय, सामाजिक चळवळींची पार्श्वभूमी आहे. नागपूर करारानुसार हे अधिवेशन होत असले तरी त्याचे महत्त्व केवळ अटी पाळण्यापुरते नसून आज प्रत्येक महाराष्ट्रीय माणूस या अधिवेशनाची मनाने, भावनेने जोडला गेला आहे. हे अधिवेशन म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचे, संस्कृतीचे, गौरवशाली लोकशाही परंपरेचे प्रतीक बनले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह ज्या शहरात बौद्धधर्माची दीक्षा घेतली, त्या ऐतिहासिक क्रांतीच्या दीक्षाभूमीच्या नागपूर शहरात हे अधिवेशन होत असल्यानं या अधिवेशनाला धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वदेखील आहे.

## राज्याच्या विकासाला दिशा

राज्याच्या, विशेषत: विदर्भाच्या विकासाला दिशा, गती देण्याचे काम नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींकडून व्हावी, अशी जनतेची अपेक्षा असते. ती अपेक्षा पूर्ण करण्याचे काम प्रत्येक लोकप्रतिनिधी आपापल्या पद्धतीने व कुवतीप्रमाणे करीत असतो. गेली पंधरा वर्षे आम्ही राज्यात सत्तेवर असताना, शासनकर्ते म्हणून शेतकरी, कष्टकरी, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, महिला, विद्यार्थी, दुर्बल, वंचित, उपेक्षित अशा सगळ्याच घटकांना न्याय देण्याचे, आधार देण्याचे अनेक निर्णय विधिमंडळाच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या माध्यमातून घेऊन शकलो. साहजिकच आमच्या प्रयत्नांना तत्कालीन विरोधी पक्षांचे सहकार्य लाभले म्हणूनच आम्ही ते निर्णय घेऊ शकलो, हे नाकारता येणार नाही.

## महत्त्वाची भूमिका

हा लेख प्रसिद्ध होत असलेल्या व शासनाचे मुखपत्र असलेल्या मासिक 'लोकराज्य'च्या त्या कालावधीतल्या प्रत्येक पानावर नजर फिरवल्यास, नागपूर अधिवेशन राज्याच्या प्रगतीच्या दृष्टीने किती महत्त्वाची बजावते, याचा अनुभव आपल्याला घेता येईल. गेली पाच-सहा वर्षे राज्यावर सातत्याने दुष्काळाचे किंवा अतिवृष्टीचे संकट होते. या संकटाने कोलमडून, आत्महत्येच्या वाटेवर गेलेल्या शेतकऱ्याला, त्याच्या कुटुंबाला वाचवण्याचे, आधार देण्याचे काम नागपूरच्या अधिवेशनात त्यात्या वेळी घेतलेल्या निर्णयांनी प्रभावीपणे केलं. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, कर्जमाफी, कर्जाचे पुनर्गठन असे अनेक जनहिताचे निर्णय नागपूरच्याच अधिवेशनात झाले. राज्यातील जनता व आपण सगळेच जण याचे साक्षीदार आहोत.

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये घेण्यामागे, या माध्यमातून विदर्भाच्या प्रश्नांना न्याय देण्याचे, वैदर्भीय जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याचे काम प्राधान्याने व्हावे, अशी रास्त तत्कालीन निर्णयकर्त्यांची अपेक्षा होती. ती अपेक्षा किती पूर्ण झाली याबाबत मतभेद असू शकतात, परंतु त्यामुळे नागपूर अधिवेशनाचे महत्त्व कमी होत नाही, उलट अशा परिस्थितीत हे अधिवेशन अधिक यशस्वी, फलद्रूप करण्याची लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी वाढते. लोकप्रतिनिधी म्हणून आमच्यापैकी प्रत्येकाने या दृष्टीने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सत्ताधारी किंवा विरोधी पक्षात काम करताना आम्ही ही जबाबदारी निष्ठापूर्वक व प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला, याचा मला आनंद व अभिमान आहे.

## सकारात्मकरीत्या बघायला हवे

नागपूर अधिवेशन हे अखंड, मजबूत महाराष्ट्राचे प्रतीक आहे. परंतु, हे अधिवेशन म्हणजे एक सोपस्कार होऊन राहिला आहे, असा एक काहीसा निराशेचा सूर अलिकडे ऐकायला मिळतो. ते अगदी चुकीचे नाही, मात्र त्याची कारणे छोटी आहेत, ती सहज दूर करता येतील. लोकप्रतिनिधींनी सभागृहात उपस्थित केलेल्या जनहिताच्या मुद्द्यांकडे सर्वांनी सकारात्मक, संवेदनशीलपणे बघितले तर हा प्रश्न सहज सुटू शकेल व भविष्यात निराशेचा सूर ऐकावा लागणार नाही, असे मला वाटते.

> **“महाराष्ट्राच्या उपराजधानीत, नागपूर येथे दरवर्षी आयोजित होणारे विधानमंडळाचे अधिवेशन हे प्रगत, पुरोगामी, विशाल, विस्तीर्ण, अखंड महाराष्ट्राचे प्रतीक आहे. हे अधिवेशन हा सोपस्कार नसून तो आमचा वारसा आहे. केवळ विदर्भाच्या नव्हे, तर राज्यातील समस्त जनतेच्या हिताच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्राला 'महा'राष्ट्र बनवण्यात या अधिवेशनाची भूमिका महत्त्वाची राहिली आहे.”**

### भक्कम महाराष्ट्राचा पाया

मी सुरुवातीला म्हटले, हिवाळी अधिवेशनाला नागपूर कराराची पार्श्वभूमी आहे. विदर्भातील तत्कालिन राजकीय नेतृत्वाने २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर कराराच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. हा निर्णय सशर्थ असला तरी त्या निर्णयाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला बळ मिळालं, आजच्या पुरोगामी, प्रगतशील, भक्कम अशा महाराष्ट्र राज्याचा पाया घातला गेला. येणाऱ्या भविष्यकाळात हा पाया आपल्याला अधिक भक्कम करायचा आहे. त्यासाठी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाचा सकारात्मक, रचनात्मक कार्यासाठी उपयोग करून घेण्याची गरज आहे.

राज्याचे पहिले मुख्यमंत्री, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी १४ मार्च १९६० रोजी तत्कालिन विधान मंडळात मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक मांडताना, विदर्भ-मराठवाड्याला नागपूर करारापेक्षा अधिकची मदत देण्याचे जाहीर केले होते. स्वतंत्र विकास मंडळांची स्थापना, नागपूरला उपराजधानीचा दर्जा, नागपूरला शासकीय विभागांची मुख्यालयांची स्थापना, रस्ते, सिंचन, शिक्षणाच्या सुविधांचा विकास अशा अनेक निर्णयांच्या माध्यमातून विदर्भाच्या विकासाला गती देण्याचा प्रयत्न स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांपासून आजपर्यंतच्या सर्वच मुख्यमंत्र्यांनी प्रामाणिकपणे केला. त्यामुळेच विदर्भाची आतापर्यंतची प्रगती होऊ शकली.




### सहकार्याची भूमिका

विदर्भातील शेतकऱ्यांना चोवीस तास पाणी, वीज उपलब्ध व्हावी, इथली अधिकाधिक जमीन सिंचनाखाली यावी, मालगुजारी तलावांची स्वच्छता करून जलसाठा वाढावा, खनिजसंपत्तीत विदर्भाला न्याय्य वाटा मिळावा, नवीन उद्योग यावेत, बंद उद्योग पुन्हा सुरू व्हावेत, रोजगारनिर्मिती वाढावी, बेरोजगारी संपावी, चिखलदरा, पंचमढी, नागझिरासारख्या पर्यटनस्थळांचा विकास करून येथील पर्यटन वाढावे, आर्थिक विकास साधला जावा, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगती व्हावी, कायदा-सुव्यवस्था सुधारावी, या मुद्द्यांच्या अनुषंगाने भविष्यात विदर्भाची विकासाच्या दिशेने होणारी वाटचाल अधिक आश्वासक करण्याची गरज आहे, असे मला वाटते. त्यासाठी विधिमंडळाच्या माध्यमातून सरकारला आवश्यक ते सर्व सहकार्य आम्ही करणार आहोत.

विदर्भाच्या विकासाच्या व महाराष्ट्राच्या एकता व अखंडतेच्या मुद्द्यावर राज्यातील संपूर्ण जनता एकजूट आहे, असा संदेश नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या माध्यमातून पुन्हा एकदा समाजात जावा, असे मला वाटते.

ता. क.- विधान परिषदेचा विरोधी पक्षनेता म्हणून माझी झालेली निवड ही २०१४ च्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात झाली असल्याने या अधिवेशनाचे माझ्यासाठीही वेगळे महत्त्व असून विदर्भाच्या सर्वांगीण विकासाला दिशा व गती देण्यात विरोधी पक्षनेता म्हणून माझे संपूर्ण सहकार्य व योगदान असणार आहे.









**राज्याच्या विकासाला दिशा देण्यासाठी, विधिमंडळाच्या कामकाजाच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वाचे असते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात झालेल्या घोषणांचा, निर्णयांचा आढावा घेण्याची संधी या अधिवेशनात लोकप्रतिनिधींना मिळत असते. पावसाळ्यानंतरचे अधिवेशन असल्याने नैसर्गिक आपत्तीने ग्रासलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. वर्षाअखेरीस अधिवेशन असल्याने अपूर्ण राहिलेल्या योजनांना किंवा तातडीच्या नवीन योजनांना गती देण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी हे अधिवेशन, सत्ताधारी तसेच विरोधी, अशा दोन्ही पक्षांसाठी उपयोगी ठरत असते. त्यामुळे नागपूर अधिवेशन हे महाराष्ट्राच्या प्रगतीला, विकासाला दिशा देणारे अधिवेशन असते, याबाबत कुणाचेही दुमत असू शकत नाही.**

**शब्दांकन: संजय देशमुख**
**(लेखक विशेष कार्य अधिकारी आहेत.)**
**संपर्क: ०९८२१३६८२१०**

# इतिहास आणि परंपरा

**महाराष्ट्र विधानमंडळाला देशात आगळीवेगळी प्रतिष्ठा लाभली आहे. अनेकविध क्षेत्रात देशपातळीवर नेतृत्व देणाऱ्या व्यक्ती या विधानमंडळाने राष्ट्राला दिल्या आहेत. त्यांनी लोकशाही आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाद्वारा सबळ प्रशासनाचा वस्तुपाठ इतरांना घालून दिला आहे. त्यायोगे अनेक उत्तम परंपरा, संकेत व आदर्श निर्माण केले आहेत.**

बा.बा. वाघमारे



जगन्नाथ शंकर शेठ



सर फिरोजशाह मेहता



न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

**१८६२ ते १९३७ या पंच्याहत्तर वर्षांच्या विधानमंडळाच्या वाटचालीत जगन्नाथ शंकर शेठ, जमशेटजी जीजीभॉय, सर माधवराव विंचुरकर, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशाह मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच डॉ.रामकृष्ण भांडारकर असे अनेक दिग्गज सन्माननीय सदस्य म्हणून लाभले, त्यांनी आपल्या महान कर्तृत्वाने या विधानमंडळाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे.**



गोपाळ कृष्ण गोखले



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



डॉ.बाबासाहेब आंबेडकर

भूतपूर्व मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची पहिली बैठक २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भरली होती. मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉर्ज रसेल क्लार्क हे त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

भारताच्या घटनात्मक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा अस्तित्वात आला, ज्यात संघराज्यात्मक शासन पद्धती स्वीकारण्यात आली होती. तसेच, प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली होती या कायद्यान्वये विधानसभा व विधानपरिषद असे नामभिधान देऊन दोन सभागृह मुंबई प्रांतात १९३७ मध्ये अस्तित्वात आले.

## विधानसभेतील महत्त्वाच्या घटना

विधानसभेत २१ सप्टेंबर, १९३७ रोजी घटना समितीचा ठराव मांडण्यात आला. तसेच २५ ऑक्टोबर, १९३९ रोजी भारतीय जनतेला विश्वासात न घेता. ब्रिटिश सरकारने भारताला युद्ध राष्ट्र म्हणून घोषित केले. याचा निषेध ठराव मांडण्यात आला. १७ ऑगस्ट, १९३७ रोजी अर्थमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांनी पहिला अर्थसंकल्प सादर केला. तसेच १९ ऑक्टोबर, १९४८ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सदस्यांना उद्देशून गव्हर्नर राजा महाराजा सिंह यांनी पहिले अभिभाषण केले. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ६ ऑक्टोबर, १९४९ रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये एका खास अधिवेशनात विधानमंडळाच्या सदस्यांना उद्देशून भाषण केले. हा देशाच्या इतिहासातील पहिला प्रसंग होता.

## महाराष्ट्र राज्याची स्थापना

भारतीय राज्यघटना २६ जानेवारी, १९५० रोजी अमलात आल्यानंतर घटनेतील तरतुदीप्रमाणे विधानसभा अस्तित्वात आली. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तत्कालीन मुंबई राज्य विधानसभा अस्तित्वात आली त्यावेळी १९५३ मध्ये फाजल अली कमिशनने भाषावार प्रांतरचनेची शिफारस केली. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने जोर धरला. १ मे, १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई

## नागपूर करार




- विद्यमान मुंबई राज्य, मध्ये प्रदेश राज्य आणि हैद्राबाद राज्य यामधील मराठीभाषिक असलेल्या सलग प्रदेशांचे मिळून बनलेले हे राज्य असेल. या राज्याच्या हद्दीमध्ये परराज्याच्या ताब्यातील कोणताही प्रदेशाचा अंतर्भाव असता कामा नये. या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश असे म्हटले जाईल आणि मुंबई शहर ही त्याची राजधानी राहील.
- सर्व प्रकारचा विकास व प्रशासन यांच्या प्रयोजनार्थ, हे राज्य महाविदर्भ मराठवाडा आणि उर्वरित राज्य हे तीन घटक मिळून बनलेले असेल.
- एक स्वतंत्र शासन म्हणून त्यांच्या ज्या गरजा असतील त्यांना बाध न येता, निरनिराळ्या घटकांवर करावयाच्या खर्चासाठी पैशांचे नियत वाटप त्या त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे. परंतु, मराठवाड्याची अविकसित स्थिती लक्षात घेऊन, त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाकरिता मराठवाड्याकडे खास लक्ष पुरविण्यात यावे आणि दरवर्षी राज्य विधानसभेसमोर त्यासंबंधीचा अहवाल ठेवण्यात यावा.
- सरकार बनवताना या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे.
- व्यावसायिक प्रशिक्षण आणि वैज्ञानिक किंवा अन्य विशेषीकृत पेशासंबंधीचे प्रशिक्षण मिळण्याच्या सुविधा जेथे आहेत अशा सर्व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळण्यासाठी या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात चांगल्या व पुरेशा सोयी उपलब्ध होतील अशी खात्रीलायक तजवीज करण्यात यावी.
- नवीन राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायपीठ मुंबई येथे असेल व दुसरे खंडपीठ नागपूर येथे असेल. नागपूर येथील खंडपीठ सर्वसाधारणपणे महाविदर्भ प्रदेशाचे कामकाज पाहील. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या नेमणुका करण्यासाठी शिफारस करताना महाविदर्भाच्या सेवामधील आणि वकीलवर्गामधील व्यक्तींचीही शिफारस करून या प्रदेशाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल अशी व्यवस्था करावी. हा परिच्छेद, योग्य त्या फेरफारांसह मराठावाडा प्रदेशासही लागू असेल.
- शासनाकडील व शासननियंत्रित उपक्रमांमधील सर्व श्रेणीतील नोकरभरतीच्या वेळी संबंधित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात यावे.
- वेगवेगळ्या घटकांमधील लोकांचा प्रशासनाशी अधिक चांगल्या प्रकारे सहयोग साधण्याचे परिणामकारक साधन म्हणजे केंद्रीकरण होय, असा आमचा विश्वास आहे.
- महा विदर्भाच्या लोकांचा त्यांच्या राज्याची राजधानी म्हणून नागपूर शहराशी फार जुन्या काळापासून घनिष्ठ संबंध आहे आणि त्यांना त्या अनुषंगाने विविध फायदेही मिळतात याची आम्हाला जाणीव आहे. एकसंध राज्याचे प्रशासन परिणामकारक रीतीने चालण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्बंध पाहूनही, त्यांचे हे फायदे शक्य त्या मर्यादेपर्यंत टिकवण्याची आम्हाला इच्छा आहे. त्यांच्या सल्ल्याने या कलमाच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. शासनाचे कार्यस्थान अधिकृतपणे निश्चत कालावधीकरिता नागपूर येथे हालविण्यात येईल आणि दरवर्षी राज्य विधानमंडळाचे किमान एक अधिवेशन नागपूर येथे भरवण्यात येईल.
- अद्ययावत जनगणनेच्या आधारे खेडे हा घटक मानून जिल्ह्याच्या हद्दीमध्ये अशा रीतीने फेरबदल करण्यात येतील की, त्यामुळे नवीन राज्यातील सर्व सलग मराठीभाषिक क्षेत्रांचा त्यात अंतर्भाव होईल.

**विदर्भाचे नेतृत्व :** **आतापर्यंत महाराष्ट्राला विदर्भाचे चार मुख्यमंत्री (मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक व देवेंद्र फडणवीस), एक उपमुख्यमंत्री (नाशिकराव तिरपुडे) लाभले. मंत्री व राज्यमंत्री मिळून सुमारे ७५ ते ८० सदस्यांना मंत्री होण्याची संधी मिळाली. विधानसभेचे अध्यक्षपद शेषराव वानखेडे आणि विधानपरिषदेचे सभापतिपद रा.सू.गवई यांनी भूषवले आहे.**


**मारोतराव कन्नमवार**
माजी मुख्यमंत्री


**वसंतराव नाईक**
माजी मुख्यमंत्री


**सुधाकरराव नाईक**
माजी मुख्यमंत्री


**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री


**नाशिकराव तिरपुडे**
माजी उपमुख्यमंत्री

राज्य अस्तित्वात आले. या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी सूत्रे हाती घेतली. राज्यपुर्नरचना विधेयकावर प्रदीर्घ चर्चा झाली. त्यानंतर १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश दिला. शतकानुशतके दूर असलेले विदर्भ, मराठवाडा, आणि पश्चिम महाराष्ट्र असे मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले अन् या विशाल राज्यातले सर्व मराठी बांधव एकत्र आले. त्यांच्या आशा आकांशा पल्लवित झाल्या. त्या सर्व घटनेला आता ५४ वर्षे पूर्ण होत आहेत.

या महत्त्वाच्या घटनेचे औचित्य साधून सन १९८८ साली विधानसभेचा सुवर्णमहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तर सन २०१२ मध्ये विधानसभेचा अमृत महोत्सवही साजरा करण्यात आला. आपल्या विधानमंडळाला फार मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे.

राज्य पुनर्रचनेनंतर १९५७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तत्कालीन मुंबई राज्य द्विभाषिक विधानसभा व मुंबई राज्य पुनर्रचनेनंतर १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतरची महाराष्ट्र राज्य पहिली विधानसभा अस्तित्वात आली. त्यानंतर १९६२, १९६७, १९७२, १९७८, १९८०, १९८५, १९९०, १९९५, १९९९, २००४ व २००९ नुकत्याच पार पडलेल्या २०१४ च्या निवडणुकीत तेरावी महाराष्ट्र विधानसभा अस्तित्वात आली आहे.

### नागपूर अधिवेशन

नागपूर कराराप्रमाणे विधानमंडळाचे एक अधिवेशन नागपूरला घेण्याबाबत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी एक धोरणविषयक निवेदन सभागृहाला सादर केले. १२ ऑगस्ट, १९६० रोजी या संबंधीच्या प्रस्तावावर प्रदीर्घ चर्चा झाली आणि विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे घेण्याचे निश्चित झाले. तत्पूर्वी नागपूर येथील कौन्सिल हॉल इमारतीमध्ये तत्कालीन मध्यप्रदेश विधानसभेची अधिवेशने भरत असत. ही इमारत १९१४ मध्ये बांधून पूर्ण करण्यात आली. महाराष्ट्र विधानसभेचे पहिले नागपूर अधिवेशन दिनांक १० नोव्हेंबर ते १६ डिसेंबर, १९६० या काळात पार पडले. २७ दिवस चाललेल्या या अधिवेशनात १३६.१० तास कामकाज चालले. १९६८ मध्ये १८ नोव्हेंबर ते २७ डिसेंबरपर्यंत २८ दिवस चाललेले अधिवेशन हा कालावधी आता पर्यंतच्या अधिवेशनातील सर्वात अधिक कालावधी आहे. १९८९ मध्ये १६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर असा पाच दिवसाचा कालावधी हा सर्वात कमी कालावधी आहे. १९८६ मध्ये विधानमंडळाची दोन अधिवेशने म्हणजे ६ जानेवारी ते २४ जानेवारी, १५ दिवस आणि २४ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर, १५ दिवस. अशी दोन अधिवेशने झाली. ही एकमेव घटना आहे. २१ जानेवारी, १९८० रोजी राज्यपाल सादिक अली व ६ जानेवारी, १९८६ रोजी राज्यपाल कोना प्रभाकरराव यांनी विधानमंडळाच्या संयुक्त सभागृहासमोर नागपूर येथे राज्यपालांचे अभिभाषण केले.

१२० सदस्य बसण्याची क्षमता असलेली पूर्वीचे नागपूर येथील विधानसभा सभागृह व तात्पुरती बसण्याची सोय असलेले विधानपरिषद सभागृह यामुळे सदस्यांना अडचणी, असुविधा व गैरसोईना तोंड द्यावे लागले तरीही, १९६० सालापासून केवळ १९६२-६३ सालचा अपवाद वगळता (चीन व पाकिस्तान यांनी देशावर आक्रमण केल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती) सातत्याने नागपूर येथे प्रतिवर्षी हिवाळी अधिवेशन घेतले जात आहे. ७ मार्च, १९९२ रोजी तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्या हस्ते नागपूर येथील विधान भवनाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन झाले. तर ११ डिसेंबर, १९९३ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते या विस्तारित इमारीतील नवीन सभागृहाचे उद्घाटन झाले व तेथे विधानसभेच्या बैठका भरू लागल्या व पूर्वीच्या विधानसभा सभागृहात विधानपरिषदेच्या बैठका घेण्यात येऊ लागल्या. १९६० पासून आतापर्यंत (सन १९६२, १९६३, १९७९ व १९८५ वगळता) नागपूर येथे ५३ अधिवेशने झाली.

(लेखक विधानमंडळ सचिवालयाचे ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी आहेत.)

## विधानसभेचे पहिले अधिवेशन

**१९३५ च्या कायद्यानुसार सन १९३७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन १५७ सदस्य असलेली विधानसभा प्रथमत: अस्तित्वात आली. त्या विधानसभेचे पहिले अधिवेशन १९ जुलै, १९३७ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये भरले होते. त्या दिवशी पुण्यातील कौन्सिल हॉलला जाहीरसभेचे स्वरूप प्राप्त झाले होते. लोकांच्या उत्सहाला उधाण आले होते. मंत्रिमंडळाच्या सदस्यांना मिरवणुकीने कौन्सिल हॉलवर आणले गेले. शेकडो प्रेक्षक सभागृहात तर प्रचंड जनसमुदाय सभागृहाबाहेर जमला होता. या ऐतिहासिक व अभूतपूर्व प्रसंगाचे चित्रीकरण प्रभात फिल्म या कंपनीने केले होते. सदस्यांनी शपथ घेतल्यानंतरही स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग सदस्यांनी स्वीकारला होता. त्या दिवशी सर्व सदस्यांनी वंदे मातरम गंभीर वातावरणात म्हटले. तो क्षण स्वातंत्र्याच्या ऊर्मीचा विलोभनीय आविष्कार होता.**



# अभ्यासवर्ग




**नागपूर अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी सन १९६४ पासून संसदीय अभ्यासवर्ग आयोजित केला जातो.**



**संसदीय अभ्यासवर्गाला मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. या वेळी विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर व विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे, विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील, धनंजय मुंडे आणि उल्हासदादा पवार उपस्थित होते.**

महाराष्ट्र विधानमंडळातील राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या स्थापनेपासून (सन १९५२) शाखेतर्फे संसदीय लोकशाही शासन प्रणालीच्या बळकटीसाठी विविध उपक्रम राबवले जातात. अशा विविध उपक्रमांपैकीच एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम म्हणजे नागपूर अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी सन १९६४ पासून आयोजित केला जाणारा संसदीय अभ्यासवर्ग! यंदाचे २०१६ हे या अभ्यासवर्गाचे ४६ वे वर्ष आहे.

### देशातील पहिले राज्य

राष्ट्रकुल संसदीय मंडळाची राज्यस्तरीय शाखा स्थापन करून त्याद्वारे उपयुक्त उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी १५ जुलै, १९५२ रोजी राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या स्थापनेचा ठराव सभागृहात मांडला व सभागृहाने तो १८ जुलै १९५२ रोजी संमत केला. राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा स्थापन होत असताना ठरावावरील चर्चेप्रसंगी सभागृहात यासंदर्भात विचारमंथन झाले व त्यानंतर संस्था स्थापनेचा ठराव संमत झाला.

विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर व विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे हे या संस्थेचे पदसिद्ध सहअध्यक्ष

**निलेश मदाने**

असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संसदीय अभ्यासवर्गासह अन्य विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नवा महाराष्ट्र घडवला जात असताना महाराष्ट्रातील संसदीय परंपरेची ध्वजा उंचावणारे जे उपक्रम, कार्यक्रम आणि प्रथांचा श्रीगणेशा करण्यात आला, त्यापैकीच हा अभ्यासवर्ग एक होय.

### वैशिष्ट्यपूर्ण

या अभ्यासवर्गाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सकाळच्या सत्रातील प्रबोधनात्मक व्याख्यानांबरोबरच दुपारच्या अनौपचारिक सत्रांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या मान्यवर सदस्यांची आणि वरिष्ठ अधिकारी वर्गाची विद्यार्थ्यांबरोबर थेट भेट घडवून आणली जाते व परस्परसंवाद साधला जातो. संसदीय कार्यप्रणाली व प्रथा या विषयांबाबतच्या या अभ्यासवर्गाच्या माध्यमातून संसदीय शासनप्रणालीची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली जाते. त्यासाठी नामवंत संसदपटू व संसदीय शासनप्रणालीशी ज्यांचा जवळून संबंध आला आहे, अशा व्यक्तींची व्याख्याने आयोजित करून, त्यांचा लाभ अभ्यासवर्गामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना करून दिला जातो.

### अभ्यासवर्गाची उपयुक्तता

भारतातील संसदीय लोकशाही कशा पद्धतीने कार्यरत आहे, कार्यकारी मंडळावर विधानमंडळामार्फत कशाप्रकारे नियंत्रण ठेवले जाते, त्यासाठी कोणकोणत्या संसदीय आयुधांचा वापर केला जातो, संसदीय लोकशाहीमध्ये समितीपद्धतीचे महत्त्व, अर्थसंकल्पाची प्रक्रिया व त्याद्वारे दुर्बल घटकांना विकासप्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी आखलेले धोरण, विधेयकाचे अथवा वटहुकमाचे कायद्यामध्ये रूपांतर होण्याची प्रक्रिया इत्यादी बाबतची माहिती नामवंत संसदपटू व तज्ज्ञांच्या व्याख्यानांमधून तसेच सभागृहाच्या प्रत्यक्ष कामकाज पाहणीमधून विद्यार्थ्यांना मिळत असते.

**(लेखक महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून आहेत.)**

# खजिना मिळाला...



**हेमंत टकले**
(विधानपरिषद सदस्य)

> नागपूर हे पूर्वीपासूनच राजधानीचे शहर होते. त्यामुळे प्रांताच्या राजधानीच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या सर्व इमारती व इतर साधने यांनी ते परिपूर्ण होते. या सगळ्या इमारती पाहताना किंवा नागपूर शहरातून फिरत असताना मला नेहमीच एक आपुलकीची भावना सोबत करत राहिली. त्याकाळी निर्माण केलेल्या या वास्तू आजही २१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात त्याच दिमाखाने उभ्या असलेल्या पाहून खूप समाधान वाटते.

सालाबादप्रमाणे राज्याचे विधिमंडळ अधिवेशन नागपूर येथे संपन्न होत आहे. विधानपरिषदेचा सदस्य म्हणून गेली साधारणपणे ८ वर्षे मी या अधिवेशनामध्ये सहभागी होत आहे.

दरवर्षी नागपूरला आल्यानंतर मी सहसा अधिवेशनाच्या संपूर्ण कालावधीमध्ये नागपूर सोडत नाही. ज्या दिवशी विधानमंडळाला सुट्टी असेल त्या दिवसात मी आत्मीयतेने विदर्भातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये जात असतो. या भेटीमध्ये मी केवळ राजकीयच नाही तर एकूणच सांस्कृतिक, शैक्षणिक व अन्य क्षेत्रातील अनेकांच्या भेटी घेऊन त्यांच्या मनातल्या अनेक गोष्टींबद्दल मनमोकळेपणाने चर्चा करीत असतो. विधानमंडळाचे कामकाज हा मुख्य भाग असला तरी लोकांपर्यंत पोहचण्याची एक चांगली संधी या निमित्ताने मिळत असते आणि त्याचा मला नक्कीच माझी कोणत्याही विषयावरील भूमिका ठरविताना उपयोग होतो.

नागपूर विधिमंडळाची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९३७ साली करण्यात आली. त्यावेळेला मुंबई प्रांताची विधानसभा सदस्यांची संख्या एकूण १७५ इतकी होती. या १७५ मतदारसंघाची रचना पुढीलप्रमाणे होती.

सर्वसामान्य - ११५, मुस्लीम - २९, महिला- ६, अँग्लो इंडियन -३, ख्रिश्चन - ३, व्यापार उद्योगाचे -३, जमीनदारांचे -२, कामगार संघटनांचे -७, तत्कालीन मुंबई विद्यापीठाचा १ प्रतिनिधी.

## आरक्षण

महत्त्वाचा भाग म्हणजे सर्वसामान्य १७५ जागांपैकी १५ जागा अनुसूचित जातीसाठी, १ आदिवासींसाठी आणि ७ जागा मराठ्यांसाठी राखीव होत्या. कदाचित सध्या आरक्षणाची चर्चा रंगात आलेली असताना हे आरक्षण सन १९३७ सालीसुद्धा विचारात घेण्यात आले होते हा इतिहास आहे. गमतीचा भाग म्हणजे त्याकाळी २१ वर्षे वयावरील नागरिकांना मतदानाचा अधिकार होता. परंतु त्यासाठी काही अटी होत्या. मतदाराने कर भरलेले असले पाहिजेत. त्यांचे शिक्षण कमीत कमी त्या काळाचे व्हर्न्याकुलर फायनल (सातवी) पर्यंत असलेच पाहिजे अशा अटी होत्या. त्यावेळी देशातल्या सर्वप्रांतात १७५ पैकी ८८ जागांवर काँग्रेस विजयी झालेली होती. त्यावेळच्या कायद्याप्रमाणे एकूण राज्यव्यवस्थेचे अंतिम अधिकार हे राज्यपालांकडे होते. परंतु निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना अधिकार मिळणार नसतील, तर विजय मिळवूनसुद्धा सर्व प्रांतातील लोकांनी मंत्रिमंडळ स्थापण्यास नकार दिला. तत्कालीन प्रांताचे गर्व्हनर ब्रेब्रॉन ह्यांनी आपल्या अधिकारात साताऱ्याचे उद्योगपती सर धनजी बोमनजी कूपर यांना मंत्रीमंडळ बनवण्यास सांगितले. त्यांच्याबरोबरीने जमनादास मेहता, हुसेनअली रेहमतुल्ला यांनाही मंत्री बनवण्यात आले. परंतु शपथ घेतलेले मंत्रिमंडळच अल्पमतात असल्याने अधिवेशन भरवण्यातच आले नाही.

## पहिला साक्षीदार

महात्मा गांधींनी देशातील या परिस्थितीचा विचार करण्यासाठी विदर्भातील वर्धा येथे ७ जुलै,१९३७ ला बैठक बोलावली होती. त्यानंतर शेवटी ब्रिटिश सरकार नमले आणि लोकनियुक्त प्रतिनिधींना अधिकार देण्यात आले. या ऐतिहासिक घटनेचा विदर्भ हा पहिला साक्षीदार आहे.

मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री म्हणून बाळ गंगाधर खेर यांनी मुख्यमंत्री म्हणून पदग्रहण केले. १९ जुलै, १९३७ ला विधानसभा अस्तित्वात आली. राज्यपालांनी रावबहादूर चितळे यांची हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. २० जुलै, १९३७ रोजी विधानपरिषद अस्तित्वात आली. विधिमंडळाची पहिली बैठक पुणे येथे घेण्यात आली. सर्व प्रतिनिधींनी विधानसभेचे अध्यक्ष म्हणून श्री. गणेश मावळंणकर यांची बिनविरोध निवड केली. (नंतर मावळंणकर हे लोकसभेचे पहिले अध्यक्ष निवडले गेले होते.) या अधिवेशनात मिळालेल्या अधिकारांचा वापर करून वंदे मातरम हे राष्ट्रगाण झाले.




## सदस्यांचे राजीनामे

एकीकडे हे विधिमंडळाचे कामकाज सुरू असताना ब्रिटिश सरकारने २५ ऑक्टोबर, १९३९ ला भारतालासुद्धा दुसऱ्या महायुद्धात सहभागी केले. ब्रिटिशांच्या या कृतीचा निषेध म्हणून सर्व सदस्यांनी राजीनामे दिले. त्यानंतर मार्च १९४६ पर्यंत राज्यपालांची राजवट चालू राहिली. एप्रिल १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर परत बाळ गंगाधर खेर यांचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. राज्यपालांच्या अभिभाषणाने अधिवेशनाचा प्रारंभ करण्याची परंपरा १९ ऑक्टोबर, १९४८ ला सुरू झाली. या अधिवेशनात इंडस्ट्रीअल सिलेक्शन ॲक्ट हे महत्त्वाचे विधेयक मांडण्यात आले. विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांनी सलग सहा तास भाषण करून एक विक्रम प्रस्थापित केला. ६ ऑक्टोबर, १९४९ रोजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये विधिमंडळ सदस्यांना उद्देशून भाषण केले. देशामधील कोणत्याही विधिमंडळात पंतप्रधानांचे भाषण प्रथम झाले. विधिमंडळात देशाचे पंतप्रधान येण्याचा पहिला मान मिळाला. भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर एप्रिल १९५२ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन स्वर्गीय मोरारजी देसाई हे मुख्यमंत्री पदावर आले. भाषावर प्रांत रचनेनंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झालेली होती. त्यावेळी द्विभाषिक राज्याची स्थापना झाली व १ नोव्हेंबर, १९५६ रोजी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची मुख्यमंत्रिपदी निवड करण्यात आली. त्यावेळी विदर्भ हे मध्यप्रदेशाबरोबर होते. त्यामध्ये वऱ्हाड व मध्य प्रांत हे दोन भाग होते. त्याला त्या काळी सी.पी.अँड बिरार असे म्हटले जात होते व नागपूर ही त्याची राजधानी होती.



## पहिले अधिवेशन

नागपूर करारानुसार विदर्भ महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आला व त्यानुसार राज्याचे अधिवेशन नागपूर येथे घेण्याचे ठरले. नागपूरच्या पहिल्या अधिवेशनात कामकाज २७ दिवस चालले. आजपर्यंत सन १९६८ मध्ये सर्वांत जास्त कालावधी २८ दिवसांचा राहिला. तर सन १९८९ साली सर्वांत कमी म्हणजे ४ दिवसांचे अधिवेशन झाले.

हा सगळा अत्यंत महत्त्वाचा खजिना मला नागपूरमधल्या इमारतींनीच दिला. राज्याच्या स्थापनेनंतर विदर्भातून ४ मुख्यमंत्री, १ उपमुख्यमंत्री, विदर्भातले आजपावेतो किमान ८० मंत्री त्याचबरोबर विधानसभेचे अध्यक्षपद, उपाध्यक्षपद तसेच विधानपरिषदेचे सभापतिपद व उपसभापतिपदही विदर्भाला मिळाले.

मागोवा घेताना राज्यातील कोणताही भाग मागे पडू नये. विकासाचा समान वाटा सगळ्यांना मिळायला हवा. भावनात्म ऐक्य मजबूत व्हावे यासाठी नागपूर येथे दरवर्षी होत असलेल्या अधिवेशनात विशेषत : विदर्भातील प्रश्नांना न्याय देण्याचा दृष्टिकोन सर्वांनी ठेवला पाहिजे. या परिसराचा अभ्यास केल्यानंतर अजूनही खूप काही करायला हवे ही जाणीव मात्र नक्कीच होते. त्यासाठी सर्वांच्याच प्रयत्नांची गरज आहे, असे वाटते.

# ज्वलंत आठवणी, मधुर क्षण



**डॉ. नीलम गोऱ्हे**
(विधानपरिषद सदस्य)

**नागपूर हे माझे आवडत्या शहरांपैकी एक असून विदर्भातील लोकांची भाषा जरी वेगळी असली तरी त्यांचे आणि उर्वरित महाराष्ट्राचे अंत:करण एकच आहे, असे माझे निरीक्षण आहे. नागपुरचा मीडियाही मला फार आवडतो. कारण त्यांच्याकडे नेहमी वेगळी माहिती असते. नागपूर अधिवेशन काळात घडलेल्या घटनांना नेहमीच व्यापक आणि चांगली प्रसिद्धी मिळते, असेही मला वाटते.**

२००२ मध्ये मी प्रथम विधान परिषदेवर आमदार म्हणून निवडून आले, पण त्यापूर्वीपासून म्हणजे साधारण १९९० पासून मी विविध प्रश्नांवर, निवेदनं, आंदोलने, सभा, मोर्चे यांच्या निमित्ताने नागपूर अधिवेशनादरम्यान नागपूरला जात असे.

### उत्साही वातावरण

१९९१ मध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे महाराष्ट्र महिला व्यासपीठावर 'महिलांची सनद' या विषयावर भाषण द्यायला मी नागपूर अधिवेशन काळात होते.१९९३ -९४ मध्ये तर महिला आरक्षण, महिला धोरण, असे अनेक विषय विधानमंडळात चर्चेसाठी ऐरणीवर होते. त्यासाठी वारंवार नागपूर-विदर्भात जाणे होत असे. १९९४ मध्ये महिलांच्या एका प्रश्नावर चर्चेसाठी अधिवेशनादरम्यान मी नागपुरात होते आणि त्या वेळी गोवारी मोर्चावर गोळीबाराची दुर्घटना घडली होती. तसेच आपल्या मागण्यांसाठी मोर्चा घेऊन आलेल्या पोलीस पाटलांच्या जीपला अपघात होऊन ६ जण दगावले होते. या दुर्देवी घटनासुद्धा या वाटचालीत प्रकर्षाने आठवतात. १९९८ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाची अध्यक्ष या नात्याने बचतगटांची प्रदर्शनं घेऊन आम्ही जात असू. त्या परिसरातील लीलाताई चितळे, शुभदा देशमुख, सीमा साखरे, रूपा कुलकर्णी अशा सर्वपक्षीय जुन्या-जाणत्या महिला नेत्यांशी भेटीगाठी होत. महिला कार्यकर्ती म्हणून घडत असताना ते माझ्यासाठी खूप महत्त्वाचे होते. सर्वच वातावरण अतिशय भारलेले, जागृत आणि उत्साह देणारे असायचे. नागपूर अधिवेशनाच्या माझ्या आठवणी या महिला चेतना चक्राच्या ज्वलंत आणि मधुर अशा आहेत.

### समस्यांचा पाठपुरावा

आमदार म्हणून हिवाळी अधिवेशनात मी प्रथम २००२ मध्ये उपस्थित होते. असंघटित महिला, बालकामगार, कायदा-सुव्यवस्था, कापूस, धान उत्पादकांचे प्रश्न इ.मी सभागृहात उपस्थित केल्याचे मला आठवते. तेलगी घोटाळ्याचा मुद्दा त्यावेळी सभागृहात बराच गाजला होता. त्यावरही आम्ही जोरदार आवाज उठवला होता. २००३ मध्ये वर्धा जिल्ह्यात १०० टक्के दारूबंदी करणे, लोणार सरोवर परिसरातील पर्यावरणाचा प्रश्न असे अनेक मुद्दे मी उचलले होते.

२००५ मध्ये नागपूर अधिवेशनादरम्यान विशेष आर्थिक क्षेत्र(सेझ)ची अर्धा तास चर्चा मी सभागृहात लावली होती. त्यावर सभापती शिवाजीराव देशमुख यांनी ती अडीच तासाच्या चर्चेत रूपांतरित केल्याचेही मला स्मरते. त्याच अधिवेशनात मलकापूर येथील आश्रमशाळेतील कर्णबधिर मुलींच्या पोटाच्या तक्रारींविरोधात आवाज उठवला होता. महिला समितीने तिथे भेट द्यावी असा निर्णय घेण्यात आला आणि भेटीत असे लक्षात आले की सांडपाणी व पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन एकत्र झाल्यामुळे हा आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यानंतर त्यावर उपाययोजना करण्यात आल्या.

### वादळी चर्चा

२००८ च्या अधिवेशनात एक विधेयक मांडले होते की ज्या लोकप्रतिनिधींच्या घरात शौचालये नसतील त्यांना निवडणूक लढण्यापासून प्रतिबंध करावा. या विधेयकावर वादळी चर्चा झाली होती. सत्ताधारी पक्षाचे आमदार सभागृहात जमिनीवर बसून विरोध करताहेत, असे चित्र निर्माण झाले होते. सभागृहात वातावरण अगदी तंग झाले होते. त्यानंतरची माझी आठवण म्हणजे घरेलू कामगार महिलांवर आम्ही चर्चा उपस्थित केली होती, ती सभागृहात दीर्घकाळ सुरू होती. रात्रौ १२.३० झाले तरी चर्चा सुरूच होती. त्यामुळे त्या दिवशी पुरते कामकाज थांबवावे अशी अनेकांची मन:स्थिती होती. मात्र मी रात्री या विषयावर बोलायला सुरुवात केली आणि त्यांचे मुद्दे जोरदारपणे मांडले. दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता मला अनेक




स्थानिक घरेलु कामगार महिलांचे, त्यांच्या स्थानिक नेत्यांचे फोन आले. त्यांनी सांगितले की, स्थानिक युसीएन केबल नेटवर्कवर आम्ही ते भाषण संपूर्ण बघितले व आमचे प्रश्न तळमळीने मांडल्याबद्दल आम्ही तुमचे खूप-खूप आभार मानतो. आमचा आवाज तुम्ही खऱ्या अर्थाने सभागृहात पोहोचवला. असे क्षण खूप समाधान देऊन जातात. शिवाय जबाबदारीची जाणीवही करून देतात की लोकांचे आपल्याकडे लक्ष आहे.

### मेजवान्यांना चाप

अलीकडच्या सत्तांत्तरानंतर तसेच दुष्काळी पार्श्वभूमीमुळे नागपूर अधिवेशन काळात मेजवान्यांना चाप बसला आहे. अधिकाधिक कामकाज करण्यावर भर वाढला आहे.

नागपूर अधिवेशनावर आक्षेप घेणाऱ्यांना मला हे सांगायचे आहे की, प्रश्नांचे गांभीर्य सर्व आमदार जाणून असतात व सभागृहात उपस्थितही असतात. शनिवार-रविवार आमदारांचे अनेक दौरे असतात, ज्यांचा उपयोग जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नक्कीच होतो. मात्र कार्यपद्धती अजून सुधारून घेता आली तर अधिवेशनाचे सार्थक होईल असे वाटते.

प्रत्येक मंत्र्याने त्यांच्या खात्याची रिव्हयू मीटिंग साधारणपणे गणेशोत्सव झाल्यानंतर लगेच जर घेतली तर अधिवेशनापूर्वीच्या अडीच-तीन महिन्यांच्या कालावधीत आधीच्या हिवाळी अधिवेशनातील प्रश्नांवर मार्ग काढण्याच्या दृष्टीने निश्चित मदत होईल, असे मला वाटते. तसेच नागपूर अधिवेशन काळात होणारी आंदोलने, मोर्चे याबाबत स्थानिक पोलिसांनी सुरक्षेचा अतिरिक्त निर्बंध थोडा शिथिल करण्याबाबत विचार करावा असेही माझे मत आहे, कारण ते आंदोलक त्यांच्या प्रश्नांबाबत सनदशीर मार्गाने थंडीत कुडकुडत दाद मागत असतात. तसेच वाहतूक निर्बंधांमुळे नागपूरकरांना कमीत-कमी त्रास सहन करावा लागेल याचीही काळजी घ्यावी, असे मला वाटते.

### अधिकाऱ्यांची उत्तम कामे

विदर्भात अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असतात. हे चित्र आता बदलू लागले असून अनेक अधिकारी उत्तम काम करीत आहेत. चंद्रपूर तसेच अमरावतीचे जिल्हाधिकारी बुलढाण्याचे पोलीस अधिक्षक यांनी लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्या समन्वय राखत जनतेचे प्रश्न सोडवण्याबाबत चांगला पुढाकार घेतला असून मी त्याबाबत त्यांचे नक्कीच कौतुक करेन.



### राजकीय परिस्थितीचे वळण

इथल्या अधिवेशन काळात सर्वच आमदार इथे मुक्कामी असल्याने व इतरत्र धावपळ कमी असल्याने निवांत वेळ अधिक असतो. त्यामुळे एकमेकांच्या भेटीगाठी घेता येतात, त्याचा फायदा राजकीय परिस्थिती पुढे कोणते वळण घेणार आहे. हे जाणून घेण्यातही होतो. अधिवेशनाचा कालावधी किती असावा याबाबत मतमतांतरे असली तरी छोटी पण परिणामकारक अधिवेशने महत्त्वाची आहेत असे मला वाटते.

येत्या अधिवेशनासाठीही आम्ही चांगली तयारी केली असून मराठा आरक्षण, महिलांवरील अत्याचार, नोटाबंदीनंतरची परिस्थिती, रस्ते सुरक्षा इ.प्रश्नांवर विधायक चर्चा व समाधानकारक मार्ग निघतील अशी अपेक्षा आहे. नागपूर अधिवेशन माझ्यासाठी नेहमीच खास आहे व राहील!

## आवडते शहर, आवडती मीडिया

**नागपूर अधिवेशन हे माझ्या पक्षाच्या पातळीवर अत्यंत महत्त्वपूर्ण असून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे अधिवेशन काळात दरवर्षी एकदा तरी नागपुरात बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेतात, पक्षाच्या आमदारांना मार्गदर्शन करतात.**

**नागपूरचा मीडियाही मला फार आवडतो. कारण त्यांच्याकडे नेहमी काहीतरी वेगळी माहिती असते. मी तर अधिवेशनापूर्वी आणि अधिवेशनकाळात तेथील अनेक वर्तमानपत्रांचा आवर्जून अभ्यास करून त्या-त्या वेळच्या स्थानिक समस्या काय आहेत याची माहिती करून घेते. नागपूरची दीक्षाभूमी, टेकडी गणपती मंदिर, तलावपाळीवरील शंकराचे मंदिर इ.ना मी अधिवेशनकाळात आवर्जून भेट देते.**

**शब्दांकन– मीनल जोगळेकर**
**(वरिष्ठ सहायक संचालक)**

# थंडी, चर्चा आणि मंथन



**उल्हासदादा पवार**
(माजी विधानपरिषद सदस्य)

> नागपूर अधिवेशनाच्या वेळी सरकारचा मुक्काम नागपुरात असतो. त्यामुळे सभागृहातील चर्चा आणि निर्णयांबरोबरच विदर्भातील पक्षसंघटना आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये चैतन्य असते. मंत्र्यांना भेटणारी शिष्टमंडळे, मोर्चे, निवेदने, बैठका यामुळे संपूर्ण दिवस गजबजलेला असतो. त्यानिमित्ताने विदर्भातील अनेक छोट्या मोठ्या प्रश्नांची तड लागते. विदर्भातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या भावना सरकारपर्यंत पोहोचतात.

नागपूर शहराला असलेली मध्यप्रांताच्या राजधानीची पार्श्वभूमी, नागपूर करार आणि महाराष्ट्राचा प्रादेशिक विस्तार लक्षात घेता, नागपूर अधिवेशनाचा पर्याय खर्चीक असला तरी आवश्यक वाटतो. प्रादेशिक आणि भावनिक ऐक्याला सर्वाधिक महत्त्व दिले जाईल अशी भूमिका स्व. यशवंतराव चव्हाण यांनी प्रथमपासूनच मांडली होती.

१९७१-७२ साली मी आमदार नसलो तरी प्रदेश युवक काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून अधिवेशन काळात नागपूरला जात असे. त्या वेळी कापूस एकाधिकार खरेदी योजना, विदर्भाचा औद्योगीक विकास, शेतीचे प्रश्न इत्यादी विषयांवर सर्वच पक्षांचे पदधिकारी, कार्यकर्ते यांच्या तयारीसाठी शिबिरे व्हायची. मला वसंतरावजी नाईक, शेषराव वानखेडे, रा.सू.गवई, नरेंद्र तिडके, सुधाकरराव नाईक, एन.के.पी साळवे, शंकरराव गेडाम, नासिकराव तिरपुडे, मधुसूदन तथा नानासाहेब वैराळे, जवाहरलाल दर्डा यांच्यासह विद्यमान मुख्यमंत्र्यांचे वडील आणि तेव्हाचे विधानपरिषद सदस्य गंगाधरराव फडणवीस अशा सर्वांचा पाहुणचार या कालावधीत स्वीकारता आला. त्या वेळी रणजित देशमुख हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते.

## काव्यमैफल

दिवंगत माजी राज्यपाल आणि विधान परिषदेचे माजी सभापती रा.सू. गवई यांच्या निवासस्थानी गझलसम्राट सुरेश भट यांची होणारी काव्यमैफल अजूनही माझ्या स्मरणात आहे. तत्कालीन विधानसभा अध्यक्ष बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या शेतावरील हुरडा पार्टीसाठी आमदार निवासातून खास बस निघायची. गरम हुरडा सोबत दही, लसूणचटणी आणि जेवणाला पिठले-भाकरीचा बेत. सोबत वांग्याचे भरीत. पिठल्यावर खास वैदर्भीय पद्धतीने तेलाची धार.... आणि या सर्वांच्या जोडीला आमदारांची काव्यशास्त्र विनोदाशी नाते जोडणारी उत्तररात्रीपर्यंत चालणारी गप्पाष्टकांची मैफिल... बॅ.वानखेडे यांच्याप्रमाणे विदर्भातील मंत्री, नेते यांची निवासस्थाने सुद्धा अशाच कार्यक्रमांनी, स्नेहमेळाव्यांनी गजबजलेली असतात. माजी उपसभापती वसंतराव डावखरे यांनीही दरवर्षी न चुकता अशा कार्यक्रमाचे स्वरूप थोडे व्यापक करत अधिकारी-कर्मचारी वर्गालाही या कार्यक्रमात समाविष्ट करून घेतले आहे. स्व.डॉ. श्रीकांत जिचकार, सुधाकर गणगणे, किशोर काशिकर, रमेश पाटील असे विदर्भातील कितीतरी मित्र मला लाभले. विद्यार्थी चळवळ, महाविद्यालयीन निवडणूका आणि युवक काँग्रेसचे कार्य यामुळे आमच्यामधील मैत्रीसंबंध वृद्धिंगत होत गेले. नागपूर अधिवेशन काळातील गाठीभेटींमुळेच हे सर्व घडून आले.

## थंडीचा कडाका

सध्या नागपूरला कधीमधी विशेष थंडी जाणवते परंतु तेव्हा थंडीचा कडाका हमखास असायचा. आम्हा पुणेकरांना या थंडीचा अनुभव असायचा परंतु मुंबईकर आमदारांना मात्र थंडीशी जुळून घेतांना नाकीनऊ यायचे... त्या वेळी विमान सेवा आणि अति जलद रेल्वे गाड्यांची, एसटी बसेसची आतासारखी चलती आणि चैन नव्हती. महाराष्ट्र एक्सप्रेस, सेवाग्राम, हावडा आणि कलकत्ता मेल अशा मोजक्याच रेल्वे गाड्या तेव्हा होत्या. प्रवासाचे तास जास्त असल्याने सर्व आमदार दोन वेळेस पुरेल असे डबे सोबत आणायचे. धपाटे, दशम्या, खाकरे, विविध प्रकारचा चटण्या आणि पापड यांची चलती असायची. सर्व आमदारांचा एका डब्यातून नागपूरकडे प्रवास सुरू झाल्यावर आपल्या भागातले प्रश्न, सुरू असलेल्या विकास योजना, या अधिवेशनात कुठल्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करायचा याचा 'Discussion on Wheel' स्वरूपात एक मुक्त परिसंवादच सुरू व्हायचा. गाड्या-विमाने नसल्याने शनिवार-रविवार बहुतांश आमदार नागपूरमध्येच राहायचे.

## पाहुणचार

वैदर्भीय मित्रांच्या आदरतिथ्याचे आणि पाहुणचाराचे खरोखरच कौतुक केले पाहिजे. शनिवार-रविवारसाठी एका वेळी दहा दहा कार्यकर्त्यांचा वऱ्हाडी भोजन निमंत्रणासाठी आम्हाला आग्रह सुरू असायचा. सुटीच्या

दिवशी ताडोबा, नागझीरा, मेळघाट, पेंच प्रकल्प, इटीहाडोह अशा ठिकाणी हमखास एखादी भेट निश्चित दिली जात असे. आदिवासी संस्कृती, त्यांचे ग्रामीण लोकजीवन यांचा जवळून परिचय करून घेण्याची संधी मला यासंदर्भात महत्त्वाची वाटते.

### निसर्ग चमत्कार

अशाच एका सुटीच्या प्रसंगी मला निसर्ग अभ्यासक, साहित्यिक आणि तेव्हा इटीहाडोह, नवेगाव येथे वन अधिकारी असलेले श्री. मारूती चितमपल्ली यांच्या समवेत घालवलेला रविवार आजही स्मरणात आहे. १९७८ सालचा तो प्रसंग असावा. जंगलातील प्रत्येक निसर्ग चमत्काराची माहिती ते अगदी मनापासून देत होते. याव्यतिरिक्त रानरेडे, पाणकुत्रे, पाणकोंबड्या यांच्या विषयीचे संशोधन ते सांगत होते. माधवराव पाटील या आदिवासीच्या जीवनावर त्यांनी पहिली कथा लिहिली. 'चांदी कवडी आणि निरगू गोंड' हे त्या कथेचे नाव. 'सत्यकथा' मासिकात ही कथा प्रकाशित झाली आणि कथेला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

### घनिष्ठ मैत्री

प्राचार्य रामभाऊ शेवाळकर, प्राध्यापक मधुकर केचे, ग्रेस ही साहित्यिक मंडळी आणि त्याचबरोबर पां.वा गाडगीळ, बाबा दळवी, युधिष्ठिर जोशी, सुरेश द्वादशीवार ही पत्रकार मंडळी नागपूर अधिवेशनामुळेच मैत्रीच्या धाग्याने जोडली गेली.

पूर्वी नागपूर आमदार निवासाला एकच विंग होती आणि आश्चर्य म्हणजे एका कक्षा मध्ये दोन-दोन आमदार विनातक्रार आनंदाने रहायचे. सुयोग पत्रकार वसाहतदेखील तेव्हा आमदारांसाठी राखीव असायची. आता आमदारनिवासात राहण्याऐवजी हॉटेल संस्कृतीकडे आमदारांचा आणि, पत्रकार मित्रांचाही कल वाढत आहे.... असो.

विलासरावजी देशमुख आणि माझा घनिष्ठ स्नेह. त्यांच्याशी निगडित नागपूर अधिवेशन काळातील काही महत्त्वाचे लोकहिताचे निर्णय माझ्या कायमस्वरूपी स्मरणात राहिले आहेत. ते मुख्यमंत्री असताना नागपूर अधिवेशन काळात नागपूर विद्यापीठाचे नामकरण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ असे तर अमरावती विद्यापीठाचे नामकरण संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ असे झाले. पंतप्रधानपदी डॉ. मनमोहन सिंग असताना केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी ७२ हजार कोटी रुपयाची कर्जमाफी योजना जाहीर केली. पश्चिम महाराष्ट्रातील पाच एकर आणि विदर्भातील १५ एकर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना मिळणारा तफावतीचा ८०० कोटी रुपयांचा फरक राज्य सरकार देईल, ही घोषणा त्यांनी नागपूर




अधिवेशनकाळात सभागृहात केली असे मला आठवते. थोर स्वातंत्र्यसेनानी आर.के.पाटील, नागपूर यांनी १०० व्या वर्षात पदार्पण केले, त्याच दरम्यान त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळी ही मुख्यमंत्रिपदी असलेल्या स्व. विलासराव देशमुख यांचेबरोबर मी श्री. पाटील यांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार करताना उपस्थित होतो. वार्धक्यामुळे त्यांनी आपल्या भावना कागदावर लिहून दिल्या. मी काय केले हे महत्त्वाचे नाही, माझ्यासारखा त्याग


नागपूरचा लज्जतदार हुरडा

देशासाठी अनेकांनी केला आहे... पण आता इच्छा असूनही मला वार्धक्यामुळे देशासाठी काही करता येत नाही ही वेदना सतावते आहे... अशा भावपूर्ण उद्गारांची चिठ्ठी ही विलासरावांनी पुढे अनेक दिवस खिशात जपून ठेवली होती. आज मागे वळून बघताना सर्व क्षेत्रातील गतिमानतेचा, बदलांचा परिणाम नागपूर अधिवेशनातील वैशिष्ट्यांवरही होत आहे. 'अशी थंडी.... असे अधिवेशन, अशी शिबिरे.... अशा चर्चा' असे म्हणत भूतकाळात डोकावण्याची संधी 'लोकराज्य' मासिकाच्या या विशेषांकामुळे मला मिळाली, त्याचा निश्चितच आनंद आहे. बाकी काय, कालाय तस्मै नमः....

शब्दांकन: निलेश मदाने




## मारूती चितमपल्लींसोबत मैत्री

**मारूती चितमपल्ली यांच्या बरोबरच्या पहिल्या भेटीचे रूपांतर नंतर घनिष्ठ मैत्रीत झाले. श्री. चितमपल्ली यांची अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्याचा मला अतिशय आनंद झाला. त्या वेळी मुख्यमंत्री असलेले विलासराव देशमुख यांना घेऊन मी त्यांच्या नागपूर निवासस्थानी गेलो व त्यांचा सत्कार केला, तो क्षण आजही स्मरणात आहे. सुरेश भटांशी माझा जवळचा स्नेहसंबंध होता. अगोदर ते रामदास पेठेत असताना आणि नंतर ते धंतोलीत गेल्यानंतर तेथेही त्यांच्या भेटीला मी जात असे.**

# लोकभावनेचे प्रतिबिंब

**महाराष्ट्र एकमेव असे राज्य आहे, जेथे दरवर्षी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन राजधानी मुंबईऐवजी उपराजधानी नागपुरात बोलावले जाते. या अधिवेशनाच्या अल्पावधीमुळे कधी त्याला 'पिकनिक अधिवेशन' म्हटले जाते तर कधी 'हुरडापार्टी' अधिवेशन म्हटले जाते. पण अधिवेशनाचे हे मूल्यांकन योग्य नाही. अधिवेशनाची पार्श्वभूमी आणि इतिहास पाहिला तर कोणताही सूज्ञ नागरिक असे मूल्यांकन करणार नाही.**

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर दरवर्षी नेमाने नागपुरात महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन होत आहे. भारतात महाराष्ट्राशिवाय जम्मू काश्मीर हेच एकमेव राज्य असेल की, जेथे राज्याला दोन राजधान्या आहेत.त्यातही जम्मू काश्मीरमध्ये फक्त जम्मू या उपराजधानीत फक्त सरकारचे मुख्यालयच हलवले जाते. महाराष्ट्र मात्र एकमेव राज्य आहे जेथे दरवर्षी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन राजधानी मुंबईऐवजी नागपुरात बोलावले जाते.

### ऐतिहासिक आधार

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना होण्यापूर्वी त्यावेळच्या आठ जिल्ह्यांचा विदर्भ विभाग द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट होता. तत्पूर्वी म्हणजे राज्य पुनर्रचनेपूर्वी हाच विभाग मध्यप्रांत आणि वऱ्हाड (सी.पी.अँड बेरार) या द्विभाषिक राज्यात समाविष्ट होता. केंद्र सरकारने जेव्हा राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली तेव्हा त्या आयोगासमोर देशातील अनेक राज्यातील नागरिकांनी आपल्या कैफियती सादर केल्या. विदर्भातील कार्यकर्त्यांनीही आयोगासमोर आपली कैफियत सादर करुन विदर्भाचे वेगळे राज्य निर्माण करावे अशी मागणी केली. त्या मागणीला ऐतिहासिक आधारही होता. कारण तत्पूर्वी नेमण्यात आलेल्या दार कमिशनने विदर्भाच्या वेगळ्या राज्याची शिफारस केली होती. योगायोग असा की, न्या. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखालील दुसऱ्या राज्य पुनर्रचना आयोगानेही वेगळ्या विदर्भ राज्याच्या स्थापनेची शिफारस केली. याच सुमारास उर्वरित महाराष्ट्रात मुंबईसह मराठी भाषिकांचे संयुक्त महाराष्ट्र राज्य झाले या मागणीसाठी

**लक्ष्मण जोशी**

तीव्र आंदोलन सुरु होते. केंद्र सरकारचे भाषावार प्रांतरचनेचे उद्दिष्ट असल्यामुळे मराठी भाषिकांचेही एकच राज्य झाले पाहिजे अशी त्या मागे भूमिका होती. तिला अनुसरुनच विदर्भातील जनतेचे मन वळवण्यासाठी विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र यामधील नेत्यांनी चर्चा केली. तिचे फलित म्हणून अकोला करार व नागपूर करार असे दोन करार करण्यात आले. अर्थात त्या करारांमागे कायद्याचे बळ नसले तरी लोकभावनेचे प्रतिबिंब होते. त्यामुळे त्या आधारावरच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला केंद्रीय नेत्यांची मान्यता मिळाली. या कामी स्व.यशवंतराव चव्हाण यांनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली म्हणूनच 'संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश' आणण्याचे श्रेय त्यांना दिले जाते.








### हिवाळी अधिवेशनाची पार्श्वभूमी

महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपुरातील हिवाळी अधिवेशनाला ही पार्श्वभूमी आहे. कारण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या करारात विदर्भाला त्याच्या महत्त्वाबाबत आश्वस्त करण्यासाठी विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपुरात घेण्यात येईल या आश्वासनाचा समावेश आहे. त्याचा ऐतिहासिक म्हणूनच उल्लेख करावा लागेल व त्या दृष्टीनेच या अधिवेशनाचे मूल्यांकन करावे लागेल.

### व्यक्त होण्याची संधी

या अधिवेशनाच्या निमित्ताने आपल्या भावना, व्यथा, वेदना व्यक्त करण्याची संधी मिळते हे नाकारता येणार नाही. एकप्रकारे ही या अधिवेशनाची जमेची बाजू आहे. कारण आर्थिक सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या वैदर्भीयांची आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मुंबईपर्यंत जाण्याची आर्थिक क्षमताच नाही. त्यामुळेच की, काय, हिवाळी अधिवेशनकाळात असा एकही दिवस निघत नाही की, ज्यादिवशी विधिमंडळावर जाणारा एकही मोर्चा नाही. किंबहुना हे अधिवेशन सभागृहातील कामकाजाचे जेवढे गाजत नाही तेवढे मोर्चांनी गाजते.

**(लेखक लोकशाही वार्ता या दैनिकाचे संपादक आहेत.)**

# आमच्या अपेक्षा




**नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनाच्या अनुषंगाने सामान्य नागरिकांचा बऱ्याच अपेक्षा असतात. त्यापैकी काही प्रातिनिधिक अपेक्षांचे संकलन...**

## नेमके दान पदरात पडावे



दरवर्षी डिसेंबर महिन्यात नागपूर अधिवेशनासाठी अवघे मंत्री, आमदार नागपूरात याकाळात असतात. त्यामुळे केवळ विदर्भाच्याच आमदारांनी नव्हे, तर उर्वरीत महाराष्ट्रातील सर्व सदस्यांनी विदर्भ समजून घेऊन विदर्भाला न्याय देणे अपेक्षित असते. इथला उद्योग, इथली शेती, इथली संस्कृती, इथले वर्क कल्चर, इथला सामान्यांचा आवाज सर्व समजून घेण्यासाठी ही वेळ पुरेशी असते. मात्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरही ही प्रक्रिया पूर्ण होते काय ? माझ्या सारख्या व्यावसायिकाला प्रश्न पडतो. कारण नागपूर अधिवेशनातून या प्रदेशाला अमूक एक बाब मिळाली. नेमका काय लाभ झाला? हे दिसले पाहिजे. अधिवेशनाच्या बातम्या जश्या ऐकायला येतात तसेच विदर्भाच्या विकासाच्या शुभवार्ताही कानावर आल्या पाहिजे.

**-प्रमोद गुजलवार**

व्यावसायिक, यवतमाळ

## विदर्भाचा बॅकलॉग भरून काढा

नागपूरातील अधिवेशन आणि महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या अधिवेशनाचे महत्त्व विदर्भासह महाराष्ट्रातील जनतेने समजून घेतले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील एखाद्या तालुक्यातील दुधाची उपलब्धता आणि विदर्भातील संपूर्ण जिल्ह्यातील उपलब्धता सारखीच होत असेल तर हा बॅकलॉग भरुन काढणे गरजेचे नाही का? विदर्भच नव्हे तर मराठवाडा, खान्देश, कोकण मागे राहता कामा नये. हा प्रदेश, या प्रदेशाची भौगोलिक महत्त्व आणि महाराष्ट्राच्या निर्मितीक्षणी दिलेल्या अभिवचनाचा अभ्यास विदर्भातील अधिवेशन काळात प्रत्येक आमदारांनी आणि त्यांच्या नेतृत्वाने करावा. विदर्भाच्या विकासाला गती द्यावी. विदर्भाचा बॅकलॉग दूर करावा एवढीच मागणी नागपूरच्या अधिवेशनातून आम्हाला आहे.



**- प्रा. कॅप्टन डॉ. प्रशांत कोठे**

इतिहास विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, मु.अकोट, जि.अकोला.

## उद्योग आणि रोजगाराची आवश्यकता



नागपूर अधिवेशन आणि दरवेळी कापसाच्या भाव वाढीसाठी निघणारे मोर्चे यामुळे नागपूरात अधिवेशन असल्याचे दरवर्षी माहित पडते. गेल्या २० वर्षात दोन वेळा मोर्चामध्ये सहभागी झालो होतो. सरकारने सोयाबीनच्या हमी भावाची घोषणा केली मात्र तेवढया मोठ्या प्रमाणात खरेदी केंद्र उभारले नाही. त्यामुळे ऐन दिवाळीत शेतकऱ्यांना आवश्यकतेपोटी सोयाबीन विकता आले नाही. अधिवेशन काळात वाढत्या महागाईला लक्षात घेऊन सोयाबीन व कापसाचे भाव वाढवून मिळावे. विदर्भातल्या प्रत्येक शेताला पाणी मिळावे आणि प्रत्येक तालुक्याला एक मोठा उद्योग मिळावा. या उद्योगामध्ये प्रत्येक गावातील तरुणांना रोजगार मिळावा अशा पध्दतीचे निर्णय झाले पाहिजे. विदर्भाचे मुख्यमंत्री असताना या भागाचा बॅकलॉग भरुन निघाला पाहिजे.

**-प्रकाश घावडे**

शेतकरी, माणिकवाडा, यवतमाळ

## महिला सबलीकरण आवश्यक

विदर्भाचे मुख्यमंत्री झाल्यापासून समतोल विकास साधण्यासाठी याप्रदेशाकडे लक्ष वेधल्याचे दिसून येते. मात्र यामध्ये आणखी गती अधिवेशनाच्यामार्फत मिळावी. महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी या अधिवेशनाचा उपयोग व्हावा, असे वाटते. आणखी एक महत्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील शाळांमधील गळती कमी व्हावी, जिल्हा परिषदेच्या शाळेत सेमी इंग्रजीला सुरुवात करण्यावर लक्ष वेधावे, असे वाटते. गरिबांना विशेषतः मुलींना शिक्षणासाठी या शाळांची मोठ्या प्रमाणात मदत होते. या शाळेंचा दर्जा राखण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. गृहिणींचा रोजचा संबंध येणाऱ्या समस्या म्हणजे पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छता. त्यामुळे आता २१ व्या शतकात महिलांच्या डोक्यांवर अनेक गावांत असणारा हंडा उतरायला हवा. प्रत्येकाच्या घरात स्वच्छ पाणीपुरवठ्याची अपेक्षा या अधिवेशनाच्या निमित्ताने मुख्यमंत्र्यांकडे करते आहे.



**- अर्चना पवार**

नागपूर

# लोकप्रतिनिधींच्या नजरेतून...

**नागपूर हिवाळी अधिवेशनानिमित्त लोकप्रतिनिधींच्या विविध अपेक्षा असतात. याविषयी काही लोकप्रतिनिधींनी आपल्या भावना टीम लोकराज्यजवळ व्यक्त केल्या आहेत.**

## हक्काचे व्यासपीठ



नागपूर कराराप्रमाणे नागपूर येथे भरणारे हिवाळी अधिवेशन आपल्या मागण्या मान्य करून घेण्याच्या दृष्टीने विदर्भासाठी हक्काचे व्यासपीठ आहे. विदर्भ महाराष्ट्राचा महत्त्वपूर्ण भाग असला तरी येथील संस्कृती आणि प्रश्नही वेगळे आहेत. या अधिवेशनाच्या निमित्ताने सर्व आमदारांना विदर्भाची संस्कृती आणि प्रश्नांची चांगली ओळख होते. येथील वनसंपदेची ओळख होते. महाराष्ट्राच्या एकजिनसी एकराज्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर विदर्भातील अनेकांचे किरकोळ प्रश्न असतात, काही अडचणी, मागण्या असतात त्या मान्य करून घेण्यासाठी नागपूर अधिवेशन हे विदर्भावासियांसाठी घरआंगण असते.

**- डॉ. अशोक उईके, विधानसभा सदस्य,**
**राळेगाव विधानसभा मतदारसंघ**

## विविध प्रश्नांचा उहापोह



नागपूर अधिवेशन म्हणजे महाराष्ट्राच्या सर्व निरनिराळ्या संस्कृती आणि लोककला यांच्यासह विदर्भ कसा जोडला गेला आहे याचे दर्शन घडवण्याची संधी. या अधिवेशनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या सर्व आमदारांना विदर्भाचे प्रश्न आणि वैविध्य जवळून अनुभवता येते. या अधिवेशनात सर्व आमदार महाराष्ट्रातील विविध प्रश्नांचा उहापोह करतील. माझ्या रायगड जिल्ह्यातील आधारभूत भाव भात खरेदी केंद्रे वेळेवर सुरू करणे, रस्ते तसेच इतर समस्या मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

**- प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य,**
**पनवेल विधानसभा मतदारसंघ**

## प्रादेशिक असमतोल दूर व्हावा !

मुंबई म्हणजे महाराष्ट्र नव्हे तसेच नागपूर म्हणजे संपूर्ण विदर्भ नव्हे. बुलडाण्यापासून गडचिरोलीपर्यंत हा मोठा विस्तीर्ण प्रदेश असून भाषा, संस्कृती,सण-उत्सव एवढेच काय परंतु पीक पॅटर्नसुद्धा वेगळा आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याच्या समस्या वेगळ्या आहेत.  या समस्यांना मुंबईत होणाऱ्या अधिवेशनांमध्ये बऱ्याच वेळा न्याय मिळत नाही. त्यामुळे नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भातील आमदारांना या काळात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झाली पाहिजे. विदर्भातील प्रादेशिक असमतोलदेखील राखला गेला पाहिजे. यासाठी  या अधिवेशनामध्ये विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातील सर्व आमदारांनी विविध आयुधांच्या माध्यमातून आपल्या प्रश्नांना वाचा फोडली पाहिजे, अशी अपेक्षा आहे.  या अधिवेशनानिमित्त उर्वरित महाराष्ट्रातील आमदारांनादेखील विदर्भ समजून घेता येतो. त्यांनी या काळात या प्रदेशाच्या अस्मितेसह मागण्याही जाणून घ्याव्यात. या माध्यमातून त्यांनाही आपण या प्रदेशाचे नागरिक म्हणून विदर्भाचे काय देणे लागतो हे कळेल.



**- डॉ. संजय कुटे, विधानसभा सदस्य,**
**जळगाव-जामोद, विधानसभा मतदारसंघ**

## खारपाण पट्ट्याचा प्रश्न सुटावा !

विदर्भाच्या पश्चिम भागातील अकोला, बुलडाणा, अमरावती या भागातील जनतेला गेल्या कित्येक वर्षापासून अशुध्द पाण्याच्या पुरवठा होत असून खारपाण पट्ट्यांमुळे विविध आजारांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे या भागातील खारपाण पट्ट्याची समस्या सुटावी व त्यासाठी कायमस्वरूपी तोडगा या अधिवेशनातून निघावा, अशी मला अपेक्षा राहणार आहे. २१ व्या शतकाच्या मध्याकडे जात असताना या भागातील शेकडो गावांतील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नाही. या भागांतील सिंचनाची क्षमता वाढविण्याची गरज असून त्यासाठी मोठी धरणे न बांधता छोटी बॅरेजेची साखळी मंजूर करण्यात यावी. त्यामुळे कमी खर्चात सिंचनाच्या क्षमतेत वाढ होईल. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील



निकाली निघेल. या अधिवेशनामध्ये या प्रश्नांची सोडवणूक होण्याची अपेक्षा आहे.

**- बळीराम सिरस्कार, विधानसभा सदस्य,**
**बाळापूर विधानसभा मतदारसंघ**

## धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकास कार्याच्या झपाट्यात नागपूर शहराचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र यासोबतच या हिवाळी अधिवेशनात आम्ही विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळावा आणि त्यांना त्यांच्याजवळच्या ठिकाणी बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. याशिवाय भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी पटवर्धन मैदानाच्या लीज नूतनीकरणाचा प्रश्न मार्गी लागावा, अशी अपेक्षा यावेळी नागपूरातील तमाम आंबेडकरी जनतेला आहे. यासाठी या अधिवेशनात प्रयत्न करणार आहे. तिसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नागपूरातील मिहान प्रकल्प असो, सुरू झालेला मेट्रो प्रकल्प असो व अन्य मोठ्या औद्योगिक आस्थापनेत नागपूरातील स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी संधी मिळावी, यासाठी सभागृहामध्ये मागणी करणार आहे.

**- डॉ. मिलिंद माने, विधानसभा सदस्य,**
**नागपूर उत्तर विधानसभा मतदारसंघ**

## कृषी आणि सिंचनावर चर्चा व्हावी



महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून नागपूर येथे हिवाळी अधिवेशन होत आहे. येथील अधिवेशनामध्ये प्रामुख्याने विदर्भातील प्रश्न सोडवण्यासाठी घेतले जाते. हिवाळी अधिवेशनाची ही प्रथा चालू असून यामध्ये कृषी, सिंचन याचबरोबर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ५०० व १००० रुपयांच्या नोटांवरील बंदी घालण्याचा निर्णय घेतला याविषयांवर विशेष चर्चा होणार आहे, म्हणूनच वैचारिक पातळीवर या अधिवेशनास विशेष महत्त्व आहे.

**- शिवाजीराव नाईक, विधानसभा सदस्य,**
**शिराळा मतदारसंघ**



## ऐंशी टक्के विदर्भावर चर्चा व्हावी

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी नागपूरात ज्या उद्देशाने अधिवेशनाला सुरुवात केली.




त्या उद्देशाला जपत या अधिवेशनामध्ये किमान ८० टक्के चर्चा विदर्भाच्या प्रश्नावरच व्हावी. त्यादृष्टीने सत्ताधारी पक्षाने विदर्भातील सर्व आमदारांना संधी देऊन अधिवेशनाचा कालावधी वाढवावा. तसेच या अधिवेशनात विदर्भातील विजेच्या प्रश्नांवर, कापसाच्या व कडधान्यांच्या भावाबद्दल, तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांनवर चर्चा होणे अपेक्षित आहे.

**- ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू**
**विधानसभा सदस्य, अचलपूर मतदारसंघ**

## चर्चा घडाव्यात

हिवाळी अधिवेशन हे त्या भागातील प्रश्न सोडवण्यासाठीचे व्यासपीठ आहे. विदर्भाचा विकास व्हावा, येथील प्रश्न मार्गी लागावेत या उद्देशाने नागपूर येथे अधिवेशन भरवले जाते. या काळात शासन नागपूर येथे स्थलांतरीत होते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. हा खर्च विचारात घेऊन सभागृहात नुसता गोंधळ होणार नाही आणि चर्चा घडवून विविध प्रश्न सोडवले जातील याकडे सर्व आमदार सदस्यांनी लक्ष द्यावे. सर्वांनी विदर्भातील पर्यटनाचा अनुभव नक्कीच घ्यावा पण विदर्भाचे प्रश्नही तेवढ्याच पोटतिडकीने मांडले जावेत, हीच रास्त अपेक्षा.



**- संजय शिरसाट, विधानसभा सदस्य,**
**औरंगाबाद पश्चिम विधानसभा मतदारसंघ**

## शेतकऱ्यांच्या अपेक्षा

विदर्भात यावर्षी कापूस आणि सोयाबीनचे चांगले पीक आले असून शेतकऱ्यांच्या घरात पीक उपलब्ध आहे. शासन यावेळी योग्य भाव देईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. या अधिवेशनात कापूस आणि सोयाबीनचे भाव वाढून मिळावे यासाठी आम्ही प्रयत्न करू. हमीभावापेक्षा कितीतरी कमी प्रमाणात व्यापाऱ्याकडून मालाची खरेदी होत आहे. शासनाने विदर्भातल्या सर्व भागात गावपातळीवर खरेदी सुरु करावी, अशी मागणी आहे. या अधिवेशनामध्ये विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्प, बंद पडलेले औद्योगिक प्रकल्प सुरू व्हावे, रोजगाराची संधी देणारे प्रकल्प प्रदेशात उभे राहावे, यासाठी मागणी केली जाईल.



**- हर्षवर्धन सपकाळ, विधानसभा सदस्य,**
**बुलडाणा विधानसभा मतदारसंघ**



# इतिहासाचा साक्षीदार




**गर्द हिरवळीत गिरिशिखरांवर ध्यानमग्न स्थितीत बसलेल्या तपस्व्याप्रमाणे नागपूरच्या सेमिनरी हिलवर राजभवनचा वास्तुपुरुष गेली १२५ वर्षे जणू एका ऐतिहासिक प्रदेशाचे बदलते रूप न्याहाळत विचारमंथनात निमग्न आहे. हा वास्तुपुरुष साक्षीदार राहिला आहे असंख्य स्थित्यंतरांचा, विविध आंदोलनांचा, स्वातंत्र्य चळवळीचा, विकासाचा व अनेक घडामोडींचा.**

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या राज्यातील निवासस्थानांपैकी एक असलेल्या नागपूर येथील राजभवनाला आपला स्वतंत्र असा इतिहास आहे. भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने पाहू गेल्यास नागपूर येथील राजभवन राज्यातील मुंबई व पुणे येथील राजभवनांच्या तुलनेत सर्वात मोठे आहे.

सन १८९१ साली नागपूर येथे, आज राजभवन म्हणून ओळखली जाणारी भव्य दिव्य वास्तू बांधली गेली त्या वेळी देश पारतंत्र्यात होता. हे वर्ष इतर काही राजकीय घडामोडींमुळे देखील महत्त्वाचे आहे हे या ठिकाणी नमूद केले पाहिजे.

त्या वर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सातवे अधिवेशन नागपूर येथे भरले होते व आनंदचंद्रालू त्याचे अध्यक्ष होते. विशेष म्हणजे अनेक मान्यवरांच्या मांदियाळीत या अधिवेशनाला तत्कालीन मध्य प्रांतांचे (सेंट्रल प्रॉव्हिंसेस) कमिशनर ए पी मॅक्डोनेलदेखील उपस्थित होते. हेच मॅक्डोनेल राजभवनाच्या वास्तूमधले पहिले निवासी होते.

सन १८९१ च्या अधिवेशनात स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने चार महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले होते, त्यांचा उल्लेख या ठिकाणी करणे आवश्यक वाटते.

- **कायदे मंडळात भारतीयांना प्रतिनिधित्व देणे**
- **भारतात मुलकी सेवा (सिव्हिल सर्विसेस) परीक्षा घेणे**
- **स्वसंरक्षणासाठी हत्यार बाळगणे; व**
- **मिठावरील कर समाप्त करणे.**

या अधिवेशनाच्या ठिकाणी स्थानिक विणकरांनी विणलेल्या हातमागाच्या कापडाचे देखील प्रदर्शन भरवण्यात आले होते, अशी नोंद 'राजभवन्स इन महाराष्ट्र' या ग्रंथात इतिहासकार व छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालायाचे सेवानिवृत्त संचालक सदाशिव गोरक्षकर यांनी करून ठेवली आहे.

त्याच वर्षी, म्हणजे सन १८९१ साली नागपूर येथे 'Independent', 'देशसेवक' व 'गोरक्षण' ही वर्तमानपत्रे सुरू झाली. या वर्तमानपत्रांनी स्वातंत्र्याच्या हुंकाराचे स्फुल्लिंग चेतविले.

या पार्श्वभूमीवर नागपूरच्या सेमिनरी हिलच्या पठारावर ब्रिटिश राजसत्तेचे प्रतीक असलेली 'कमिशनर हाऊस' ही वास्तू अस्तित्वात आली.

तीन बाजूंनी अरबी समुद्राने वेढल्यामुळे भव्यता प्राप्त झालेल्या मुंबईच्या राजभवनाला 'देशातील राजभवनांची सम्राज्ञी' म्हणतात. मात्र स्थापत्यकला व नैसर्गिक सौंदर्यामुळे नागपूरच्या राजभवनाला 'राजभवनांचा राजा' असे म्हटले तर वावगे ठरणार नाही !

उंच टेकडीवर वसलेले असल्याने नागपूर राजभवनाच्या या वास्तूतून, आज इतके नागरीकरण झाले असतानादेखील अर्धेअधिक शहर व सभोवतालचा परिसर दिसतो. आजही येथून मोमीनपुऱ्यातील मशीद, सेमिनरी हिलवरील जापनीज गार्डन, पश्चिमेकडे विमानतळ, छावणी परिसर,




सीताबर्डी किल्ला आणि उत्तरेकडे थेट कोराडी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या चिमण्या दिसतात. अर्थात राजभवनच्या या वास्तुपुरुषाने केवळ शहर पाहिले नाही तर नागपूरचा स्वातंत्र्यपूर्वकालीन इतिहास पहिला, स्वातंत्र्याची चळवळ पहिली, त्यासाठी झालेली आंदोलने पाहिली आणि स्वातंत्र्यानंतर झालेली प्रगतीदेखील पाहिली आहे.

गोंडराजे बख्त बुलंद शाह यांनी आपली राजधानी सन १७०२ साली नागपूरला हलवल्यानंतर नागपूरचा खऱ्या अर्थाने सुवर्णकाळ सुरू झाला. सन १८०४ साली रघुजीराजे भोसले यांच्या दरबारात पहिले ब्रिटिश रेसिडेंट माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांची नियुक्ती होईपर्यंत म्हणजे साधारणपणे १०२ वर्षे हा काळ राहिला असे म्हणता येईल. हेच एल्फिन्स्टन सन १८१२ ते १८१९ या काळात मुंबई प्रांताचे गव्हर्नर झाले.


नागपूर राजभवन २०१६

### सी.पी. अँड बेरार

२ नोव्हेंबर १८६१ रोजी ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली भारत सरकारने एका ठरावाद्वारे सेंट्रल प्रॉव्हिसेस (मध्य प्रांताची) निर्मिती केली. त्यानंतर तीस वर्षांनी राजभवनाच्या वास्तूची निर्मिती झाली व कमिशनर ए पी मॅक्डोनेल निवासास गेले. १९०३ साली वऱ्हाड अर्थात बेरार हा भाग मध्य प्रांताला जोडण्यात आल्यानंतर प्रदेशाचे नामकरण 'सी.पी. अँड बेरार' असे झाले. त्यामुळे कमिशनरचे निवासस्थान असलेली राजभवनची वास्तू आता सी.पी. अँड बेरारच्या कमिशनरचे निवासस्थान झाली. याच सुमारास चीफ कमिशनरच्या कार्यालयाचा उल्लेख 'गोंडवाणा गुबर्नेटोरिस' असा करण्यात आल्याचे दिसते. सन १९२० पासून ही वास्तू मध्य प्रांताच्या गव्हर्नरचे 'गव्हर्नमेंट हाऊस' झाली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे निवासस्थान मध्यप्रदेशच्या गव्हर्नरचे निवासस्थान झाले. मंगलदास पक्वासा हे पहिले राज्यपाल तर पंडित रवी शंकर शुक्ल हे मध्यप्रदेशचे पहिले 'पंतप्रधान' झाले. पक्वासा यांच्यानंतर सन १९५२ ते सन १९५६ बी. पट्टाभी सीतारामय्या हे मध्यप्रदेशचे राज्यपाल होते. सन १९५६ साली नागपूर द्विभाषिक मुंबई राज्याला जोडल्यानंतर नागपूर येथील राजभवन मुंबई

**उमेश काशीकर**

राज्याच्या राज्यपालांचे 'गव्हर्नमेंट हाऊस' झाले व सन १९६० साली महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या राज्यपालांचे नागपुरातील निवासस्थान झाले.

### असे आहे नागपूर येथील राजभवन

सुमारे ९४ एकर परिसरात नागपूर येथील राजभवन वसले असून त्याची प्रवेशद्वारे वेगवेगळ्या भागात उघडतात! मुंबई येथील राजभवनात दरबार हॉल व बॅन्क्वेट हॉल (देशी-विदेशी राष्ट्रप्रमुखांच्या सन्मानार्थ शाही-मेजवानीसाठी वापरले जाणारे सभागृह) या स्वतंत्र इमारती आहेत, परंतु नागपूर येथील राजभवनात एकाच अखंड वास्तूमध्ये दरबार हॉल व बॅन्क्वेट हॉल आहेत.

राजभवनच्या इमारतीच्या प्रवेशद्वारावरच 'Erected 1891, E Penny EX ENG' असे कोरलेली शिला आहे. भारतीय तसेच पाश्चात्त्य वास्तुशैलीचा मिलाफ असलेल्या राजभवनचे बांधकाम करण्यास किमान दोन ते तीन वर्षे लागली असतील, हे जाणवते. ही वास्तु २४० X १५० फूट या आकाराच्या एका चौकोनी चौथऱ्यावर बांधली आहे. बांधकामाचे एकूण क्षेत्रफ़ळ ३२३७ चौरस मीटर इतके आहे. या भव्य वास्तूपुढे असलेली वर्तुळाकार हिरवळ (lawn) या वास्तूची शोभा अधिकच वाढवते. या इमारतीमध्ये राज्यपालांचे निवासस्थान तसेच कार्यालय तर आहेच शिवाय सहा गेस्ट रूम्सदेखील आहेत. याच्या पुढील भागात कमानी असून संपूर्ण इमारतीच्या दर्शनी भागात लांबच लाब वऱ्हांडा आहे.



**नागपूर राजभवनच्या विस्तीर्ण लॉनच्या बाहेर पंचधातूपासून बनवलेली एक मोठी तोफ आहे. या तोफेवर फारशी लिपीत कोरले असून ही तोफ हिजरी सन १०७४ अर्थात इसवी सन १६६३ साली औरंगजेब यांच्या काळातील आहे. या तोफेच्या काही अंतरावरच एक दुसरी लहान तोफ असून तिच्यावर १६५४ असे वर्ष लिहिले आहे. या लहान तोफेच्या जवळच राजभवनातील ध्वजस्तंभ असून तो नागपुरातील सर्वात उंच असा ध्वजस्तंभ आहे.**

इमारतीच्या खाली पूर्वीच्या परंपरेप्रमाणे तळघर आहे. सन १९१२ साली नागपुरात वीज आली त्यापूर्वी येथील हॉल्समध्ये कापडी पंखे होते. संपूर्ण इमारत कौलारू असून अलाहाबाद पद्धतीची कौले त्यावर बसवण्यात आली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात मुंबई येथील राजभवनात घोडपागा होती व एका वेळी तर तेथे ७२ घोडे होते ! त्याउलट नागपूर येथील राजभवनात चक्क हत्तीखाना होता!! मुंबईतील घोडपाग्याचे रूपांतर कालांतराने राज्यपालांच्या कार गॅरेज (वाहनतळ) मध्ये झाले तर नागपूर येथील हत्तीखान्याच्या जागी आज विस्तारित पाकशाला आहे.

### जैवविविधता उद्यान

सन २०११ साली तत्कालीन राज्यपाल के. शंकरनारायणन यांच्या पुढाकाराने नागपूर येथील राजभवनाच्या ७० एकर परिसरात एक भव्य जैव विविधता उद्यान तयार करण्यात आले असून त्या ठिकाणी ३० हजार विविध प्रजातींची वनसंपदा लावण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये तसेच युवापिढीमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण व्हावी या दृष्टीने हे जैवविविधता उद्यान तयार करण्यात आले असून, ते शालेय विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आले आहे. जैवविविधता उद्यानामुळे हा परिसर अधिकच सुशोभित झाला असून तेथे 'नक्षत्र उद्यान', 'निवडुंग वन', फुलपाखरू उद्यान, गुलाब उद्यान, औषधी वनस्पती उद्यान अशी विविध उद्याने विकसित करण्यात आली आहेत. एकट्या गुलाब उद्यानात देशभरातील गुलाबाच्या तब्बल २५७ प्रजाती येथे पाहायला मिळतात!! नागपूरच्या वसंतराव नाईक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती) येथे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या उमेदवारांच्या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून जैवविविधता उद्यान येथे भेट ठेवली जाते.

मा. राज्यपाल विद्यासागर राव यांच्या पुढाकाराने नागपूर राजभवनात १० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प सुरू करण्यात आला असून त्यातून राजभवन परिसरातील दिवे सौर ऊर्जेवर प्रकाशित करण्यात आले आहेत. नागपूर राजभवनात केंद्रीय भूजल मंडळाच्या माध्यमातून जल व मृद संधारणाचे मोठे काम करण्यात आले असून एकूण ४९ सिमेंट बंधारे, नाला बंधारे तसेच गॅबिअन पद्धतीचे बंधारे बांधण्यात आले आहे. नागपूर येथील राजभवन हे राज्यपालांचे निवासस्थान तर आहेच. परंतु राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व पंतप्रधान नागपूर भेटीवर असताना त्यांचेदेखील निवासस्थान असते. दरवर्षी अधिवेशन काळात राज्यपाल राजभवन नागपूर येथे विधान मंडळाचे सदस्य तसेच गणमान्य व्यक्तींसाठी चहापानाचे आयोजन करीत असतात. या चहापानाला 'ॲट होम रिसेप्शन' असे म्हणण्याची प्रथा आहे.

कोणे एके काळी परकीय राजवटीचे सत्ताकेंद्र असलेले गव्हर्मेंट हाऊस, आज स्वतंत्र भारताने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही पद्धतीतील राज्यातील महत्त्वपूर्ण संस्था म्हणून आपले घटनात्मक कर्तव्य बजावित आहे. 'युनियन जॅक' उतरून राष्ट्रीय ध्वज असलेला तिरंगा डौलाने फडकताना पाहण्याचे भाग्य राजभवनच्या या वास्तूला लाभले आहे.

**(संदर्भः सदाशिव गोरक्षकर यांचे 'राजभवन्स इन महाराष्ट्र'. छाया सौजन्यः जॉन एन्टविसल; सुधारक ओलवे. पूरक माहिती : रमेश येवले, प्रभारी अधिकारी, राजभवन, नागपूर)**

(लेखक मा.राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)

## कमिशनर हाऊस ते राजभवन : एका वास्तूचा प्रवास




**१८९१: चीफ कमिशनर, सेंट्रल प्रॉव्हिन्स यांचे निवासस्थान**

**१९०३: चीफ कमिशनर, सेंट्रल प्रॉव्हिन्स अँड बेरार (सी.पी. अँड बेरार) यांचे निवासस्थान**

**१९२०: सेंट्रल प्रॉव्हिन्सेसचे गव्हर्नर यांचे गव्हर्नमेंट हाऊस**

**१९४७: जुन्या मध्यप्रदेशच्या राज्यपालांचे शासकीय निवासस्थान**

**१९५६: मुंबई राज्याच्या राज्यपालांचे नागपूर येथील शासकीय निवासस्थान**

**१९६०: महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांचे नागपूर येथील शासकीय निवासस्थान**

**१९८८: महाराष्ट्राच्या उपराजधानीतील राजभवन**

# अशी असते विधानसभा




**विधानसभेच्या रचनेबद्दल राज्य घटनेमध्ये कलम १७० मध्ये तरतुदी देण्यात आलेल्या आहेत. घटनेने राज्य विधानसभेची महत्तम सदस्य संख्या ५०० तर किमान ६० इतकी निश्चित केली आहे.**

विधानसभेच्या रचनेबद्दल राज्य घटनेमध्ये कलम १७० मध्ये तरतूदी देण्यात आलेल्या आहेत. राज्य विधानसभेमध्ये राज्यातील जनतेने सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या आधारावर प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा समावेश असतो. घटनेने राज्य विधानसभेची महत्तम सदस्य संख्या ५०० तर किमान ६० इतकी निश्चित केली आहे. म्हणजेच, ही सदस्यसंख्या राज्याच्या लोकसंख्येनुसार ६० ते ५०० इतकी असू शकते. घटनेच्या कलम ३३३ अंतर्गत राज्यपाल यांना अँग्लोइंडियन समाजातील एका सदस्यास नामनिर्देशित करता येते. सध्या महाराष्टातील विधानसभेत एकूण २८८ सदस्य असून राज्यपाल नामनिर्देशित रिक्त आहे.

### राज्य विधानमंडळाचे पीठासन अधिकारी

राज्य विधानमंडळाच्या अधिकाऱ्यांमध्ये विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, विधानसभेचे सभापती व उपसभापती यांचा समावेश होतो. त्याचबरोबर त्यांच्या गैरहजेरीत काम करण्यासाठी विधानसभेत अध्यक्षीय पॅनेलची तर विधानपरिषेमध्ये उपाध्यक्षीय पॅनेलची नियुक्ती केली जाते.

### विधानसभेचे अध्यक्ष

विधानसभेच्या अध्यक्षाचे पद लोकसभेच्या अध्यक्षाच्या धर्तीवरच निर्माण करण्यात आले आहे. नव्याने निवडून आलेल्या विधान सभेच्या पहिल्या अधिवेशनात अध्यक्षांची निवड केली जाते. त्या बैठकीचे अध्यक्ष स्थान प्रो-टेम अध्यक्षांमार्फत भूषविले जाते. विधानसभा आपल्या सदस्यांमधूनच एकाची निवडणूक (साध्या बहुमताने) अध्यक्ष म्हणून करते. निवडणुकीची तारीख राज्यपालांमार्फत निश्चित केली जाते. विधानसभेच्या अध्यक्षांचा पदावधी विधानसभेच्या कालावधी इतकाच असतो.



**विधानसभा अध्यक्ष**

**मुंबई विधानसभा(१९३७ ते १९६०)**

**गणेश वासुदेव मावळंकर**
**कुंदनमल सोभाचंद फिरोदिया**
**दत्तात्रय काशिनाथ कुंटे**
**सयाजी लक्ष्मण सिलम**

**महाराष्ट्र विधानसभा (१९६० पासून)**

**सयाजी लक्ष्मण सिलम**
**त्र्यंबक शिवराम भारदे**
**शेषराव कृष्णराव वानखेडे**
**बाळासाहेब देसाई**
**शिवराज विश्वनाथ पाटील**
**प्राणलाल हरकिशनदास व्होरा**
**शरद शंकर दिघे**
**शंकरराव चिमाजी जगताप**
**मधुकरराव धनाजी चौधरी**
**दत्ताजी शंकर नलावडे**
**अरुणलाल गोवर्धनदास गुजराथी**
**कृष्णराव रखमाजीराव देसाई ऊर्फ बाबासाहेब कुपेकर**
**दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील**
**हरीभाऊ बागडे**

### अध्यक्षांचे अधिकार

अध्यक्ष विधानसभेच्या बैठकांचे अध्यक्षस्थान भूषवितात. विधानसभेच्या कामकाजाचे नियमन करून तेथे सुव्यवस्था व सभ्यता राखणे, ही अध्यक्षांची प्राथमिक जबाबदारी आहे. त्याबद्दल त्यांना अंतिम अधिकार प्राप्त आहेत. त्यांना सभागृहात भारताची घटना, सभागृहाचे कार्यपद्धती नियम व विधानमंडळीय परंपरांचा अंतिम अर्थ लावण्याचा हक्क आहे. विधानसभा सदस्यांना प्रश्न आणि पुरवणी प्रश्न विचारण्याची परवानगी देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार अध्यक्षांना असतो. सदस्यांच्या भाषणातील एखादा आक्षेपार्ह भाग अभिलेखित केला जाणार नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना असतो. तसेच त्यांनी दिलेले आदेश/निर्देश न पाळणाऱ्या सदस्यांना ठरावीक काळासाठी सभागृहातून निष्कासित करण्याचाही अधिकार त्यांना असतो. सभागृहाच्या विचाराधीन असलेल्या विधेयकात सुधारणा मांडण्यासाठी सदस्यास अध्यक्षांची संमती घ्यावी लागते. गणसंख्येच्या अभावी सभागृह तहकूब करणे किंवा सभा निलंबित करण्याचा अधिकार अध्यक्षांना असतो. सभागृहाची सभा भरण्यासाठी त्याच्या एकूण सदस्यसंख्येच्या किमान १/१० हजर असणे गरजेचे असते. यास गणसंख्या असे म्हणतात.

विधानसभेच्या सर्व समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक विधानसभेचे अध्यक्ष करतात. या समित्या त्यांच्या साधारण निर्देशनाखाली कार्य करतात. विधानसभेचे अध्यक्ष स्वत: व्यवसाय सल्लागार समिती, सामान्य उद्देश समिती व नियम समिती या समित्यांचे अध्यक्ष म्हणून कार्य करतात. अध्यक्ष हे विधानसभेच्या सचिवालयाचे प्रमुख म्हणून कार्य करतात.

# संसदीय कामकाज कसे चालते?

**विधिमंडळाच्या कामकाजामध्ये प्रश्न (तारांकित, अतारांकित व अल्पसूचना प्रश्न), प्रस्ताव, ठराव, स्थगनप्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव, विश्वासदर्शक प्रस्ताव इ.संसदीय आयुधांच्या माध्यमातून विधिमंडळे कार्यकारी प्रशासनावर नियंत्रण ठेवतात.**



**विधिमंडळात चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

लोकप्रतिनिधी या नात्याने कर्तव्य बजावण्यासाठी तसेच शासनाच्या प्रशासनिक कामकाजावर संसदेचे/विधानमंडळाचे प्रभावी नियंत्रण असण्याच्या दृष्टीने प्रशासनिक कामकाजासंबंधी माहिती घेणे (to seek information) हा संसद/विधानमंडळ सदस्यांचा अधिष्ठित (Inherent) व अनिर्बंध (unfettered) स्वरूपाचा अधिकार आहे.

### प्रश्नोत्तर तास

विधानसभेच्या बैठकीची सुरुवात प्रश्नोत्तरांच्या तासाने होते. जनतेच्या सार्वजनिक हिताच्या संदर्भात सदस्यांच्या निदर्शनास येणाऱ्या विविध तक्रारी, अडचणी, समस्या सोडवण्याच्या दृष्टीने तसेच शासन यंत्रणेद्वारे होत असलेल्या प्रशासनातील उणिवा दूर करून घेण्यासाठी प्रश्नोत्तर पद्धतीचा उपयोग होतो. विधानमंडळात जे प्रश्न विचारले जातात त्याचे तारांकित, अल्पसूचना आणि अतारांकित प्रश्न असे तीन प्रकार असतात.

### तारांकित प्रश्न

ज्या प्रश्नांना सभागृहात तोंडी उत्तर दिले जाते, अशा प्रश्नांना तारांकित प्रश्न असे म्हणतात. सदस्यांना अधिवेशनात तारांकित प्रश्न वेळेवर देता यावेत, या दृष्टीने त्यांच्याकडे विधानमंडळ सचिवालयामार्फत तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम (रोटेशन ऑर्डर) माहितीसाठी पाठवण्यात येतो. मंत्र्यांना त्यांच्या विभागाशी संबंधित प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी सोयीचे व्हावे या दृष्टीने चक्रानुक्रमात मंत्र्यांची गटवार विभागणी केली जाते. अधिवेशनाच्या काळात दर आठवड्याला सोमवारपासून शुक्रवारपर्यंत ज्या दिवशी विधानसभेच्या बैठकी असतात त्या प्रत्येक दिवशी सुरुवातीचा एक तास तारांकित प्रश्नोत्तरासाठी उपलब्ध असतो. एका गटातील मंत्र्यांच्या विभागासंबंधीच्या प्रश्नाची यादी प्रश्नोत्तरांच्या वेळी सभागृहात देण्यात येते.

तारांकित प्रश्नांच्या उत्तरावर अध्यक्षांच्या परवानगीने सदस्यांना पुरवणी प्रश्न विचारून अधिक खुलासा व स्पष्टीकरणही घेता येते. कोणत्याही सदस्याला एका दिवशी फक्त तीनच तारांकित स्वीकृत प्रश्न विचारता येतात.

### अल्पसूचना प्रश्न

सदस्यास एखाद्या तातडीच्या प्रश्नाचे उत्तर ताबडतोब हवे असेल तर त्याची सूचना अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वी सात दिवसांपेक्षा जास्त अगोदर देता येत नाही. अल्पसूचना प्रश्नावर तारांकित प्रश्नाप्रमाणे पुरवणी प्रश्न विचारता येतो. हे प्रश्न तातडीने उपस्थित

झालेल्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर असले पाहिजेत. अल्पसूचना प्रश्नाची सूचना देताना तो अल्पसूचना प्रश्न म्हणून का देण्यात येत आहे, याचे स्पष्टीकरणही सूचनेमध्ये नमूद करणे आवश्यक असते व त्यानंतर ज्या विषयावर प्रश्न विचारावयाचा आहे तो थोडक्यात व मुद्देसूदपणे विचारावा लागतो. असा प्रश्न अध्यक्षांनी स्वीकृत केल्यानंतर संबंधित मंत्री उत्तर देण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत या सचिवालयाकडून विचारणा केली जाते.

### प्रस्ताव (म.वि.स.नियम २३ अन्वये)

सभागृहात प्रतिनिधित्व करणारे सदस्य निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या विचारप्रणालीचे तसेच समाजातील विविधस्तराचे प्रतिनिधित्व करतात. तथापि विषयावर सभागृहाचे मत अजमावण्यासाठी तसेच त्याबाबत निर्णय जाणून घेण्यासाठी सदस्यांमार्फत त्यांचे मत व अपेक्षा प्रदर्शित करणारा प्रस्ताव सभागृहासमोर विचारार्थ आणला जातो. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन वा अन्यथा सभागृहाने तो स्वीकारल्यास, तो प्रस्ताव सभागृहाचे मत वा इच्छा म्हणून धरला जातो. सभागृहाचे मत अजमावण्यासाठी कोणताही विषय सभागृहासमोर प्रस्तावाच्या माध्यमातून येणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक हिताच्या बाबीसंबंधी चर्चा, अध्यक्षांच्या संमतीने आणलेल्या प्रस्तावाव्यतिरिक्त करता कामा नये अशी स्पष्ट तरतूद नियमात आहे.

### प्रस्तावावरील चर्चेचे चार भाग

१) प्रस्ताव मांडणे २) प्रश्न अध्यक्षांनी सभागृहासमोर ठेवणे ३) चर्चा ४) मतदान व सभागृहाचा निर्णय.

सर्वसाधारणपणे प्रस्तावाचे तीन भाग पडतात : १) मूळ प्रस्ताव २) बदली प्रस्ताव ३) अंगभूत प्रस्ताव.

महाराष्ट्र विधानसभा नियमात अंतर्भूत केल्याप्रमाणे सभागृहात विविध प्रस्तावांद्वारे वेगवेगळे विषय हाताळले जातात. या प्रस्तावांचे नियम व निकष हे वेगवेगळे विषय आहेत.

उदा. १) अध्यक्षांना पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव (म.वि.स.नियम ११ अन्वये). २) अभिनंदनपर किंवा शोक प्रस्ताव (म.वि.स.नियम १४ अन्वये). ३) अर्धा-तास चर्चा (म.वि.स.नियम ९४ अन्वये). ४) मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (म.वि.स.नियम ९५ अन्वये. ५) स्थगन प्रस्ताव (म.वि.स.नियम ९७ अन्वये). ६) विश्वासदर्शक प्रस्ताव (म. वि.स.नियम २३अन्वये). ७) अल्पकालीन चर्चा (म.वि.स.नियम १०१ अन्वये). ८) समिती नियुक्त करण्यासंबंधातील प्रस्ताव (म.वि.स.नियम १९४ अन्वये). ९) सांविधिक प्रस्ताव (म.वि.स.नियम २९० अन्वये). १०) अंतिम आठवडा प्रस्ताव (म.वि.स.नियम २९२ अन्वये). ११)




सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा (म.वि.स.नियम २९३ अन्वये). १२) अनियत-दिन प्रस्ताव (म.वि.स.नियम २९५ अन्वये)

### स्थगन प्रस्ताव (म.वि.स.नियम ९७ अन्वये) / (नियम ९३ सूचना विधान परिषद)

सर्वसाधारणपणे सभागृहाचे कामकाज, कामकाजपत्रिकेवर ठरवून दिलेल्या बाबींप्रमाणे चालते. परंतु बऱ्याच वेळा अशी काही गंभीर व तातडीची परिस्थिती निर्माण होते की, त्याबाबत तातडीने दखल घेणे, प्रश्न, ठराव, प्रस्ताव वा इतर संसदीय आयुधांच्या माध्यमातून; नियमातील बऱ्याच अगोदर पूर्वसूचना देण्यासंबंधी असलेल्या तरतुदीमुळे शक्य होत नाही. आकस्मिकरीत्या उद्‌भवणाऱ्या परिस्थितीमुळे अशा बाबी तातडीने चर्चेला सभागृहात येणे अतिशय आवश्यक असते. कारण राज्यात जनतेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने उद्‌भवलेल्या घटनेचे पडसाद लोकनियुक्त सभागृहात उमटणे हे लोकशाही राज्यव्यवस्थेत अपरिहार्य आहे. अशा विषयांवर चर्चा घेण्यासाठी स्थगन प्रस्ताव या संसदीय आयुधाचा वापर केला जातो. या आयुधाचा मुख्य उद्देश अतिशय तातडीच्या व नुकत्याच घडलेल्या बाबींकडे सभागृहासमोरील नियमित कामकाज बाजूला सारून, सभागृहाचे लक्ष त्याकडे वेधणे हा आहे. संसदीय कार्यपद्धतीमध्ये या आयुधाचे स्वरूप शासनाच्या कारभारावर ठपका ठेवणारे निंदाव्यंजक अशा स्वरूपाचे असल्याचे मानले जाते. त्यामुळे या आयुधाचा वापर अतिशय काटेकोरपणे व गांभीर्याने करण्याची निकड आहे.

सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर सदस्याने प्रस्तावाच्या सूचनेच्या तीन प्रती विधानसभेचे अध्यक्ष, सचिव तसेच संबंधित मंत्र्यांकडे लेखी द्यावयास पाहिजेत. या वेळेनंतर

## अतारांकित प्रश्न

**जेव्हा सदस्यांना प्रश्नाचे केवळ लेखी उत्तर हवे असते अशावेळी सदस्य अतारांकित प्रश्नांची सूचना देतात. असे प्रश्न आणि त्यांची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. अशा प्रश्नांची सूचना सदस्यांनी देण्यासाठी कोणतीही मुदत नसते. अशा प्रश्नाचे उत्तर स्वीकृत प्रश्न शासनाला प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत द्यावयाचे असते. ज्या प्रश्नात खास तक्रार नाही, केवळ माहिती हवी असते किंवा सांख्यिकीय माहिती विचारली असेल असे प्रश्नही सामान्यत: अतारांकित प्रश्न म्हणून स्वीकृत केले जातात. जे प्रश्न तोंडी उत्तरासाठी तारांकित प्रश्नांच्या यादीत समाविष्ट होऊनही प्रश्नोत्तरांचा तास समाप्त झाल्यामुळे उत्तरित होऊ शकत नाहीत, असे प्रश्न अतारांकित समजले जातात व त्यांची उत्तरे त्या दिवसाच्या कार्यवाहीत छापली जातात.**

आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही.

उपोषण, सत्याग्रह, अन्य राज्यात घडलेल्या घटना, मोर्चे, धरणे, लाठीमार, बंद,संप, न्यायप्रविष्ठ बाबी, आंदोलने, आत्महत्या हे स्थगन प्रस्तावाचे विषय होऊ शकत नाही. तसेच राज्यपालांच्या अभिभाषणाच्या दिवशी, विभागांच्या मागण्यांवर चर्चारोध असलेल्या दिवशी किंवा ज्या दिवशी अविश्वासदर्शक प्रस्तावावर सभागृहात चर्चा असेल त्या दिवशी स्थगन प्रस्ताव घेता येत नाही.

### अल्पकालीन चर्चा (म.वि.स.नियम १०१ अन्वये)

निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक महत्त्वाचे आयुध सदस्यांना उपलब्ध आहे. अल्पकालीन चर्चेची उपयुक्तता तातडीच्या बाबी उपस्थित करण्यासाठी फार मोठी आहे. या चर्चेला जास्तीत जास्त अडीच तास वेळ असल्यामुळे तातडीने सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी सदस्यांना विशेषत: विरोधी पक्षाच्या सदस्यांना एक जादा संधी मिळते. या चर्चेच्या वेळी सभागृहसमोर औपचारिक प्रस्ताव नसल्यामुळे यावर मतदान होत नाही. त्यामुळे चर्चेला संमती देताना शासनालासुद्धा फारसे अडचणीचे होत नाही.

### अंतिम आठवडा प्रस्ताव (म.वि.स.नियम २९२ अन्वये)

सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सदस्यांना ही एक अतिरिक्त संधी उपलब्ध आहे. या प्रस्तावाची तुलना ब्रिटिश संसदेच्या शेवटच्या आठवड्यातील प्रस्ताव किंवा सुट्टीचे स्थगन प्रस्ताव यांच्याशी करण्यात येते. या प्रस्तावाचा उद्देश म्हणजे सभागृह स्थगित होण्यापूर्वीच्या निकटच्या कालावधीतील अडचणी, समस्या/प्रश्न सभागृहासमोर आणणे हा आहे.

या प्रस्तावाद्वारे राज्याच्या हिताच्या दृष्टीने व्यापक सार्वजनिक महत्त्वाचे विषय म्हणजे राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महागाई, पिण्याच्या पाण्याची राज्यव्यापी समस्या, अवर्षण, टंचाई इत्यादी विषय सभागृहासमोर मांडता येतात.

अध्यक्ष, सभागृहाच्या नेत्याशी विचारविनिमय करून, अशा पुरेशा सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा घडवून आणण्यासाठी, अधिवेशनातील शेवटच्या आठवड्यातील एक दिवस नेमून देतात. त्यासाठी तीन दिवस अगोदर प्रस्तावाची लेखी सूचना देता येईल. सूचना स्वीकारण्यापूर्वी अध्यक्ष ज्या विभागाशी तो प्रस्ताव संबंधित असेल, त्या विभागाच्या मंत्र्यांचे विचार जाणून घेतात. संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या संमतीने अधक्षांना त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही प्रकरणी सूचनेचा कालावधी कमी करता येतो किंवा सूचना अनावश्यक असल्याचे ठरवता येते.

अध्यक्ष कोणत्याही दिवशी चारपेक्षा अधिक नसतील इतक्या बाबी चर्चेसाठी ठेऊ शकतात. चर्चेसाठी कोणते प्रस्ताव घ्यावयाचे याकरिता हे प्रस्ताव कामकाज सल्लागार समितीपुढे ठेवण्यात येतात. चर्चेच्या वेळी प्रस्ताव देणारे सदस्य प्रथम भाषण करतात व तद्नंतर इतर सदस्यांनाही अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेत भाग घेता येतो. त्यानंतर संबंधित मंत्री त्यास उत्तरे देतात. या प्रस्तावावर मतदान होत नाही.

### ठराव

ठराव हे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. सार्वजनिक हिताच्या बाबींवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक उपयुक्त माध्यम सदस्यांना उपलब्ध आहे. ठरावाचे खालील

## अर्धा-तास चर्चा (म.वि.स.नियम ९४ अन्वये)

**संसदीय आयुधांपैकी अर्धा-तास चर्चा हे लोकसभा /राज्यसभा व विविध विधानमंडळामध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. प्रश्नातून उद्भवणाऱ्या तसेच इतर सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर उपस्थित करावयाच्या अर्धा-तास चर्चेसंबंधीच्या तरतुदी म.वि.स.नियम ९४ मध्ये करण्यात आल्या आहेत.**

## लक्षवेधी सूचना (म.वि.स.नियम १०५ अन्वये)

**तातडीच्या आकस्मिक कारणासाठी स्थगन प्रस्तावाव्यतिरिक्त एखाद्या स्वतंत्र आयुधाची निकड ध्यानात घेऊन, लक्षवेधी सूचनेचा नियमात समावेश करण्यात आला.**

**आधुनिक संसदीय कामकाज पद्धतीमध्ये लक्षवेधी सूचनेचा सभागृहाच्या कामकाज पद्धतीमधील समावेश ही संपूर्णपणे भारतीय संकल्पना** (Purely an Indian Innovation) **आहे.**

**या आयुधाच्या माध्यमातून प्रशासनातील उणिवा शासनाच्या लक्षात आणून देणे, त्याबाबत शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कारवाई हीदेखील सभागृहापुढे निवेदनाद्वारे आणून देणे व या माध्यमातून शासनावर अंकुश ठेवणे, इत्यादी उद्दिष्टे साध्य करता येतात.**

भाग पडतात:- १) अशासकीय ठराव २) शासकीय ठराव ३) वैधानिक ठराव.

### अशासकीय ठराव
### (म.वि.स.नियम १०६ अन्वये)

विधानसभा नियम १२ अन्वये शुक्रवारच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्यात येतात. अशासकीय कामकाजाचे दोन प्रकार आहेत. अ) अशासकीय विधेयके आणि ब) अशासकीय ठराव. यामुळे एका शुक्रवारी ठराव तर दुसऱ्या शुक्रवारी विधेयके याप्रमाणे या दोन्ही प्रकारांसाठी आळीपाळीने वेळ दिला जातो.

जर एखाद्या शुक्रवारी सभागृहाची बैठक भरणार नसेल तर अध्यक्ष त्या आठवड्यातील इतर कोणत्याही दिवशी अशासकीय कामकाजासाठी अडीच तासांचा वेळ देऊ शकतात. जी तारीख अशासकीय ठरावांच्या चर्चेसाठी नेमून दिलेली असेल त्या तारखेपूर्वी १५ दिवस आधी ठराव मांडू इच्छिणाऱ्या सदस्यांनी त्यांच्या ठरावांची सूचना द्यावयाची असते. कोणत्याही सदस्याला एका अधिवेशनासाठी जास्तीत-जास्त पाच ठराव देता येतात. परंतु त्यांनी दिलेल्या ठरावांपैकी काही ठराव अध्यक्षांनी अमान्य केल्यास त्याऐवजी ते दुसरे ठराव देऊ शकतात.

### सांविधिक प्रस्ताव
### (म.वि.स.नियम २९० अन्वये)

या प्रस्तावाला सांविधिक प्रस्ताव म्हणतात. कारण संविधान व अनिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने हा प्रस्ताव मांडला जातो. हा प्रस्ताव मंत्री अथवा अशासकीय सदस्य यांना मांडता येतो. अध्यादेश नापसंतीचा प्रस्ताव, मा.अध्यक्ष, उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव ही या प्रस्तावाची उदाहरणे आहेत. या संदर्भात म.वि.स.नियम २९० मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

ज्या कोणत्याही सदस्याची सांविधिक प्रस्ताव मांडण्याची इच्छा असेल, तो ज्या अन्वये सदरहू प्रस्ताव केला जात असेल तो परिनियम किंवा अधिनियमिती यात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त किंवा संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या मताविषयी खात्री करून घेऊन अध्यक्ष अन्यथा निदेश देतील त्याव्यतिरिक्त, पूर्ण दहा दिवसांची नोटीस देईल व त्या नोटिशीबरोबर नियोजित प्रस्तावाची प्रत सादर करील.

### अभिनंदनपर प्रस्ताव (नियम १४)

सभागृहाच्या बैठकीस प्रारंभ होण्यापूर्वी अध्यक्षांची परवानगी घेऊन अभिनंदनपर प्रस्ताव प्रश्नोत्तराच्या वेळेनंतर कोणत्याही वेळी मांडता येते.

### मंत्र्यांचे निवेदन
### (म.वि.स.नियम ४७ अन्वये)



**एखाद्या मंत्र्यास अध्यक्षांची परवानगी घेऊन सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बाबींवर सभागृहात निवेदन करता येते. अशा निवेदनावर कोणतीही चर्चा करण्याची परवानगी देता येत नाही. परंतु उक्त निवेदनाच्या संबंधात आणखी माहिती घेण्याच्या दृष्टीने प्रश्न विचारण्याची सदस्यांना परवानगी देता येते.**

### विनंती अर्ज

सदस्यांना सर्वसाधारणपणे लोकहिताचा बाब असलेला विनंती अर्ज सभागृहाला सादर करता येतो. हा अर्ज सभागृहाला सादर झाल्यानंतर विनंती-अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतो. समिती त्यावर विचार करून सभागृहास अहवाल सादर करीत असते.




### अशासकीय विधेयके

दर शुक्रवारी सभागृहाच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी नेमून दिले जातात. हा वेळ आळीपाळीने अशासकीय ठराव आणि अशासकीय विधेयके यांना देण्यात येतो. सभागृहाच्या नेत्यांच्या संमतीने शुक्रवार व्यतिरिक्त अन्य दिवस अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे तसेच ज्या शुक्रवारी बैठक नसेल त्या आठवड्यातील इतर कोणत्याही दिवशी अशासकीय कामकाज घेण्याचा निदेश अध्यक्ष देऊ शकतात.

अशासकीय विधेयकाची सूचना खाजगी सदस्यांकडून देण्यात येते. अशासकीय विधेयकासाठी १५ दिवसांची सूचना आवश्यक असते. अशासकीय विधेयकाचा मसुदा तयार करण्याच्या बाबतीत विधानमंडळ सचिवालयाच्या संबंधित कक्षाद्वारे आवश्यक ते मार्गदर्शन केले जाते. मात्र, सदस्याने विधेयकाची सूचना देताना विधेयकाच्या प्रारूपासोबत उद्देश व कारणे यांचे निवेदन संक्षिप्त स्वरूपात दिले पाहिजे.

### हरकतीचा मुद्दा (नियम ५०)

सभागृहात विशिष्ट वेळी चालू असलेल्या कामकाजाच्या संदर्भात सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येतो. मात्र तो सभागृहाच्या नियमाचा अर्थ वा त्यांची अंमलबजावणी यांच्याशी किंवा सभागृहाच्या कामकाजासंबंधी संविधानाच्या तरतुदींशी संबंधित असला पाहिजे; तसेच अध्यक्षांनी त्याची दखल घेण्यायोग्य तो असला पाहिजे.

**शब्दांकनः गजानन पाटील**

**(संदर्भ: भारतीय संविधानाची तौलानिक वैशिष्ट्य व विधिमंडळ कामकाज, संकलनः डॉ. अनंत कळसे)**

# आपले आमदार (विधानसभा)

**सध्या अस्तित्वात असणाऱ्या १३व्या महाराष्ट्र विधानसभेत पक्षीय बलाबल पुढीलप्रमाणे: भारतीय जनता पक्ष-१२२, शिवसेना-६३, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष- ४२, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-४१, शेतकरी कामगार पक्ष-0३, बहुजन विकास आघाडी- 0३, ऑल इंडिया मजलीस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीन- 0२, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-0१, समाजवादी पक्ष-0१, भारिप बहुजन महासंघ-0१, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी)-0१, राष्ट्रीय समाज पक्ष-0१ आणि अपक्ष- 0७ अशा सदस्यांचा समावेश आहे. एकूण २८८ मतदारसंघनिहाय विधानसभा सदस्यांची थोडक्यात परिचय..**



**ॲड. पाडवी के.सी.**
भा.रा. काँग्रेस, अक्कलकुवा (अ.ज)
मु.असली, पो.तलाई,
ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार
कार्यालय. 0२५६२-२२९४४४



**पाडवी उदयसिंग कोचरू**
भाजपा, शहादा (अ.ज.)
मु.सोमावल, बु पो. नळगव्हाण,
ता.तलोडा जि.नंदुरबार
कार्यालय .0२५६७-२३२२३८



**डॉ. गावित विजयकुमार कृष्णराव**
भाजपा, नंदुरबार (अ.ज.)
मु.पो.नटावद, ता.जि.नंदुरबार.



**नाईक सुरूपसिंह हिऱ्या**
भा.रा. काँग्रेस, नवापूर (अ.ज.)
मु.पो.नवागांव, ता.नवापूर,
जि.नंदुरबार ४२५ ४१८
कार्यालय- 0२५६९-२६२२२३



**अहिरे धनाजी सिताराम उर्फ डी.एस**
भा.रा. काँग्रेस, साक्री (अ.ज)
रा.पोबारे, पो.कुडाशी (पोबारे),
ता.साक्री. जि.धुळे
निवास- 0२५६२-२२६१४



**पाटील कुणाल रोहिदास**
भा.रा. काँग्रेस, धुळे ग्रामीण
२२, नेहरू हौ.सो.देवपूर,
धुळे-४२४00१
निवास-
0२२-0२२-२४९७१५१५/६



**गोटे अनिल उमराव**
भाजपा, धुळे शहर
जि.धुळे ४२४00१
कार्यालय- 0२५६२-२८३६३६,
२८२६३६
निवास- 0२५६२-२३३२६६



**रावल जयकुमारभाऊ जितेंद्रसिंह**
भाजपा, शिंदखेडा
दरबार जय पॅलेस, हवाई महल,
दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे
कार्यालय- 0२५६६-२४४0२५



**पावरा काशिराम वेचान**
भा.रा. काँग्रेस, शिरपूर (अ.ज)
मु.पो.सुळे, ता.शिरपूर, जि.धुळे.
कार्यालय- 0२५६३-२५५३00
निवास- 0२५६३-२७३३00



**प्रा. सोनवणे चंद्रकांत बळीराम**
शिवसेना, चोपडा (अ.ज)
३९६, आदर्श, जयकिसन वाडी,
जळगांव ४२५ 00१
कार्यालय- 0२५७-२२२८२८२



**जावळे हरिभाऊ माधव**
भाजपा, रावेर मु.पो.भालोद,
ता.यावल, ज.जळगाव-४२५३0४
कार्यालय- 0२५८५-२४२७९७
निवास- 0२५८५-२४२६२७



**सावकारे संजय वामन**
भाजपा, भुसावळ (अ.जा)
प्रोफेसर कॉलनी, मुकेश
मेडीकलजवळ, ता. भुसावळ,
जि.जळगांव
कार्यालय- 0२५८२-२४२२२२



**भोळे सुरेश दामू**
भाजपा, जळगाव- शहर
चंद्रमाऊली, यशवंत कॉलनी,
रींग रोड, जि.जळगांव
निवास- 0२५७-२२२६0१६



**पाटील गुलाबराव रघुनाथ**
शिवसेना, जळगाव-ग्रामीण
मु.पो.पालधी बु. ता.धरणगाव,
जि.जळगांव
कार्यालय- 0२५८८-२५५३९९



**चौधरी शिरीषदादा हिरालाल**
अपक्ष , अमळनेर
स्टेशन रोड, अमळनेर १५
मतदार संघ, जळगांव
कार्यालय- 0२५८७-२२८८११

नागपूर अधिवेशन



**डॉ. पाटील सतीश (अण्णासाहेब) भास्करराव**
रा.काँ.पक्ष, एरंडोल
ता.पारोळा, ता.पारोळा,
जि.जळगाव
निवास- ०२५९७-
२९२९४४/२९२८४४



**पाटील उन्मेश भैय्यासाहेब**
भाजपा, चाळीसगाव
मु.पो.ता.पारोळा, जि.जळगाव
कार्यालय- ०२५८९-२२६०८४



**पाटील किशोर आप्पा**
शिवसेना, पाचोरा सिंहगड,
भडगाव रोड, चिंतामणी कॉलनी,
पाचोरा, जि.जळगांव ४२४ २०१
कार्यालय- ०२५९६-२४०३२९
निवास- ०२५९६-२४४८९९



**महाजन गिरीष दत्तात्रय**
भाजपा, जामनेर
नंदादीप, बजरंगपुरा, जामनेर,
ता.जामनेर, जि.जळगाव.
दूरध्वनी- ०२५८०-
२३०२४४/२३२४४४



**खडसे-पाटील एकनाथराव गणपतराव**
भाजपा, मुक्ताईनगर
मु.पो.कोथळी, ता.मुक्ताईनगर,
जि.जळगाव.
निवास- २३६७९५४५



**संचेती चैनसुख मदनलाल**
भाजपा, मलकापूर
बी.जे.टी.आय. रोड, मलकापूर,
जि.बुलढाणा. ४४३ १०१
कार्यालय- ०७२६७-२२३४४४



**सपकाळ हर्षवर्धन वसंतराव**
भा.रा.काँग्रेस.,बुलढाणा
सुवर्णनगर, बुलढाणा
कार्यालय- ०७२६२-२४६५५५
निवास- ०७२६२-२४२९५०



**बोंद्रे राहुल सिद्धविनायक**
भा.रा.काँग्रेस.,चिखली
स्वामी विवेकानंद मार्ग, वॉर्ड
क्रं-१४, चिखली,
जि. बुलढाणा
कार्यालय- ०७२६४-२४४९१९



**डॉ. खेडेकर शशिकांत नरसिंगराव**
शिवसेना, सिंदखेड राजा
शनिवार पेठ, देवुळगाव राजा,
जि.बुलढाणा कार्यालय व
निवास- ०७२६१-२३११२५



**रायमूलकर संजय भास्कर**
शिवसेना,मेहकर (अ.जा)
श्री स्वामी समर्थ केंद्राजवळ,
रामनगर पेटकर
ता., जि.बुलढाणा.



**फुंडकर आकाश पांडुरंग**
भाजप, खामगाव
वसुंधरा, महादेव नगर, चांदे
कॉलनी, खामगाव,
जि.बुलढाणा -४४४३०३
निवास:०७२६३-२५५२२२



**डॉ. कुटे संजय श्रीराम**
भाजप, जळगाव जामोद
तुप्ती व्हिला, सिद्धीविनायक
नगर, नवीन न्यायालयाजवळ,
जळगाव (जा.), जि.बुलढाणा
निवास- ०७२६६-२२१४६७



**भारसाकळे प्रकाश गुणवंतराव**
भाजप, आकोट
शिवाजी नगर, स्टेट बँकेमागे,
बनोसा दर्यापूर,
जि.अमरावती ४४४८०३



**सिरस्कार बळीराम भगवान**
भारिप बहुजन महासंघ, बाळापूर
मु.पो.पारस, ता.बाळापूर,
जि.अकोला. ४४४१०९



**शर्मा गोवर्धन मांगिलालजी**
भाजप, अकोला-पश्चिम
आळशी प्लॉट, गौरक्षण रोड,
ता.जि.अकोला. कार्यालय व
निवास - ०७२४-२४३७०५८



**सावरकर रणधीर प्रल्हादराव**
भाजप, अकोला -पूर्व
राऊत वाडी, अकोला
कार्यालय- ०७२४-२४५६६००
निवास- ०७२४-२४५०१८९



**पिंपळे हरीष मारोती आप्पा**
भाजप, मूर्तिजापूर (अ.जा.)
रा.पळसोळा, मूर्तिजापूर,
ता.जि.अकोला.
कार्यालय: ०७२५-६२४२५५५



**झनक अमित सुभाषराव**
भा.रा.काँग्रेस, रिसोड
मु.पो.मांगुळझनक,
ता.रिसोड, जि.वाशिम
कार्यालय व
निवास- ०७२५१-२२४४३३



**मलिक लखन सहदेव**
भाजप, वाशिम (अ.जा)
सुदर्शननगर, नारायणबाबा रोड
वाशिम, ता.जि.वाशिम
निवास- ०७२५२-२३२२६४



**पाटणी राजेंद्र सुखानंद**
भाजप, कारंजा
१२, जवाहर कॉलनी, पुसद
नाका, वाशिम.
कार्यालय ०७२५२-२३५१०७

**प्रशासकीय विभागानुसार सर्वात जास्त सदस्यसंख्या कोकण विभागाची (७५) आहे. त्यांच्यानंतर पुणे (५८), नाशिक (४७), औरंगाबाद (४६), अमरावती (३०) आणि नागपूर (३२) असा क्रम लागतो.**

नागपूर अधिवेशन



**प्रा. जगताप वीरेंद्र वाल्मिक**
भा.रा.काँग्रेस, धामणगांव रेल्वे
मु.पो. जवळा(छोत्रा), ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती-४४४९०४
कार्यालय- ०७२२२-२५४२०५



**राणा रवी गंगाधर**
अपक्ष, बडनेरा
५०, गंगा सावित्री, शंकर नगर,शंकरनगर, राजापेठ रोड, जि. अमरावती
निवास- ०७२१-२५७९६७२



**डॉ. देशमुख सुनिल पंजाबराव**
भाजप, अमरावती
आशिर्वाद, रुक्मिणी नगर, अमरावती - ४४४६०६.
कार्यालय- ०७२१-२६७३४२५



**ॲड. ठाकूर यशोमती**
भा.रा.काँग्रेस, तिवसा
भाग्यनगर, अमरावती, जि.अमरावती.
कार्यालय- ०७२१-२६६५५७३



**बुंदिले रमेश गणपतराव**
भाजप,दर्यापूर (अ.जा.)
मु.पो.भंडारा, ता.अंजनगाव, सुर्जी, जि.अमरावती
कार्यालय- ९५५२२३१२८८
नि.०७२२४-२४९००



**भिलावेकर प्रभुदास बाबुलाल**
भाजप, मेळघाट (अ.ज)
मु.आकी, पो.बोबदो, ता.धारणी, जि.अमरावती.



**कडू बच्चू उर्फ ओमप्रकाश बाबाराव**
अपक्ष, अचलपूर
रा. विदर्भ मिल कॉलनी, अचलपूर जि.अमरावती.
निवास: ०७२२३-२५२२३३



**डॉ. बोंडे अनिल सुखदेवराव**
भाजप, मोर्शी
राजापेठ, अमरावती
कार्यालय- ०७२१-२६७७६८३
निवास- ०७२१-२६७७६८३



**काळे अमर शरदराव**
भा.रा.काँग्रेस,आर्वी
मु.पो. वाठोडा, (भाईपुर पुनर्वसन), ता.आर्वी जि.वर्धा.



**कांबळे रणजित प्रतापराव**
भा.रा.काँग्रेस, देवळी
रोहणी, ता.देवळी, जि.वर्धा



**कुणावार समीर त्र्यंबकराव**
भाजप, हिंगणघाट
कृष्णाई महावीर वॉर्ड, हिंगणाघाट, जि.वर्धा ४४२ ००१
कार्यालय- ०७१५३-२४४१०४



**डॉ. भोयर पंकज राजेश**
भाजप, वर्धा
केळकर वाडी, सुदामपुरी, ता. जि. वर्धा ४४२००१
कार्यालय व निवास
०७१४२-२४२२४



**डॉ. देशमुख आशिष रणजितबाबू**
भाजप, काटोल
बरकत, ४५ , रेड क्रॉस रोड, सिव्हील लाईन, नागपूर
कार्यालय- ०७१२-२५२०२४८



**केदार सुनिल छत्रपाल**
भा.रा.काँग्रेस, सावनेर
मु.पो.पाटणसावंगी, ता.सावनेर, जि.नागपूर ४४१ ११३
कार्यालय- ०७१२-२७२०६११



**मेघे समीर दत्तात्रय**
भाजप, हिंगणा
१३५, पांडे ले आऊट, खामला रोड, जि.नागपूर -२५.
कार्यालय: ०७१२-२२४९४६२



**पारवे सुधीर लक्ष्मण**
भाजप, उमरेड (अ. जा)
प्लॉट नं.३७, जिभकाटे ले-आऊट, ता.उमरेड,जि.नागपूर
कार्यालय- ०७११६-२४२२२४,
निवास- ०७११६-२४४२८८



**फडणवीस देवेंद्र गंगाधरराव**
भाजप, नागपूर-दक्षिण-पश्चिम
२७६, त्रिकोणी पार्क, धरमपेठ, नागपूर.
निवास- ०१७२-२५३३४४६



**कोहळे सुधाकर विठ्ठलराव**
भाजप, नागपूर-दक्षिण
विठ्ठल-लिला, १५६ जानकीनगर उदयनगर रिंगरोड -नागपूर -३४
कार्यालय- ०७१२-२७५२५५५



**खोपडे कृष्णा पंचमजी**
भाजप,नागपूर-पूर्व
सतरंजीपुरा, सुभाष पुतळा, ता.जि.नागपूर- ४४० ००८.
कार्यालय- ०७१२-२७६७६३८
निवास- ०७१२-२७६७६३७



**कुंभारे विकास शंकरराव**
भाजप, नागपूर-मध्य
कुंभारे भवन,गोळीबार चौक, पाचपावली रोड, ता.जि.नागपूर.
कार्यालय/निवास व फॅक्स-०७१२-२७७०२९९



**देशमुख सुधाकर शामरावजी**
भाजप, नागपूर-पश्चिम
काटोल रोड, ता.जि.नागपूर
कार्यालय- ०७१२-२५७२२०२
निवास- ०७१२-२५७१६६६



**डॉ. माने मिलिंद पांडूरंग**
भाजप, नागपूर-उत्तर (अ.जा)
४०१, अष्टविनायक अपार्टमेंट,
पावर ग्रीड चौक,कामठी रिंग
रोड, अंगुलीमाल नगर, नागपूर
कार्यालय- ०७१२-२६४१४१७



**बावनकुळे चंद्रशेखर कृष्णरावजी**
भाजप, कामठी
नवीन कोराडी वसाहत, कोराडी
कॉलनी, ता.कामठी, जि.नागपूर.
कार्यालय- ०७१०९-२६४३००



**रेड्डी द्वारम मल्लिकार्जुन रामी**
भाजप, रामटेक
प्लॉट नं.३७७, वॉर्ड नं.५
रामटेक रोड, मनसर,
ता.रामटेक, जि.नागपूर
कार्यालय- ०७११४-२६८२२७



**वाघमारे चरण सोविंदा**
भाजप, तुमसर
रजनी नगर, खात रोड,
भंडारा. ४४१ ९०४
कार्यालय- ०७१८३-२३४४४४
निवास- ०७१८४-२५२३०८



**ॲड. अवसरे रामचंद्र पुनाजी**
भाजप, भंडारा (अ. जा)
मु.पो.ता.पवनी-वार्ड बजरंग,
जि.भंडारा



**काशिवार राजेश (बाळा) लहानुजी**
भाजप, साकोली
मु.पो.प्रगती कॉलनी सेंदुरवाफा,
ता.साकोली जि.भंडारा-४४१८०२
कार्यालय- ०७१८६-२३६५७७



**बडोले राजकुमार सुदाम**
भाजप, अर्जुनी मोरगाव (अ.जा)
मु. सडक अर्जुनी ३
पो.सडक अर्जुनी
ता.सडक-अर्जुनी जि.गोंदिया
कार्यालय: ०२२-२२०२५२५१



**रहांगडाले विजय भारतलाल**
भाजप, तिरोडा
मु.खामरी पो.चिखली, ता.तिरोरा
जि.गोंदिया-४४१९११
कार्यालय- ०७१९८-२५४००८



**अग्रवाल गोपालदास शंकरलालजी**
भा.रा.काँग्रेस, गोंदिया
शंकर भवन, मुख्य मार्ग,
ता.जि.गोंदिया. ४४१ ६०१
कार्यालय: ०७१८२-२३७७३१



**पुराम संजय हनुवंतराव**
भाजप, आमगाव (अ.ज)
मु.पो.पुराडा, ता.देवरी,
जि.गोंदिया



**गजबे कृष्णा धमाजी**
भाजप, आरमोरी (अ.ज)
मु.पोटगांव, पो. विहिरगांव
ता.वडसा, जि.गडचिरोली.



**डॉ. होळी देवराव मादगुजी**
भाजप, गडचिरोली (अ.ज)
मु.पो.ता.चामोर्शी, हनुमान वॉर्ड
नं.१, चामोर्शी, जि.गडचिरोली
कार्यालय- ०७१३५-२३५८८०



**आत्राम अम्ब्रीशराव राजे सत्यवानराव**
भाजप, अहेरी (अ.ज)
राजमहल, मु.पो.अल्लापली
ता.अहेरी, जि.गडचिरोली



**ॲड. धोटे संजय यादवराव**
भाजप,राजूरा
'शिवलहरी', बँक ऑफ इंडिया
जवळ, मु.पो.ता.राजूरा,जि.चंद्रपूर
कार्यालय- ०७१७३-२२२९९९



**शामकुळे नानाजी सिताराम**
भाजप, चंद्रपूर (अ.जा)
रामकृष्ण अपार्टमेंट, अकोला
अर्बन बँकेवर, गंजवार्ड, चंद्रपूर
कार्यालय-०७१७२-२७७६८८



**मुनगंटीवार सुधीर सच्चिदानंद**
भाजप, बल्लारपूर,
भाग्यश्री, गोलबजार वार्ड
ता.जि.चंद्रपुर
कार्यालय- ०७१७२-२५२५८२



**वडेट्टीवार विजय नामदेवराव**
भा.रा.काँग्रेस, ब्रम्हपुरी
रानफुल निवास, मु.पो.ता.जि.
गडचिरोली
निवास ०७१३२-२३५५५६



**भांगडिया कीर्तिकुमार ऊर्फ बंटी मितेश**
भाजप, चिमुर
भांगडिया वाडा, टिळक वार्ड,
मु.पो. ता.चिमुर जि.चंद्रपूर.
कार्यालय- ०७१२-२४६०१२०



**धानोरकर सुरेश ऊर्फ बाळुभाऊ नारायण**
शिवसेना, वरोरा,
लक्ष्मी नगर, अभ्यंकर वार्ड,
ता.वरोरा,
जि. चंद्रपूर ४४२ ९०७
कार्यालय- ०७१७६-२८०५८६

**विधानसभेच्या सर्व सदस्यांपैकी सर्वात जास्त सदस्यांचा, म्हणजेच १०२ सदस्यांचा शेती हा व्यवसाय आहे. उर्वरित सदस्य हे राजकीय/ सामाजिक कार्य, वकील, व्यापार/ उद्योग, अध्यापन, पत्रकार/लेखक, बांधकाम व्यावसायिक, वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित आहेत.**

नागपूर अधिवेशन

**१३ व्या महाराष्ट्र विधानसभेत एकूण २२ महिला सदस्य आहेत. यामध्ये पदवीधर असलेल्या महिलांची संख्या ७ आहे. कायदा पदवी घेतलेल्या २ महिला सदस्य आहेत. शिक्षण शास्त्र पदवी घेतलेल्या ४ महिला सदस्य आहेत. व्यवस्थापन पदव्युत्तर (एम.बी.ए.) १, तर पी.एचडी केलेल्या २ महिला सदस्य आहेत.**



**बोदकुरवार संजिवरेड्डी बापुराव**
भाजप, वणी
निमोदिया ले-आऊट
देशमुखवाडी रोड, वणी
जि.यवतमाळ - ४४५३०४
कार्यालय: ०७२३९-२२५७३३



**डॉ. उइके अशोक रामाजी**
भाजप, राळेगांव (अ.ज)
राणाप्रताप नगर, वडगाव
यवतमाळ जि.यवतमाळ
कार्यालय- ०७२३२-२५५७८८



**येरावर मदन मधुकरराव**
भाजप, यवतमाळ
अवधुतवाडी, दत्ता चौक,
ता.जि.यवतमाळ
कार्यालय- ०७२३२-२५५०५६



**राठोड संजय दुलीचंद**
शिवसेना, दिग्रस
स्वामी समर्थ नगर, नातूवाडी,
दारव्हा, जि.यवतमाळ
निवास- ०७२३२-२४३३३४



**तोडसाम राजू नारायण**
भाजप, अर्णी (अ.ज)
कत्तरवार, पांढरकवडा
ता.केळापूर, जि.यवतमाळ.
निवास- ०७२३५-२२८२६६



**नाईक मनोहर राजुसिंग**
रा.काँ. पक्ष, पुसद
नाईक बंगला, कार्ला रोड, गांधी नगर, पुसद, जि.यवतमाळ.
कार्यालय - ०७२३३-२४६३१०
निवास- ०७२३३-२४६८२२



**नजरधने राजेंद्र वामनराव**
भाजप, उमरखेड (अ.जा)
मु.पो.महागाव, (पं.स.)
जि.यवतमाळ ४४५२०५



**जाधव (नाईक) प्रदीप हेमसिंग**
रा.काँ.पक्ष, किनवट
घर नं.२१६, मु.पो.दहेली तांडा,
ता.किनवट, जि.नांदेड.
कार्यालय- ०२४६०-२६०५५५



**पाटील-अष्टीकर नागेश बापुराव**
शिवसेना, हदगाव
मु.पो.ता. हदगाव, अयोध्यानगर
जि.नांदेड
कार्यालय ०२४६८-२२२३७५



**चव्हाण अमिता अशोकराव**
भा.रा.काँग्रेस, भोकर
शिवाजीनगर, नांदेड. कार्यालय
(नांदेड) ०२४६२-२३४०८१



**सावंत दत्तात्रय पांडुरंग**
भा.रा.काँग्रेस, नांदेड-उत्तर
१-२-१७६, आई शिवाजीनगर,
नांदेड, ४३१ ६०२
कार्यालय-०२४६२-२५०९००
निवास- ०२४६२-२३४०८५



**पाटील हेमंत श्रीराम**
शिवसेना, नांदेड-दक्षिण
तुकाई, रवि राजनगर तरोडा
नाका, नांदेड-०५
निवास- ०२४६२-२६२०३०



**पाटील-चिखलीकर प्रतापराव गोविंदराव**
शिवसेना, लोहा
मु.पो. चिखली, साई-सुभाष
वसंत नगर,ता.खंदार, नांदेड
कार्यालय- ०२४६२-२८६००१



**चव्हाण वसंतराव बळवंतराव**
भा.रा.काँग्रेस, नायगाव
९५-३, चव्हाण गल्ली, नायगाव,
(बा.), ता.नायगाव (खै.),
जि.नांदेड- ४३१ ७०९.
निवास- ०२४६२-२५३७१८



**साबणे सुभाष पिराजीराव**
शिवसेना, देगलूर (अ.जा)
एं४-एं७, यशवंतराव चव्हाण
गृहनिर्माण संस्था, अष्टविनायक
अपार्टमेंट, उदगीर रोड, देगलूर,
ता.देगलूर, जि.नांदेड ४३१७७७



**डॉ. राठोड तुषार गोविंदराव**
भाजप, मुखेड
मु.पो.वसंतनगर (कोटग्याळ),
ता. मुखेड जि.नांदेड
कार्यालय- ०२४६१-२२२५५५



**डॉ. मुंदडा जयप्रकाश शंकरलाल**
शिवसेना,बसमत
सरस्वती कॉलनी, जुने
तहसीलजवळ,
ता.वसमत, जि.हिंगोली



**डॉ. टारफे संतोष कौतिका**
भा.रा.काँग्रेस, कळमनूरी
नाईकनगर, जिल्हाधिकारी
कार्यालयासमोर,
हिंगोली, जि. हिंगोली
कार्यालय- ०२४५६-२२४८८८



**मुटकुळे तान्हाजी सखारामजी**
भाजप, हिंगोली
गाडीपुरा, अंबिका टॉकीज रोड,
हिंगोली-४३१५१३.



**भांबळे विजय माणिकराव**
रा.काँ.पक्ष, जिंतूर
मु.पो.सावंगी (भांबळे),
जिंतूर, ता.जिंतूर, जि.परभणी
कार्यालय-०२४५७-२३८०१९

नागपूर अधिवेशन



**डॉ. पाटील राहुल वेदप्रकाश**
शिवसेना, परभणी
शिवाजीनगर, ता.जि.परभणी
कार्यालय- ०२४५-२२२२७०१



**केंद्रे मधुसुदन माणिकराव**
रा.काँ.पक्ष, गंगाखेड
इंद्रप्रस्थ भाग्यनगर, गंगाखेड,
ता.गंगाखेड,
जि.परभणी-४३१५१४
कार्यालय- ०२४५३-२२२८६१



**फड मोहन माधवराव**
अपक्ष, पाथरी
मातृछाया निवास, गंगाखेड रोड,
माधवनगर, परभणी - ४३१४०१
कार्यालय- ०२४५२-२२०५९१



**लोणीकर बबनराव दत्तात्रय**
भाजप, परतूर
मु.पो.लोणी खुर्द, ता.परतूर,
जि.जालना ४०० ०३२
निवास ०२२-३६१९९७७
/२३६१९९८८



**टोपे राजेश अंकुशराव**
रा.काँ.पक्ष, घनसावंगी
अजिंक्य बंगला, भाग्यनगर, जुना जालना, ता.जालना, जि.जालना.
कार्यालय ०२४८२-२२५३३१
निवास ०२४८२-२२५७७७



**खोतकर अर्जुन पंडितराव**
शिवसेना, जालना
दर्शना बिल्डिंग,
भाग्यनगर, जुना जालना
कार्यालय-०२४८२-२३११११
निवास ०२४८२-२२३१११



**कुचे नारायण तिलकचंद**
भाजप, बदनापूर (अ.जा)
कुचे निवास, लक्ष्मीदेवी
मंदिराजवळ,
जुनी मुकंदवाडी, औरंगाबाद
निवास- ०२४०-२४८३३५२



**दानवे संतोष रावसाहेब**
भाजप, भोकरदन
खासदार निवास, शिवाजी नगर,
जालना रोड, भोकरधन,
जि.जालना-४३१११४.
कार्यालय २४८५-२४०१२५



**सत्तार अब्दुल नबी**
भा.रा.काँग्रेस, सिल्लोड
घर क्र.७८६, मु.पो.
स्नेहनगर,सिल्लोड, ता. सिल्लोड,
जि.औरंगाबाद-४३१११२.
कार्यालय- ०२४३०-२२२८५१



**जाधव हर्षवर्धन रायभान**
शिवसेना, कन्नड
मु.पो.पिशोर, ता.कन्नड,
जि.औरंगाबाद
कार्यालय-०२४०-२६६५२२७६



**बागडे हरिभाऊ किसनराव**
भाजप, फुलंब्री
मु.पो.चिले पिंपळगाव,
जि.औरंगाबाद-४३०००१.
दुरध्वनी- ०२४०-२४८४९६६



**सय्यद इम्तीयाज जलील**
एम.आय.एम. औरंगाबाद-मध्य
घर क्र. १-१२-२४, ताहेर
प्लाझा, मनपा रोड, जुना बाजार,
औरंगाबाद-४३१००१
कार्यालय- ०२४०-२३३७११११



**शिरसाट संजय पांडुरंग**
शिवसेना, औरंगाबाद-पश्चिम
